ISSN 2230 - 7745

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

* वर्ष - २७ वे * अंक ११ वा * डिसेंबर २०१० * किंमत : रु. ५०/-

**भारतातील विशेष आर्थिक क्षेत्रे : प्रमुख समस्यांचा अभ्यास**
प्रा. अरुण पौडमल

**नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा : एक अध्ययन (संदर्भ - बीड शहर)**
प्रा. सुनंदा आहेर

**सांगली जिल्ह्यातील वैवाहिक संबंधातील अन्यायग्रस्त पुरुष आणि त्यांच्या जोडीदारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी**
डॉ. तुकाराम थोरात

**वंचिततेचा नवा पैलू : वाढत जाणारी वृद्धांची लोकसंख्या**
प्रा. प्रशांत सोनवणे

**पारधी जमातीचे सामाजिक व आर्थिक जीवन**
डॉ. देवीदास भगत

**जलसंधारणातून विकासाकडे : जात, वर्ग, लिंगभाव दृष्टिकोनातून**
- प्रा. शेळके पी. टी.

**संघटित क्षेत्रातील कामगार स्त्रियांच्या दर्जाचे समाजशास्त्रीय विश्लेषण**
डॉ. सुशीला फुले

**राजर्षी शाहूंचे समाजाभिमुख प्रशासकीय धोरणे**
डॉ. नारायण कांबळे

**भारतीय समाजव्यवस्थेत वृद्धाश्रम**
प्रा. भारत खैरनार

**म.स.प. २० व्या अधिवेशनाचा वृत्तांत**
सचिव म.स.प.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे मुखपत्र

# मराठी समाजशास्त्र परिषद

(नोंदणी क्र. महाराष्ट्र / २७-८३ औरंगाबाद)

द्वारा - समाजशास्त्र विभाग पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद

**कार्यकारी मंडळ**

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | डॉ. दिलीप खैरनार |
| सचिव | - | डॉ. दादासाहेब मोटे |
| खजिनदार | - | प्रा. सिद्धार्थ निसर्गंध |
| सदस्य | - | डॉ. विजय मारूलकर |
| | | डॉ. जगन कराडे |
| | | डॉ. श्रुती तांबे |
| | | डॉ. नारायण चौधरी |
| | | डॉ. दादासाहेब तोरवणे |
| | | डॉ. पंडितराव शिंदे |
| | | डॉ. अरुण चव्हाण |
| | | डॉ. अशोक गायकवाड |
| | | प्रा. महेंद्रकुमार जाधव |
| | | प्रा. सुलभा गावंडे |
| | | डॉ. एन.जी. कांबळे |

# समाजशास्त्र संशोधन पत्रिका

**मराठी समाजशास्त्र परिषद**

| ✲ वर्ष - २७ वे | ✲ अंक ११ वा | ✲ डिसेंबर २०१० | ✲ किंमत : रु. ५०/- |
|---|---|---|---|

संपादक : **डॉ. दिलीप खैरनार**

संपादक मंडळ :

**डॉ. स्मिता अवचार**
**डॉ. दादासाहेब मोटे**
**डॉ. पद्माकर सहारे**
**प्रा. सिद्धार्थ निसर्गंध**
**डॉ. राहूल हजारे**

संपादकीय सल्लागार मंडळ -

**डॉ. विलास संगवे**
**डॉ. उत्तमराव भोईटे**
**डॉ. पु. ल. भांडारकर**
**डॉ. द. ना. धनागरे**
**डॉ. एस.एन. पवार**
**डॉ. शरयू अनंतराम**

संपर्क पत्ता -

सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद,
द्वारा - समाजशास्त्र विभाग
पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र
देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद
पिन कोड - ४३१ ००१

या अंकात लेखकांनी व्यक्त केलेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असतीलच असे नाही.

www.msp-maha.com
E-mail : sanshodhanpatrika@gmail.com

**संपादकीय**
- डॉ. दिलीप खैरनार

**भारतातील विशेष आर्थिक क्षेत्रे : प्रमुख समस्यांचा अभ्यास** ५
प्रा. अरुण पौडमल

**जलसंधारणातून विकासाकडे : जात, वर्ग, लिंगभाव दृष्टिकोनातून** ९
- प्रा. शेळके पी. टी.

**नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा : एक अध्ययन (संदर्भ - बीड शहर)** १३
प्रा. सुनंदा आहेर

**संघटित क्षेत्रातील कामगार स्त्रियांच्या दर्जाचे समाजशास्त्रीय विश्लेषण** १९
डॉ. सुशीला फुले

**सांगली जिल्ह्यातील वैवाहिक संबंधातील अन्यायग्रस्त पुरुष आणि त्यांच्या जोडीदारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी** २५
डॉ. तुकाराम थोरात

**राजर्षी शाहूंचे समाजाभिमुख प्रशासकीय धोरणे** ३२
डॉ. नारायण कांबळे

**वंचिततेचा नवा पैलू : वाढत जाणारी वृद्धांची लोकसंख्या** ३६
प्रा. प्रशांत सोनवणे

**भारतीय समाजव्यवस्थेत वृद्धाश्रम** ४१
प्रा. भारत खैरनार

**पारधी जमातीचे सामाजिक व आर्थिक जीवन** ४५
डॉ. देवीदास भगत

**म.स.प. २० व्या अधिवेशनाचा वृत्तांत** ४९

# अकराव्या अंकाच्या निमित्ताने

समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा अकरावा अंक प्रकाशित करतांना अत्यंत आनंद होत आहे. काळानुसार संशोधन पत्रिकेची वाटचाल व्हावी यासाठी या आवृत्तीला आयएसएसएन क्रमांक प्राप्त करून देण्यात आला आहे. पत्रिकेत समाविष्ट होणाऱ्या लेखांचा दर्जा उत्तम असावा यासाठी आदर्श लेखन संहिता सर्व सदस्यांना यापूर्वीच पाठविली आहे. पुढील काळात संशोधन पत्रिका अधिक प्रासंगिक व सैद्धांतिक दृष्टिकोनातून निष्कर्षपूर्ण लेख, निबंध यासह प्रकाशित व्हावी असा मनोदय आहे. प्रस्तुत अंकासाठी महाराष्ट्रभरातून आलेल्या लेखांमध्ये अपेक्षित संहितेचा अंशत: अभाव असला तरी या अंकात सदर लेखांचा अंतर्भाव करण्याचा निर्णय संपादक मंडळाने घेतला आहे. मात्र यापुढे लेखकांनी लेखन संहितेचे काटेकोर पालन करावे ही अपेक्षा.

अलीकडील काळात समाजशास्त्र अभ्यासकांची जबाबदारी वाढली आहे. सामाजिक परिवर्तनातून समाजव्यवस्थेत होणाऱ्या सूक्ष्म बदलांमुळे निर्माण होणाऱ्या विविध परिस्थितीचे निरीक्षण व आकलन करणे आपले कर्तव्य ठरते. संशोधनपत्रिकेच्या आगामी अंकामध्ये आपण सर्वांनी एकत्र येऊन याविषयी विचारमंथन करण्याची आवश्यकता वाटते. उपयोजित समाजशास्त्र व आंतरविद्याशाखीय विषयांच्या अभ्यासातून निर्माण होणाऱ्या विषयाच्या नवीन पैलूंचा अभ्यास करण्याची गरज आहे. नव्या संकल्पनांचा ऊहापोह करून समाजशास्त्र संशोधन पत्रिकेला अधिक उच्च संशोधकीय, वैचारीक पातळीवर नेण्यासाठी प्रयत्न करूया.

या अंकापासून आपण ई-जर्नलची सुरुवात करत आहोत. हा अंक वाचकांना, अभ्यासकांना परिषदेच्या वेबसाईटवर उपलब्ध राहील.

सदर संशोधन पत्रिकेसाठी संपादक मंडळ व सल्लागार मंडळासह ज्यांनी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली अशा सर्वांचे आभार.

**– संपादक**

# भारतातील विशेष आर्थिक क्षेत्रे : प्रमुख समस्यांचा अभ्यास

**प्रा. अरुण पौडमल**

**१. प्रस्तावना :**

विशेष आर्थिक क्षेत्र (सेझ) म्हणजे खास आखून दिलेला कर मुक्त विभाग असून त्याला व्यापार, साधारण भार (ड्युटी) व आयात निर्यात शुल्काच्या (टॅरिफ) दृष्टीने परकीय भूप्रदेश मानला आहे. भारत सरकारने सन २००० मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र धोरण आखले व २००५ मध्ये विशेष आर्थिक क्षेत्र कायदा करण्यात आला. त्यासंबंधी नियम तयार करण्यात आल्यावर तो कायदा १० फेब्रुवारी २००६ पासून प्रत्यक्षात अमलात आला आहे. सदर शोधनिबंधात भारतातील विशेष आर्थिक क्षेत्र व प्रमुख समस्या यांचा अभ्यास केला आहे.

**२. उद्दिष्टे :**

सदर शोधनिबंधासाठी पुढील उद्दिष्टे ठरविण्यात आली आहेत.

२.१ विशेष आर्थिक क्षेत्राच्या सवलती व निकषांचा अभ्यास करणे.

२.२ विशेष आर्थिक क्षेत्रामुळे भूमी संपादनामुळे निर्माण झालेल्या समस्यांचा आढावा घेणे.

२.३ विशेष आर्थिक क्षेत्र व पाणी वापर याचे अध्ययन करणे.

**३. विशेष आर्थिक क्षेत्रांना सवलती :**

या क्षेत्रातील उद्योगामुळे परदेशी गुंतवणूक वाढावी, परकीय चलनाचा साठा वाढावा व रोजगार निर्मिती व्हावी असा उद्देश आहे. त्यासाठी या उद्योगांना भरमसाठ सवलती देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये प्रामुख्याने -

३.१ आयात-निर्यातीसाठी परवान्याची गरज नाही.

३.२ १०० टक्के थेट परदेशी गुंतवणुकीस परवानगी.

३.३ विदेशी कंपन्यांना आपला नफा स्वदेशी पाठविण्याची परवानगी.

३.४ निर्यातीतून मिळणाऱ्या नफ्यावर प्राप्तीकर लागू नाही.

३.५ दहा वर्षांसाठी टॅक्स हॉलिडे

३.६ कामगार कायदे लवचिक करण्यात येतील.

३.७ राज्य शासनाच्या सर्व शुल्कांतून सवलत, कच्च्या मालाच्या आयातीवर व देशांतर्गत माल वाहतुकीवर सर्व शुल्क माफ.

३.८ आयात-निर्यात मालाची दैनंदिन तपासणी नाही, सेवा कर व केंद्रीय विक्री करातून सूट.

३.९ वीज व पाणी करात १०० टक्के सूट इत्यादी सवलती देण्यात आल्या आहेत.

विशेष आर्थिक क्षेत्रासाठी सलग जमीन आवश्यक असल्याने हजारो एकर जमीन एकेका क्षेत्रासाठी देण्यात येईल. खासगी कंपन्यांना या जमिनी खरेदी करता आल्या नाहीत तर राज्य सरकार या जमिनी संपादन करून कंपन्यांना देईल. तसेच ज्यांच्या जमिनी घेण्यात येतील त्यांच्या पुनर्वसनाची, नोकरी देण्याची कोणतीही जबाबदारी घेण्यात येणार नाही. सध्या या धोरणात बदल होऊन प्रत्येक जमीन धारकाच्या वारसापैकी एकास नोकरी दिली जाणार आहे.

**४. विशेष आर्थिक क्षेत्र कोणास उभे करता येते :**

कोणताही खाजगी, सार्वजनिक, संयुक्त क्षेत्रातील किंवा राज्य सरकार, त्याच्या एजन्सीचा उपक्रम तसेच परदेशी कंपन्या असे विशेष आर्थिक क्षेत्र उभे करू शकतात.

**५. विशेष आर्थिक क्षेत्र व जमीन :**

केंद्रीय वाणिज्य मंत्रालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध माहितीनुसार सुमारे ४१,७०० हेक्टर जमीन प्रस्तावित व मंजूर विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी घेतली जाणार आहे. नंदीग्राम येथे सेझसाठी ५६०० हेक्टर जमीन घेतली जाणार होती. (तेव्हा नंदीग्राम सेझचा निर्णय मागे घेण्यात आला असला तरी पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार अन्यत्र त्याची निर्मिती होऊ शकते.) अशा मोठ्या सेझची गोळाबेरीज करून सेझसाठी घेतल्या जाणाऱ्या जमिनीचा अंदाज मांडण्यात आला आहे. महामुंबई (१० हजार हेक्टर) आणि नवी मुंबई (५ हजार हेक्टर) ही महाराष्ट्रातील मोठी विशेष आर्थिक क्षेत्रे आहेत, तर गुजरात मधील मुंद्रा सेझ १३ हजार हेक्टरमधील आहे. गुरगावमध्ये

**समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, कोल्हापूर येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत.**

रिलायन्स सेझ १० हजार हेक्टरचे असेल. पुणे सेझसाठी आठशे चाळीस हजार हेक्टरमध्ये ओरिसामधील पॉस्को सेझ सोळाशे हेक्टरमध्ये होणार आहे. मोठ्या सेझची ही काही माहिती असलेली नावे झाली. एवढ्या मोठ्या प्रमाणात सेझसाठी जमीन घेतल्यानंतर सेझसाठी पाण्याची गरजदेखील तितकीच मोठी असणार हे उघड आहे. सेझसाठी निवडलेल्या जागादेखील शेती व सिंचन विकासावर परिणाम घडवू शकतील असे दिसते.

**६. विशेष आर्थिक क्षेत्र पुनर्वसन समस्या :**

११ जानेवारी २००७ रोजी पंतप्रधान फिक्कीच्या कार्यक्रमात म्हणाले की, येत्या तीन महिन्यांत अतिशय मानवतापूर्ण असे सेझ बाधितांसाठीचे राष्ट्रीय पुनर्वसन धोरण आकाराला आणण्यात येईल. डॉ. मनमोहन सिंग यांच्या सरकारने फेब्रुवारी २००४ मध्ये ज्या राष्ट्रीय पुनर्वसन धोरणाचे नोटिफिकेशन केले त्याची अंमलबजावणी करण्याची पर्वा अद्याप तरी केलेली नाही. पुनर्वसनाबाबत शासन फारसे गंभीर नाही याचे आणखी एक उदाहरण सांगायचे तर, २१ मार्च २००७ रोजी वाणिज्य विभागाने सेझ कायद्यात काही बदलाचे नोटिफिकेशन केले. या बदलानुसार सेझ विकासकाने विस्थापित होणाऱ्या व्यक्तींसाठी राज्य शासनाच्या पुनर्वसन धोरणाशी सुसंगत अशा पुरेशा पुनर्वसन तरतुदी करायच्या आहेत. तसेच देशातील अनेक राज्यांनी अद्याप कायद्याने बंधनकारक ठरेल असे स्वत:चे पुनर्वसन धोरणच अद्याप बनवलेले नाही.

सर्वात महत्त्वाची बाब म्हणजे खाजगी योजनांना उपकारक ठरावे म्हणून सरकार आता 'पब्लिक पर्पज'ची व्याख्याच अधिक व्यापक करू इच्छिते आहे. खाजगी योजनांना सार्वजनिक हिताच्या मानून त्यांच्यावर सवलतींचा वर्षाव करणे योग्य कसे म्हणता येईल? हे खरे तर राज्य घटनेलाही धरून नाही. शासन खाजगी उद्योग आणि बांधकाम व्यावसायिकांशी हातमिळवणी करून सर्वसामान्य माणसाची फसवणूक करते आहे एवढेच नव्हे तर सामान्य माणसाला त्याच्या जमिनीतून कोणत्याही किमतीवर हुसकावून लावते आहे असेच चित्र आता देशभरात लोकांच्या मनात सेझबाबत तयार होऊ लागले आहे.

**७. विशेष आर्थिक क्षेत्र भूमी संपादन समस्या :**

सेझ धोरणासंदर्भात ६ एप्रिल २००७ रोजी झालेल्या मंत्र्याच्या बैठकीत सांगण्यात आले की, आता खाजगी विकासकच थेट भूसंपादन करतील. भूसंपादनात शासनाची भूमिका अंशिक स्वरूपाची असेल. याचाच अर्थ शेतकऱ्यांना खाजगी विकासकांच्या दयेवर अवलंबून राहावे लागणार आहे आणि ही बाब मान्य करता येण्यासारखी नाही.

आणखी एक मुद्दा असा, आज देशातील कोणत्याही राज्यात जमीन वापरविषयक धोरणच अस्तित्वात नाही. केरळसारख्या एक, दोन राज्यांनी या धोरणाचा मसुदा बनवला आहे. पण त्याला अजून प्रत्यक्ष धोरणाचे रूप आलेले नाही. जमीन वापराचे धोरणच अस्तित्वात नसल्याने शेती विकास, जलस्रोत विकास, वन व वन्यजीव संवर्धन आणि जमीन वापराच्या अन्य बाबी यामध्ये अजिबात समन्वय नाही आणि जमिनीचा मन मानेल तसा वापर करण्यास धनवान मोकळे आहेत.

७.१ तसेच पश्चिम बंगालमधील नंदीग्राम येथे सेझ प्रकल्पाला झालेला टोकाचा विरोध आता सर्वांना माहिती आहे पण असा विरोध फक्त एकाच ठिकाणी झाला आहे किंवा होतो असे नाही. सेझचा प्रकल्प म्हणून.

७.२ हरिपुरा येथे १०हजार मेगॅवॅट क्षमतेचा अणुऊर्जा प्रकल्प उभारण्याचा जो प्रयत्न आहे त्यालाही मोठा विरोध होतो आहे.

७.३ महाराष्ट्रात रायगड जिल्ह्यातील पेण, उरण आणि पनवेल तालुक्यातील ४५ गावांच्या हद्दीतील १० हजार हेक्टर जमीन सेझसाठी संपादित करण्याबाबत महाराष्ट्र शासनाने नोटिफिकेशन जारी केलेले आहे. रिलायन्सच्या महामुंबई सेझसाठी ही जमीन घेतली जाणार आहे. पण शेतकरी या प्रस्तावाला अतिशय लढाऊपणाने विरोध करीत आहे. शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी या प्रकल्पाला देण्यास नकार दिला आहे. कोयना धरणामुळे विस्थापित झालेले अनेक लोक पेण तालुक्यात येऊन राहिले आहेत. आणि आज त्यांना पिण्याचे स्वच्छ पाणीही मिळत नाही अशा अवस्थेत ते राहत आहेत. मग पुनर्वसनाच्या आश्वासनांवर कसा विश्वास ठेवायचा?

७.४ महामुंबई सेझलगतच महाराष्ट्र सिटी अँड इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या सहकार्याने नवी मुंबई सेझ विकसित करण्यासाठी आणखी ५

हजार हेक्टर जमीन घेण्याचा विचारात आहे. याखेरीज पुण्याजवळच्या माण येथे ८०० हेक्टर जमीन औद्योगिक क्षेत्रासाठी संपादित करण्याचा प्रयत्न आहे. आणि त्याला मासेमार, शेतकरी आणि मिठागारातील कामगार यांनी संयुक्तपणे विरोध दर्शविला आहे.

७.५ मुंद्रा सेझसाठी गुजरातमधील तीन हजार हेक्टर क्षेत्रातील मँग्रोव्हज (खारफुटी) चा विध्वंस करण्यात आला आहे. गुजरातच्या वनविभागाने याबाबत आक्षेप घेतला आहे. गुजरातच्या अन्य भागातही औद्योगिक विस्तारासाठी नष्ट केले जात आहेत. मुंद्रा सेझमुळे मुख्यत: मच्छिमारांना मोठ्या प्रमाणावर आपला जगण्याचा आधार गमवावा लागणार आहे आणि त्यामुळे ते या सेझ लाही विरोध करीत आहेत.

७.६ हरियाणातील गुरगाव जिल्ह्यात मानेसरजवळच्या गडोली खुर्द गावातील लोकांनी २८ मार्च २००७ रोजी मुकेश अंबानींच्या रिलायन्ससाठी जागा घेण्यास सरकारला विरोध दर्शविला. जागेचा ताबा घेण्यासाठी गेलेल्या सरकारी अधिकाऱ्यांना माघार घ्यावी लागली, पण अधिकाऱ्यांनी आपण पुन्हा येऊ असे गावकऱ्यांना धमकावले. खांडसा, नरसिंगपूर, मुहम्मदपूर, गडोली आणि हरसारू खेड्यातील लोकांनी एकत्र येऊन आता सरकारला रिलायन्ससाठी ५५८ हेक्टर जमीन घेऊ द्यायची नाही असा निर्णय घेतला.

७.७ केंद्रीय अर्थमंत्र्यांनी केवळ मागास भागात सेझ तयार करावेत असे म्हटले आहे, पण गुरगाव सेझ या निकषाचा भंग करणारा आहे. हरियाणातील झज्जर येथे हरियाणा इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनच्या भागीदारीत मुकेश अंबानी ग्रुपने १० हजार हेक्टर क्षेत्रात विशेष औद्योगिक क्षेत्र विकसित करण्याची योजना आखली होती. तथापि, शासनाने ५ हजार हेक्टरपेक्षा विशेष औद्योगिक क्षेत्राचा आकार मोठा असू नये अशी भूमिका घेतली आणि भूसंपादनात शासनाची भूमिका राहणार नाही हे स्पष्ट केले. त्यामुळे आता ही योजना अडचणीत आली आहे.

७.८ राजस्थानात जयपूरजवळच्या महेंद्र वर्ल्ड सिटी सेझच्या विरोधात उच्च न्यायालयामध्ये दाद मागण्यात आली आहे.

## ८. विशेष आर्थिक क्षेत्र व पाणी वाटप :

सन २००५ मध्ये भारत सरकारने सेझ साठी जो कायदा केला त्यात क्षेत्रांसाठी जलस्रोत कोणते वापरणार किंवा वापरावेत याबाबत काही स्पष्ट उल्लेख नाही. मग सेझच्या पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास, अन्य निर्बंध या बाबी तर दूरच राहिल्या. थोडक्यात सेझचा कायदा, सेझविषयक प्रकटीकरणे आणि आदेश म्हणजे राज्य व केंद्र सरकारने पाणी वापराबाबत उद्योगांना दिलेला कोरा धनादेश आहे. धनादेशाचा वापर सेझसाठी गरजेनुसार कसाही करावा. उदाहरण सांगावयाचे तर गुजरातचा कायदा म्हणतो, विशेष आर्थिक क्षेत्र विकासकाला औद्योगिक युनिटसाठी पाणीपुरवठा व वितरण व्यवस्था विकसित करण्यासही मान्यता दिली जाईल. अन्य राज्यांमध्ये हीच स्थिती आहे. म्हणजे विशेष आर्थिक क्षेत्रांच्या पाणीविषयक गरजा व उपलब्ध जलस्रोत याविषयी जेवढी माहिती हाती येते आहे ती चिंतेत भर टाकणारी आहे. हाती येणारी माहिती अशी :

८.१ **महामुंबई सेझ :** या सेझची पाण्याची गरज अनुक्रमे पेण आणि खालापूर तालुक्यांतील हेतवणे आणि मोरबा धरणांच्या जलाशयांकडून भागविण्यात येणार आहे, पण हेतवणे जलाशयाच्या क्षमतेबाबत अनेक शंका आहेत. शेतकऱ्यांना या जलाशयातून सिंचनासाठी पाणी मिळविण्याकरिता झगडावे लागत होते, आता त्यांना सिंचनासाठी पाणी मिळेल?

८.२ **नवी मुंबई सेझ :** अधिकृत वेबसाईटवर दिलेल्या माहितीवरून या सेझला दर दिवशी किमान सहा दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासेल. हे पाणीही हेतवणे जलाशयातून घेण्याची कल्पना आहे.

८.३ **मुंद्रा सेझ :** या सेझकरिता देखील दर दिवशी किमान दहा दशलक्ष लिटर पाणी लागेल आणि ते गुजरात वॉटर इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडच्या अभिवचनानुसार सरदार सरोवर प्रकल्पातून घेण्याचे नियोजन आहे. या सेझ ची पाण्याची गरज चारशे दशलक्ष लिटर प्रतिदिन इतकी वाढू शकते.

इथे हे नमूद करणे संदर्भाला धरून ठरेल की भारत सरकारच्या गुजरातसाठीच्या ऑडिटर जनरलनी ३१ मार्च २००६ ला संपलेल्या वर्षाच्या अहवालात सरदार सरोवर प्रकल्पाच्या जलाशयातील प्रतिदिन २५५ दशलक्ष लिटर इतके जादा पाणी मूळ नियोजनात तरतूद नसताना मध्य गुजरातला दिल्याबद्दल गुजरात सरकारवर ताशेरे ओढले आहेत. कूचमधील उद्योगांसाठीही अधिक पाणी देण्याने दुष्काळी भागात पाण्याचे अधिक दुर्भिक्ष्य ओढले आहेत. कूचमधील उद्योगांसाठीही अधिक पाणी देण्याने दुष्काळी भागात पाण्याचे अधिक दुर्भिक्ष्य जाणवू शकेल असा इशारा कॅगच्या अहवालात देण्यात आला आहे.

८.४ **पोस्को सेझ :** पोस्कोच्या वेबसाईटवर दिलेल्या माहितीनुसार या सेझला प्रतिदिन २८६ दशलक्ष लिटर इतके पाणी लागणार आहे आणि ते ओरिसातील कटक जिल्ह्यातील महानंदी नदीवरच्या जोब्रा बंधाऱ्यातून उचलले जाणार आहे. हे पाणी अर्थातच हिराकूड धरणाच्या वरच्या बाजूने घेतले जाणार आहे. हिराकूड धरणातील पाण्याच्या औद्योगिक वापरासाठीच्या आरक्षणाला विरोध दर्शवत या आधीच निदर्शने सुरू झालेली आहेत.

८.५ **नागपूर आय.टी. पार्क सेझ :** या सेझसाठी जलसिंचन प्रकल्पातून पाण्याची उपलब्धता केली जाईल एवढेच या सेझच्या अधिकृत वेबसाईटवर म्हटले आहे.

८.६ **मंगलोर सेझ :** जून २००६ मध्ये पंतप्रधान मनमोहन सिंग यांना पाठविलेल्या पत्रात सेझ इम्पॅक्ट ॲसेसमेंट कमिटीच्या कन्व्हेनरने असे म्हटले आहे की, मंगलोर सेझ लिमिटेडने केलेल्या अंदाजानुसार या सेझला दरदिवशी १३६ दशलक्ष लिटर पाण्याची गरज असणार आहे. सेझ नसतानाच मंगलोर शहराला पाणी टंचाई जाणवते आहे. अशा वेळी सेझ निर्माण झाल्यानंतर ही टंचाई कमी होईल की वाढेल?

८.७ **कोचीन सेझ :** या सेझच्या वेबसाईटवर म्हटले आहे विशेष आर्थिक क्षेत्र म्हणजे भारतातील परदेशी प्रदेश. सेझसाठी एकात्मिक जलव्यवस्थापन पद्धती अमलात आणली जाईल आणि त्यासाठी दरदिवशी दीड दशलक्ष लिटर पाण्याची गरज भासेल. पाण्यावरून सेझमुळे निर्माण होणाऱ्या संघर्षाची बीजे यातून आपणास निश्चितच पाहावयास मिळतात.

## ९. विशेष आर्थिक क्षेत्र व इतर समस्या :

९.१ सेझेमधील उद्योगांना प्रचंड सवलती देण्याचे जाहीर करण्यात आले आहे. पण त्यासाठी पटतील अशी आणि सुसंगत कारणमीमांसा जाहीर करण्यात आलेली नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधी आणि एशियन डेव्हलपमेंट बँकेने देखील अशा सवलतींविषयी प्रश्नचिन्ह उभे केले आहे. एशियन डेव्हलपमेंट आऊटलुक २००७ या अहवालात एशियन डेव्हलपमेंट बँकेने म्हटले आहे की, सेझमधील उद्योगांना देऊ करण्यात आलेली विविध सवलतींच्या रुपातील आर्थिक मदत ही एक प्रकारची अनावश्यक उधळपट्टी आहे आणि त्याचा परिणाम या क्षेत्राबाहेरील उद्योगांवर झाल्याखेरीज राहणार नाहीत. ज्यांची जमीन घेतली जाईल ते लोक अर्थातच यामुळे सर्वाधिक बाधित झालेले असतील.

९.२ शेती व शेती क्षेत्रासाठी गंभीर धोका म्हणून समोर येत असलेल्या विशेष आर्थिक क्षेत्रांची योजना ही पूर्णत: लोकविरोधी व पर्यावरणविरोधी योजना आहे. या योजनेमुळे विशेष आर्थिक क्षेत्रांसाठी निश्चित केलेल्या जागांच्या परिसरातील जल व अन्न सुरक्षा धोक्यात येणार आहे.

## १०. निष्कर्ष :

१. आज सेझमुळे किमान १,५०,००० हेक्टर्स जमीन ताब्यात घेण्याच्या शक्यतेमुळे देशातील १,४०,००० शेती करणाऱ्या कुटुंबांसमोर व ८२,००० शेत मजुरांसमोर अस्तित्वाचे संकट उभे राहिले आहे.

२. विशेष आर्थिक क्षेत्रामुळे कोणत्या पर्यावरणीय समस्या निर्माण होतील याबाबत पर्यावरणीय परिणामांचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## संदर्भ :


१) www.sez.india.nic.in

२) विशेष आर्थिक क्षेत्र - दैनिक पुढारी, ५ सप्टेंबर २००६ (प्रा.डॉ. अरुण पाटील, प्रा. डॉ. नामदेव आडनाईक)

३) सेझमुळे पाणी व अन्नविषयक सुरक्षाही धोक्यात आंदोलन - शाश्वत विकासासाठी मे, २००७ (उदय कुलकर्णी)

# जलसंधारणातून विकासाकडे : जात, वर्ग, लिंगभाव दृष्टिकोनातून

- प्रा. शेळके पी. टी.

**विकास** जागतिकीकरण, आधुनिकीकरण यांसारख्या संकल्पना आज सर्वच ज्ञानशाखांनी अभ्यासण्याचा सपाटा चालवलेला आहे. या संकल्पनांचा अभ्यास पर्यायाने समाजशास्त्रातदेखील मोठ्या आवेशाने अभ्यासला जात आहे. समाजशास्त्रीय संशोधन क्षेत्रात तर या संकल्पना सर्रासपणे येत असतातच. या संकल्पना अभ्यासताना भारतीय समाज आणि त्यावर या प्रक्रियांचा होणारा प्रभाव या दृष्टिकोनातून मोठा प्रवाह अभ्यासत असलेला दिसतो. त्यामुळे २१ व्या शतकातही समाजशास्त्र द्वंद्वामधून पूर्णपणे बाहेर आलेले नाही असे मानण्यास हरकत नाही. कारण समाजशास्त्राची सूक्ष्म विरुद्ध बृहद, परंपरा विरुद्ध आधुनिकता, सिद्धांत विरुद्ध अनुभवाधिष्ठितता अशा दोन टोकाच्या भूमिकेत मांडणी करण्याची खूप मोठी परंपरा आहे. एन्थोनी गिडण्ससारख्या विचारवंतानी आपल्या संरचणाकरण या सिद्धांतातून दाखवून दिले आहे की, समाजशास्त्रातील हेच द्वैत समाजशास्त्राच्या विकासास घातक ठरण्याची शक्यता आहे. त्यामुळे आज नवीन समाजशास्त्रीय अभ्यासकाने या द्वैताच्या बाहेर येऊन अभ्यास करण्याची गरज आहे व विकास, जागतिकीकरण, आधुनिकीकरण यासारख्या संकल्पनांचा 'चवीचे खाद्य' म्हणून तोंडी लावण्यापुरता विचार न करता किंवा भारतीय समाज हा खूप सरळ आणि सुटसुटीत होता व या नवीन धोरणांच्या प्रक्रियेचा त्यावरती परिणाम पडला व संपूर्ण भारतीय समाजरचना ढवळून निघाली असा निष्कर्ष न काढता त्या संकल्पनेकडे विमर्शात्मकतेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. या संकल्पना भारतीय समाजाशी जोडताना भारतातील जात, वर्ग, लिंगभावाची गुंतागुंत कशाप्रकारे तपासता येईल याचादेखील विचार होणे गरजेचे आहे. त्यासाठी या संकल्पनांचा एका वेगळ्या परिप्रेक्षातून तपासण्याचा प्रयत्न या लेखातून केला आहे.

आज ग्रामीण विकासाच्या अर्थकारणाची चर्चा करत असताना आदर्श गाव, समृद्ध गाव, आधुनिक गाव याविषयीच्या चर्चा मोठ्या प्रमाणावर होत असताना दिसतात. प्रसार माध्यमांनीदेखील या चर्चांना जनमानसापर्यंत पोहोचवण्याचा निसंकोचपणे प्रयत्न केला आहे. त्यामुळे संपूर्ण भारतातील जलसंधारण, स्वच्छता, तंटामुक्ती यासारख्या प्रकल्पांना राबवण्याचा प्रयत्न केला जात आहे. हे प्रकल्प राबवत असताना व राबवल्यानंतर गावामध्ये ज्या प्रकारची आर्थिक, सामाजिक, राजकीय व सांस्कृतिक गतिशीलता प्राप्त होते त्याचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून वेध घेणे आवश्यक आहे. प्रस्तुत अभ्यासात अशाच एका आदर्श गाव हिवरेबाजार या खेडेगावाच्या जलसंधारणातून झालेल्या विकासाचे जात, वर्ग, लिंगभावाच्या परिप्रेक्ष्यातून विश्लेषण केले आहे.

आदर्श गाव हिवरे बाजार हे महाराष्ट्रातील ग्रामीण विकासाचे एक 'मॉडेल' म्हणून बनले आहे. या गावाचे नाव संपूर्ण भारताच्या नकाशावर ठळक अक्षरात कोरले गेले आहे. त्यामुळे या गावाच्या विकासाचा अभ्यास सर्वच ज्ञानशाखांनी उत्स्फूर्तपणे केला आहे; परंतु हा अभ्यास करताना हे खेडेगाव आर्थिक क्षेत्रामध्ये व नैसर्गिक स्रोतांच्या वापरामध्ये कसे आधुनिक बनले आहे व त्यामुळे या गावाचे भौतिक जीवन कसे बदलले आहे याची चर्चा मोठ्या प्रमाणावर झालेली आहे. प्रस्तुत अभ्यास याच चर्चेचा जात, वर्ग, लिंगभावाच्या परिप्रेक्ष्यातून विमर्शात्मक अभ्यास करण्याचा प्रयत्न करणार आहे.

जलसंधारण योजना आणि खेडेगावच्या आर्थिक व सामाजिक विकासाचे समाजशास्त्रीय विश्लेषण या अभ्यासामध्ये केले आहे. हे करताना आर्थिक विकास झालेल्या आदर्श गाव हिवरेबाजार या खेड्याचा संदर्भ घेऊन जात, वर्ग, लिंगभाव आधारित अभ्यास करण्याचा प्रयत्न या संशोधनामध्ये केला आहे. हा अभ्यास करताना असे दिसून येते की, खेडेगावचा आर्थिक विकास हा महत्त्वाचा घटक आहे; परंतु त्याचे कुटुंब, जात, वर्ग यासारख्या विविध सामाजिक संस्थांशी असलेला संबंधही महत्त्वाचा आहे असे दिसून येते. कारण गावचा आर्थिक विकास होणे म्हणजेच प्रत्येक कुटुंब आर्थिकदृष्ट्या श्रीमंत होत जाणे. प्रत्येक जातीतील लोकांचा आर्थिक दर्जा उंचावत जाऊन

**समाजशास्त्र विभाग, न्यू आर्टस्, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज अहमदनगर येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत.**

एक वर्ग निर्माण होतो. ही सर्व सामाजिक गतिशीलतेची प्रक्रिया आहे व या गतिशीलतेचा भौतिकता हा मुख्य पाया आहे. कारण ही गतिशीलता आपल्याला व्यक्तीकडे, कुटुंबाकडे आर्थिक घटकांवर आधारित साधनांची उपलब्धता कोणत्या प्रमाणावर आहे यावरती आधारित आहे.

प्रामुख्याने हा अभ्यास करत असताना सामाजिक संस्था (कुटुंब, जात, आप्तव्यवस्था इ.) व आर्थिक विकास या दोन संकल्पनांना एकत्र आणले आहे. समाजशास्त्रामध्ये या संकल्पनांकडे वेगळ्या दृष्टिकोनातून पाहिले जाते. या दोघांचा (विभक्त) काहीच संबंध नाही असे मानून कुटुंब, आप्तव्यवस्था, जात यांना भावनिकतेच्या कप्प्यामध्ये टाकले जाते. या संस्थांमध्ये कोणत्याच प्रकारचा आर्थिक व्यवहार नसतो किंवा आर्थिक घटकांचा या संस्थांशी काहीच संबंध येत नाही असे दाखविले जाते. तसेच आर्थिक संकल्पनेचा विचार करता ही संकल्पना स्पष्ट करण्यासाठी सांख्यिकतेवर भर देण्यात येतो. समाजाचा आर्थिक स्तर उंचावणे म्हणजे दरडोई उत्पन्नाचे प्रमाण वाढते असा निकष लावला जातो; परंतु प्रस्तुत संशोधनामध्ये कुटुंब, जात, वर्ग यांची विकासाच्या प्रक्रियेशी कसा संबंध येतो व या संस्थांच्या माध्यमातून विकास प्रक्रिया कशी घडवली जाते याचा आढावा घेण्यात आला आहे. ज्यावेळेस कुटुंब आपली आर्थिक स्थिती सुधारण्यास सुरुवात करते त्यावेळेस विकास प्रक्रियेलाच खऱ्या अर्थाने हातभार लावत असतो. त्यामुळे या सर्व प्रक्रियेचा विचार करताना एका विकसित खेडेगावातून याचे चित्रण कसे दिसते हे पाहण्यासाठी हिवरेबाजार या खेडेगावची निवड करण्यात आली. कारण हिवरेबाजार या खेडेगावांना १९९० नंतर 'जलसंधारण' ही योजना राबवून आर्थिक व सामाजिक क्षेत्रामध्ये जे यश मिळवले आहे त्याचा समाजशास्त्रीय अभ्यास होणे आवश्यक मानले आहे.

हिवरेबाजार या खेडेगावच्या अध्ययनानंतर अनेक पैलू समोर येताना दिसतात. प्रत्येक जात, लिंगभाव, वर्गानुसार जलसंधारणाची संकल्पना आणि त्यातून होणारा खेडेगावचा आर्थिक विकास व या सर्वांमधली गुंतागुंत अधिकच किचकट होताना दिसते. साधारणपणे हिवरेबाजार हे खेडेगाव आर्थिक विकासाच्या तीन टप्प्यातून गेलेले दिसते. हे तिन्ही टप्पे चढउताराचे असतांना दिसतात. पहिल्या टप्प्यामध्ये या गावच्या आर्थिक विकासाला निजामाची बाजारपेठ व नंतर त्या बाजारपेठेचा ब्रिटिशांनी केलेला वापर आणि या प्रक्रियेत असणारे हिवरेबाजार या सर्वांचा समावेश होतो. या टप्प्यानंतर हिवरेबाजारच्या आर्थिक विकासाचा व प्रक्रियेचा उतरता काळ सुरू होतो. ज्यामध्ये हिवरेबाजार या गावाची संपूर्ण प्रतिमा नकारात्मक स्वरूपाची बनलेली दिसते. ती तशी बनण्यामध्ये गावाची नैसर्गिक साधनसंपत्ती महत्त्वाची भूमिका बजावत असते. कारण ब्रिटिशांकडून झालेली त्या गावाची जंगलतोड आणि गावकऱ्यांच्या नैसर्गिक साधने वापरण्याचा नकारात्मक दृष्टिकोन त्या गावच्या अवर्षणास निमंत्रण देतो. पर्यायाने गावचे शेतीवरचे अर्थकारण ठप्प होते. आर्थिक स्थिती खालावल्यामुळे एकूणच हिवरेबाजार या गावाची सामाजिक प्रतिमा नकारात्मक बनते. या नकारात्मक प्रतिमेला सकारात्मक होण्याचा प्रयत्न तिसऱ्या टप्प्यामध्ये झाला आहे.

हिवरेबाजारमध्ये गेल्या पंधरावीस वर्षांपासून शेती व दुग्धव्यवसाय यामध्ये जी वाढ झाली आणि त्यातून जो आर्थिक विकास झाला त्यामुळे त्या गावच्या सामाजिक दर्जामध्ये व व्यवस्थेमध्ये मोठा प्रभाव पडलेला आहे. जलसंधारणातून पावसाचे जे पाणी कोणत्याही स्वरूपाचा अडथळा नसल्याने वाया जात होते. ते जमिनीत जागच्या जागी झिरपण्याचे प्रमाण वाढले आहे. पाण्याच्या झिरपण्यामुळे साहजिकच पाण्याची पातळी वाढली. शेतीसाठी बऱ्यापैकी पाणी मिळाल्याने त्या गावामध्ये शेतीच्या उत्पन्नाला चालना मिळाली. जे उत्पन्न पूर्वी पाच हजारांएवढे निघत तेच उत्पन्न आज लाखाच्या पुढे जाण्यास सुरुवात झाली. त्यामुळे शेतकऱ्यांचा शेती करण्यावर भर वाढला व गावामध्ये सुधारित पद्धतीची शेती करण्याला शेतकऱ्यांनी प्राधान्य दिले. गावातील सरपंचांनी व सुशिक्षित लोकांनी गावचा शेतकरी इस्रायली पद्धतीने शेती करण्यासाठी कसा वळेल याकडे विशेष लक्ष दिले. त्यामुळे आपल्याला हिवरेबाजारची शेती आणि त्याच गावाच्या शेजारच्या गावामधील शेती यात विशेष फरक असल्याचे आढळून येईल.

हिवरेबाजार या खेडेगावच्या विकासाचा तिसरा टप्पा जलसंधारण या संकल्पनेतून सुरू होतो. या संकल्पनेला पोपटराव पवारांसारख्या कर्तृत्ववान नेतृत्वाकडून साकारले जाते आणि गावचा कायापालट होण्यास सुरुवात होते. ओसाड पडलेले खेडेगाव आज जागतिक पातळीवर येऊन पोहोचते. याचा अर्थ जलसंधारणासारखी योजनादेखील सामाजिक स्थिती सुधारण्यास

परिणामकारक भूमिका बजावू शकते हे सिद्ध होते. आज हिवरेबाजारची स्थिती पाहिली तर संपूर्ण खेडेगाव एक उपनगर झाल्याचे भासते. कारण जलसंधारणाने शेतीत सुधारणा झाली. आर्थिक स्रोत वाढले. त्यामुळे गावाची घरे, सार्वजनिक कार्यालये, शाळा, इमारती, रस्ते हे सर्व आधुनिक पद्धतीने निर्माण झाली आहेत. हे सर्व नैसर्गिक साधनांचा योग्य व पुरेपूर वापर केल्याने शक्य झाले. हिवरेबाजार हा केवळ परिसरातील नव्हे तर देशाला आदर्श ठरण्यास महत्त्वाची भूमिका पार पाडतो. गावाचा इतिहास पाहिला तर सामाजिकदृष्ट्या मागासलेले गाव म्हणून गावची गणना होत होती. या अभ्यासात वयोवृद्ध माणसांच्या मुलाखतीतून असेही पुढे आले आहे की १९७०-८० च्या दशकात या खेडेगावाला 'चोरांचे हिवरे' असे संबोधत असे. या गावचे लोक चोर आहेत म्हणून त्यांच्याशी कुणी आर्थिक व सामाजिक व्यवहार करत नसे. आर्थिक स्रोत नसल्यामुळे बेकारीचे प्रमाणही वाढलेले होते. आज मात्र ते खेडेगाव आदर्श हिवरेबाजार म्हणून नावारूपाला आले. त्यामुळे जलसंधारण हे खेडेगावच्या विकासाचा पर्यायी मार्ग मानण्यास हरकत नाही. हा विकास नेमका कोणत्या दिशेने चालला आहे? कोणत्या घटकाला अनुकूल आहे? व कोणत्या घटकाला प्रतिकूल आहे? हे तपासण्याचे काम समाजशास्त्रीय संशोधनाचे आहे. त्यामुळे जात, वर्ग, लिंगभाव या घटकातून हिवरेबाजारचा विकास कसा झाला ते पुढच्या भागात मांडता येईल.

**जात, वर्ग, लिंगाची सामाजिक व्यवस्था**

जात, वर्ग, लिंगभावाचे एकमेकांमधले नाते गुंतागुंतीचे असते. कारण जातीच्या विशिष्टत्वातून वर्गाची निर्मिती होत असते व प्रत्येक जात वर्गाची पुरुष सत्ता ही कमी अधिक प्रमाणावर भिन्न असलेली दिसत असते. प्रामुख्याने भारतीय ग्रामीण रचना ही शेतीवर आधारित असल्यामुळे या तीनही घटकांवर शेतीचा मोठा प्रभाव पडलेला दिसतो. हिवरेबाजार या खेड्याचा विचार करता हा प्रभाव स्पष्टपणे दिसतो. कारण खेडेगावाने विकासाच्या दिशेने प्रवास सुरू केला की जात, वर्ग लिंगभावाच्या कक्षा रुंदावत जातात. कारण या घटकांमधील जुन्या घटकांवर पडदा टाकला जात असतो व नवीन अर्थकारणामध्ये नव्याने घटक निर्माण होत असतात. हेच हिवरेबाजार या खेडेगावात झालेले दिसते.

हिवरेबाजार या खेडेगावात साधारणत: ब्राह्मण जात वगळता सर्व कारू - नारू जातीचे वास्तव्य आहे. इतर खेड्यांप्रमाणे मराठा जातीची संख्या सर्व जातीपेक्षा जास्त आहे. गावची शेतकरी जात म्हणून मराठा जरी असली तरी माळी, धनगर व इतर मागासवर्गीय जातीमध्येदेखील शेती केली जाते; परंतु हे प्रमाण मराठा जातीपेक्षा निश्चितच कमी आहे. गावची वर्गरचनाही प्रामुख्याने जाती आधारित असलेली दिसते. कारण मराठा व त्यानंतर माळी जातीकडे सर्वात जास्त जमीन आहे. पर्यायाने जलसंधारणातून शेतीसाठी मिळणारा फायदा या जातीला जास्त मिळतो. याचा परिणाम शेतीमधला आर्थिक स्रोत आहे तो या जातीमध्ये जास्त असलेला दिसतो. त्यामुळे यांचा उच्च वर्गात समावेश होतो. अर्थात गावचा आर्थिक विकास झाल्यामुळे व सरपंचांच्या प्रयत्नामुळे गावात शेतीबरोबरच शिक्षण, उद्योगधंद्यांचा विकासदेखील झाला आहे. त्यामुळे ज्यांना जमीन कमी आहे त्यांना शिक्षणामुळे नोकऱ्यांची संधी मिळू लागली आहे. आदर्श गाव संकल्पनेचा प्रभाव असल्यामुळे गावातील जवळजवळ ६० ते ७० टक्के घरांमधून एक एक तरी मुलगा सैन्यदलात भरती झालेला दिसतो. त्यामुळे वर्गरचनेची सरमिसळ जरी झालेली असली तरीदेखील निम्न जातीतील लोक जास्तीत जास्त मध्ये वर्गात गेलेले दिसतात, पण उच्च वर्गात त्याचे प्रमाण अत्यल्प आहे.

लिंगभावाच्या बाबतीत एक महत्त्वाची गोष्ट प्रकर्षाने जाणवते की गावामध्ये गेल्या गेल्या सर्व घरांवरती त्या घरातील स्त्रीचे नाव टाकलेले दिसते. याचा अर्थ स्त्रियांनादेखील या गावात आदराची वागणूक देण्यास सुरुवात झालेली दिसते. घरावर नाव टाकून एकप्रकारे त्या घराची मालकीच दिल्याचे दिसते. म्हणजे इतर खेड्यांच्या तुलनेत हे खेडेगाव खऱ्या अर्थाने विकासाच्या मार्गावर असल्याचे दिसते. कारण भारतीय संस्कृतीत स्त्रियांच्या नावावर संपत्ती केली जात नाही. तिला सतत पुरुषांच्या वर्चस्वाखाली ठेवण्याचा प्रयत्न असतो व ही परंपरा या गावाने मोडलेली दिसते. ही गोष्टही गावाच्या दृष्टिकोनातून अभिमानाची आहे.

हिवरेबाजारमध्ये आधुनिकतेचा शिरकाव शेतीच्या माध्यमातून झाला आहे. प्रत्येक खेडेगावाचा कणा त्या गावची शेती आहे. शेतीला पुरेसे व वेळच्या वेळेवर पाणी उपलब्ध झाले तर शेतीतून पिकांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उत्पन्न निघत असते; परंतु महाराष्ट्रातील काही भाग पर्जन्यछायेच्या

प्रदेशात येत असल्याने पावसाचे पाणी हाच अंतिम स्रोत मानला जातो. या स्रोतात खंडितता आली तर गावची अर्थव्यवस्था पूर्णपणे कोलमडली जाते; परंतु हिवरेबाजार या खेडेगावाने या सर्वांवर मात केली आहे. जलसंधारणाच्या माध्यमातून हे गाव स्वयंसिद्ध झाले आहे. या योजनेतून गावाने शेती, दुग्धव्यवसाय या क्षेत्रात आमूलाग्र विकास साधला आहे. या क्षेत्रात झालेल्या आर्थिक विकासामुळे गावात शिक्षण, व्यवसाय, आरोग्य, पर्यटन इ. नवीन क्षेत्राचीही निर्मिती झाली आहे. या गावाने इतर खेड्यांना जलसंधारणातून कसा आदर्श घालून दिला आहे हे जाणून घेण्यासाठी राज्यपाल, मुख्यमंत्री, कृषिमंत्री, गृहमंत्री इ. नेत्यांनी भेटी देऊन या गावचा सामाजिक दर्जा उंचावण्याबरोबरच राजकीय दराराही वाढवला आहे. त्यामुळे चोरांचे गाव म्हणून काही वर्षांपूर्वी संबोधले जाणारे खेडेगाव आज देशाच्या नकाशावर आदर्शगाव म्हणून स्थान मिळविले आहे. ही सर्व किमया जलसंधारणातून झालेली दिसते.

**संदर्भ :**


१) Breman J. 2007 The Poverty Resine in Village India, New Delhi : Oxford University Press

२) Breman, J & Kloos 1997 Ed. The Village In Asia Revisited New Delhi, Oxford Univercity Press

३) गावस्कर म. अवर्षणप्रवण कृषी जीवनातील नवता व परंपरा, समाजप्रबोधन पत्रिका, अंक - १८०, ऑक्टोबर ते डिसेंबर २००७

४) काजळे जयंती - महाराष्ट्रातील बिगर शेती ग्रामीण रोजगाराचे स्वरूप, समाजप्रबोधन पत्रिका, अंक १८०, ऑक्टोबर ते डिसेंबर २००७

५) देशपांडे रा. - कोरडवाहू महाराष्ट्रातील कृषी संसाधनांचा विषम विकास, समाजप्रबोधन पत्रिका, अंक १८०, ऑक्टोबर ते डिसेंबर २००७

६) डिसुजा अ. - अहमदनगर जिल्ह्यातील गटबाजी : एक समुदायलक्षी दृष्टिकोन, समाजप्रबोधन पत्रिका, अंक १८०, ऑक्टोबर ते डिसेंबर २००७

७) Vasvi A. 1999. Harbiserse of Rain : Land & Life in South India. New Delhi : Oxford University Press.

८) Bhaua G. 2000. Indian Agriculture Science Indipendent New Delhi : National Book trust India.

९) Basu S. 2005. ed. Dowry & Inheritance : Issues in Contemporary Indian feruinism. New Delhi : Women Unlimited.

१०) Anita B. 2000. Village Caste & Education New Delhi : Rawat Publication.

११) Kamat A. 1968. Progress of Education in Rural Maharashtra. Bombay : Asia Publishing House.

१२) मुळे, रा. १९८८ शैक्षणिक संशोधनाची मूलतत्त्वे, औरंगाबाद, विद्या बुक्स.

१३) Bloor, M & Wood F. 2006. Keyword in Qualititive Methods : A Vocabulary of Research Concepts, New Delhi : Sage Publication.

१४) Shingh M. 1998. The Sociological Research Methods. New Delhi Sage Publication.

१५) पंडित, न २००१ जागतिकीकरण, पुणे : सुगावा प्रकाशन

१६) वारघडे सुरेशचंद्र, यशोगाथा हिवरेबाजारची, हिवरेबाजार परिवार प्रकाशन, आवृत्ती २००२

# नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक व सामाजिक दर्जा : एक अध्ययन (संदर्भ - बीड शहर)

प्रा. सुनंदा आहेर

**प्रस्तावना :**

समाज कोणताही असो व्यक्तीचा दर्जा हा तिची प्रतिष्ठा वाढवत असतो. व्यक्तीच्या कार्याच्या माध्यमातून मिळालेला दर्जा हा व्यक्तिमत्त्व विकासासाठी अतिशय महत्त्वाचा मानला जातो. व्यक्तीला मिळालेल्या व्यक्तिमत्त्व विकासाच्या संधीमुळे दर्जा आणखी उंचावण्याचा व्यक्ती प्रयत्न करते. या अनुषंगाने नोकरी करणाऱ्या महिला आज त्यांना मिळालेल्या कामाच्या संधीच्या माध्यमातून स्वत:चा दर्जा टिकविण्याचा आणि उंचावण्याचा प्रयत्न करीत असलेल्या दिसून येतात. यासाठी महिलांना आज कुटुंबामधून सहकार्य आणि प्रोत्साहन मिळत आहे. तर समाजामध्ये बरोबरीच्या दर्जामुळे समान कामाच्या संधी मिळत असल्याचे दिसते. कारण महिला महत्त्वाच्या आणि कठीण कामाचीही जबाबदारी स्वीकारून ते काम व्यवस्थित पार पाडत असल्याचे दिसून आले. त्यामुळे प्रसंगी महिलांच्या चांगल्या कामाची प्रशंसा करून त्यांना प्रोत्साहन देण्याचे प्रमाणही समाजामध्ये आज वाढत आहे. याशिवाय नोकरी करणाऱ्या महिला नोकरी करत-करत कौटुंबिक जबाबदाऱ्याही व्यवस्थितपणे पार पाडत आहेत. हे सर्व करत असताना महिलांची मोठ्या प्रमाणात धावपळ होते. हे वास्तव नाकारून चालणार नाही; परंतु या सर्वांवर यशस्वीपणे मात करून महिला आपले कार्य व्यवस्थितपणे करून स्वकर्तृत्वावर स्वत:ची वेगळी ओळख निर्माण करीत आहेत.

**विषय निवड :**

जग बदलते आणि विस्तारत आहे. जगण्याची शैली बदलत आहे आणि नवीन आव्हाने आपले दरवाजे ठोठावत आहेत. पण पुरेसे बदलतो आहोत का? आपल्याला बदलांचा बोध होतो आहे का? आपले मानसिक आणि वैचारिक जग विस्तारले का? जे नवे आकाराला येत आहे त्यात स्त्रीला कोणते स्थान आहे. याचा विचार करणे आणि शोध घेणे गरजेचे ठरत आहे. प्रस्तुत अध्ययन हे नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा : एक अध्ययन (संदर्भ बीड शहर) या महिला सक्षमीकरणाला हातभार लावणाऱ्या व समाज विकासाला गती प्राप्त करुन देणाऱ्या विषयाशी निगडित आहे. नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा याचे अध्ययन करून संशोधनाच्या माध्यमातून वास्तव स्थिती जाणून घेणे हा या संशोधनाचा मुख्य हेतू समोर ठेवून सदरील विषयाची निवड करण्यात आली आहे.

**संशोधन पद्धती :**

नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा : एक अध्ययन (संदर्भ बीड शहर) या विषयावर संशोधन करत असताना तथ्य संकलनासाठी बीड शहरातील २५-५० वर्षे वयोगटातील महिलांचा वयोगट निश्चित करण्यात आला. संशोधनासाठी बीड शहरातील वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये वेगवेगळ्या पदांवर कार्यरत असणाऱ्या ५० महिला उत्तरदात्यांची निवड करण्यात आली. उत्तरदात्यांची निवड करण्याकरिता स्वैर नमुना निवड पद्धतीचा उपयोग केला आहे. सदरील विषयावरील संशोधनकरिता प्रश्नावली, मुलाखत आणि प्रत्यक्ष निरीक्षण या प्राथमिक सामुग्रीचा व विविध ग्रंथ, मासिके व वर्तमानपत्रे या द्वितीयक सामुग्रीचा आधार घेण्यात आला; आणि तथ्य संकलन करून त्याआधारे निष्कर्ष स्पष्ट करून काही उपाययोजना सुचविण्यात आल्या आहेत.

**गृहीत कृत्ये :**

१) नोकरी करणाऱ्या महिलांची कुटुंब आणि कार्यालय या दोन्ही ठिकाणी काम करताना धावपळ होत आहे.

२) नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये अन्यायाचा प्रतिकार करण्याचे प्रमाण वाढले आहे.

३) नोकरी करणाऱ्या महिलांची आवड जोपासणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण वाढत आहे.

**समाजशास्त्र विभाग, महिला कला महाविद्यालय, बीड येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत.**

४) अर्थार्जनामुळे आर्थिक बाबतीत स्वातंत्र्य असणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे.

५) नोकरी करणाऱ्या महिला त्यांच्यावर सोपविलेले काम व्यवस्थितपणे आणि वेळेत पार पाडणाऱ्या महिलांचे प्रमाण वाढत आहे.

६) नोकरी करणाऱ्या महिला नातेवाईकांना वेळ देऊ शकत नाहीत. त्यामुळे प्रसंगी नातेवाईक नाराज होतात.

७) कायद्याने स्त्री-पुरुष समानतेचे तत्त्व लागू होत असल्याने महिलांना कार्यालयामध्ये समान वागणूक दिली जाते.

८) नोकरी करणाऱ्या महिलांमध्येही उपवास-व्रतवैकल्ये करणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त आहे.

**उद्देश :**

१) नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा कसा आहे याचा आढावा घेणे.

२) महिलांचा निर्णय प्रक्रियेतील सहभाग याचा आढावा घेणे.

३) महिलांना काम करत असताना कुटुंब आणि समाजामध्ये कितपत प्रोत्साहन दिले जाते ते पाहणे.

४) महिलांना कौटुंबिक कामामध्ये प्रसंगी कुटुंब सदस्य मदत करतात का याचे अध्ययन करणे.

५) दैनंदिन धावपळीमुळे महिला स्वत:च्या आरोग्याची काळजी घेतात का याचा आढावा घेणे.

६) महिलांना स्वत:साठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य आहे का हे अभ्यासणे.

७) महिलांना नोकरी करत असताना वरिष्ठ पदासाठी आवश्यक शिक्षण घेण्यास कुटुंबाकडून प्रोत्साहन व सहकार्य मिळते का याचा आढावा घेणे.

८) महिलांना आर्थिक स्वातंत्र्य आहे का हे पाहणे.

९) महिलांनी केलेल्या चांगल्या कामाची वरिष्ठांकडून प्रशंसा केली जाते का याचा आढावा घेणे.

**नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा :**

सदरील विषयावर संशोधन करीत असताना नोकरी करणाऱ्या महिलांची कुटुंबपद्धती (संयुक्त-विभक्त) पाहत असताना विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त दिसून आले. यामध्ये संयुक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण २२% तर विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण ७८% दिसून आले. विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त असण्यामागील कारणे पाहिली असता नोकरीमधील दैनंदिन जीवनातील धावपळीमुळे आणि नोकरीनिमित्त बाहेरगावी स्थलांतर करावे लागत असल्यामुळेही विभक्त कुटुंब पद्धती अधिक प्रमाणात असल्याचे स्पष्ट झाले. थोडक्यात व्यक्तीच्या शारीरिक व वैयक्तिक विकासाबरोबर शैक्षणिक प्रगती होऊन शिक्षणाच्या माध्यमातून मिळवलेले ज्ञान हे चरितार्थाचे साधन बनले व यातूनच स्थलांतर व कुटुंबाचे विभाजन अपरिहार्य बनले.

आधुनिक समाजात मात्र स्त्रिला जीवनाची सर्वच क्षेत्रे उपलब्ध झाली आहेत. आज स्त्री शिक्षणाच्या संधी उपलब्ध झाल्याने डोळस होऊ लागली आहे. आर्थिक क्षेत्रात स्वावलंबी बनत आहे. व्यक्तिस्वातंत्र्य व समता या कल्पनामुळे आधुनिक समाजातील स्त्री-जीवनाचा कायापालट झाला आहे. मर्यादित कुटुंबामुळे कुटुंबात स्त्रीचा दर्जा उंचावला असल्याने तिच्या एकंदरीत कौटुंबिक आणि सामाजिक भूमिकेत बदल घडून आला आहे. गतिशीलतेला अनुरूप अशी परिस्थिती शिक्षण, नवीन तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक शोध इ.मुळे निर्माण झाली असल्याने एकंदरीत कुटुंबाच्या रचनेत बदल घडून आला आहे. हा बदल कुटुंबाच्या व्यावसायिक कार्यात अधिक प्रमाणात दिसून येत आहे. व्यावसायिक कार्यात विविधता निर्माण झाल्याने कुटुंबाच्या एकंदरीत धार्मिक व सांस्कृतिक जीवनात प्रचंड बदल घडून आला आहे.

महिलांच्या अर्थार्जनातील सहभागामुळे कुटुंबामध्ये निर्णय घेताना कुटुंबातील महिलांचे मत विचारात घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाणात जास्त दिसून आले. यामध्ये कुटुंबात निर्णय घेताना स्त्रियांचे मत विचारात घेतले जाणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९८% तर स्त्रियांचे मत विचारात न घेणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २% दिसून आले. त्याचबरोबरच स्वत:साठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणाऱ्या महिलांचे प्रमाण ८४% तर स्वातंत्र्य नसणाऱ्या महिलांचे प्रमाण १६% दिसून आले. तसेच आपल्या इच्छेप्रमाणे बचत करू शकणाऱ्या महिलांचे प्रमाण ८४% तर इच्छेप्रमाणे बचत करू न शकणाऱ्या महिलांचे प्रमाण १६% दिसून आले. याशिवाय कुटुंबामध्ये पैसा खर्च करताना महिलांच्या आवडीला प्राधान्य देणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९२% तर महिलांच्या आवडीला प्राधान्य न देणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ८% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, आधुनिक काळामध्ये शिक्षणाच्या माध्यमातून महिला पुरुषांच्या बरोबरीने प्रसंगी पुरुषांपेक्षा चांगले कार्य करून समाजामध्ये स्वत:ची एक वेगळी ओळख निर्माण

करू लागल्या आहेत. ज्यामुळे त्यांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा उंचावण्यास मदत होत असल्याचे दिसते. त्यामुळेच आज कुटुंबामध्ये कोणताही निर्णय घेत असताना स्त्रीचे मत विचारात घेतले जाणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे. नव्हे ते दिवसेंदिवस वाढतच चालले आहे, ही बाब खरोखरच कौटुंबिक व सामाजिक विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहे.

स्त्रीला स्वत:साठी निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त दिसून आले. अर्थार्जन करत असल्यामुळे स्त्रिला भविष्यकाळासाठी काही बचत करण्याचे स्वातंत्र्यही जास्त कुटुंबात दिसून आले. त्याचबरोबर स्त्री आणि पुरुष दोघेही नोकरी करत असल्याने, दोघांचाही अर्थार्जनासाठी सहभाग असल्यामुळे कुटुंबामध्ये दैनंदिन जीवनातील गरजांव्यतिरिक्त इतर गोष्टींवर पैसा खर्च करत असताना स्त्री आणि पुरुष दोघांच्याही विचाराने निर्णय घेऊन वस्तू खरेदी करणे किंवा पैसा खर्च करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, कुटुंबामध्ये नोकरी करणारी स्त्री असेल तर तिची आवड जाणून त्याप्रमाणे वस्तू खरेदी करणे किंवा पैशांची गुंतवणूक केली जात आहे. थोडक्यात स्त्रीची आवड आणि भावना जपण्याचा प्रयत्न कुटुंबामध्ये केला जात आहे. परिणामी आपोआपच स्त्रीचा कौटुंबिक दर्जा उंचावत चालल्याचे दिसते. यामुळे नोकरी करणाऱ्या महिलांमध्ये एक प्रकारचा खंबीर आत्मविश्वास आणि काम करण्याचा उत्साह वाढत चाललेला दिसतो. ज्याला आपण स्त्री प्रगती असे म्हणतो.

आत्मभान जागवताना आणि आत्मसन्मान मिळताना महिलांच्या प्रवासातले सर्वच प्रश्न सुटले आहेत असे नाही. परंतु कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण मात्र बदलत आहे. कारण स्त्री विकासाला पोषक अशी दिशा आणि भूमिका कुटुंबात, समाजात आणि शासन स्तरावर घेतली जात आहे; आणि महिलांना शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवण्याचा प्रयत्न केला जात आहे. या सर्व बाबी महिलांचा कौटुंबिक दर्जा उंचावण्यास साहाय्यभूत ठरत आहेत.

नोकरी करत असतांना कुटुंब आणि नोकरी हे दोन्ही सांभाळत असताना स्त्रीची होणारी दैनंदिन धावपळ आणि त्याचबरोबर वेळेनुसार/परिस्थितीनुसार कार्यालयामध्ये येणाऱ्या अतिरिक्त कामाचा बोजा यामुळे स्त्री शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या थकली जाते. याची जाणीव कुटुंबाला होऊ लागल्यामुळेच कौटुंबिक कामामध्ये स्त्रीला कुटुंब सदस्य मदत करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ९०% तर मदत न करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १०% दिसून आले. त्याचबरोबर स्त्रिच्या कार्यालयीन कामकाजामध्ये हस्तक्षेप करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ०% दिसून आले. नोकरी करत असताना जे काम स्त्रीवर सोपवले जाते. ते काम तिला स्थल-काल परत्वे कमी-जास्त वेळ देऊन करावेच लागते. कारण कार्यालयीन कामकाजाच्या बाबतीत काम आणि दाम यामध्ये स्त्री असो किंवा पुरुष समानता असते. या विचाराने स्त्रीच्या कार्यालयीन कामकाजामध्ये कुटुंबीयांचा हस्तक्षेप होत नसल्याचे संशोधनामध्ये समोर आले. आज महिला वेगवेगळ्या क्षेत्रामध्ये स्वत:च्या कार्यप्रणाली, जिद्द, चिकाटी, बौद्धिक चातुर्य, मेहनतीच्या बळावर आपले वर्चस्व प्रस्थापित करीत आहेत, आणि स्वत:चा व्यक्तिमत्त्व विकास करून घेत आहेत. परिणामी कौटुंबिक व समाजविकासाला गती प्राप्त होत आहे. थोडक्यात स्त्रीबाबतची संकुचित, संशयी वृत्ती कमी झाल्याचे स्पष्ट होते. स्त्रियांबाबतचे वेगवेगळे कायदे व त्याचे परिणाम या सर्व बाबी नोकरी करणाऱ्या महिलांच्या बाबतीत कुटुंबामध्ये आणि समाजामध्ये आज अनुकूल ठरत आहेत.

सदरील संशोधनामध्ये विभक्त कुटुंब पद्धतीचे प्रमाण जास्त दिसून आले. त्यामुळे नोकरी करणाऱ्या महिलांच्या कुटुंबात वृद्ध व्यक्ती आहेत का याचा आढावा घेतला असता कुटुंबात वृद्ध व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण २६% दिसून आले तर वृद्ध व्यक्ती नसणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण ७४% दिसून आले. नोकरीनिमित्त करावे लागणारे स्थलांतर, अपुरा वेळ, दैनंदिन धावपळ, वृद्ध व्यक्तींना असणारा गंभीर आजार ही कारणे असल्यामुळे वृद्ध व्यक्ती असणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण कमी दिसून आले असले तरीही ज्या कुटुंबात वृद्ध व्यक्ती आहेत, त्या कुटुंबातील वृद्ध व्यक्तीची सेवा करण्यासाठी स्त्रिया शक्य होईल तेवढा वेळ देत असल्याचे दिसून आले. यामध्ये वृद्ध व्यक्तीच्या आहाराची, आरोग्याची काळजी घेणे, त्यांच्या मनासारख्या शक्य होईल तेवढ्या गोष्टी करून त्यांना मानसिक समाधान देण्याचा थोडक्यात त्यांची आवड जोपासण्याचा प्रयत्न करणे आदी बाबी दिसून आल्या.

नोकरीमुळे नातेवाईकांना प्रसंगी वेळ देऊ शकत नसल्यामुळे जेव्हा नातेवाईक नाराज होतात तेव्हा पती-पत्नीमध्ये कौटुंबिक कलह निर्माण होणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण अत्यल्प दिसून

आले. त्यावरून असे स्पष्ट होते की, आज स्त्री कुटुंब आणि नोकरी सांभाळताना तिला सर्वच बाबींसाठी वेळ देणे शक्य नाही. अशी नोकरी करणाऱ्या महिलांच्या कुटुंबीयांची मानसिकता झालेली आहे.

दैनंदिन धावपळीमुळे येणारा शारीरिक आणि मानसिक थकवा यामुळे आजारी पडल्यानंतर तात्काळ वैद्यकीय उपचार करून घेणाऱ्या महिलांचे प्रमाण ९४% तर वैद्यकीय उपचार करुन न घेणाऱ्या महिलांचे प्रमाण ६% दिसून आले. त्याचबरोबर आजारी पडल्यानंतर विश्रांती घेणाऱ्या महिलांचे प्रमाण ८८% तर विश्रांती न घेणाऱ्या महिलांचे प्रमाण १२% दिसून आले. यामागील कारणांचा आढावा घेतला असता कामाच्या व्यापामुळे वैद्यकीय उपचार तात्काळ करून घेण्याकडे दुर्लक्ष केले जाते. किरकोळ रजा कमी असल्यामुळे विश्रांती घ्यायला जमत नाही. तर औषधे वेळेवर न घेण्यामागे औषधी खाऊ वाटत नाहीत, कामाच्या व्यापामुळे लक्षात राहत नाही ही कारणे पुढे आली. परंतु महत्त्वाची बाब म्हणजे नोकरी करणाऱ्या स्त्रिया स्वत:च्या आरोग्याच्या बाबतीत अधिक जागरूक असल्याचे स्पष्ट झाले. कारण आज गंभीर आजारांचे वाढत असलेले प्रमाण, त्याची कारणे, परिणाम या सर्व गोष्टींची माहिती झाल्यामुळे नोकरी करणाऱ्या महिला तात्काळ वैद्यकीय उपचार करून घेत असल्याचे दिसून आले.

उपवास-व्रतवैकल्ये करणाऱ्या महिलांचे प्रमाण जाणून घेण्याचा प्रयत्न केला असता उपवास-व्रतवैकल्ये करणाऱ्या महिलांचे प्रमाण ८६% तर उपवास-व्रतवैकल्ये न करणाऱ्या महिलांचे प्रमाण १४% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, नोकरी करणाऱ्या महिलांच्या राहणीमानात आणि दर्जात बदल झाला असला तरी पारंपरिक विचारांच्या जोखडातून मात्र तो पूर्णत: बाहेर पडलेली नाही. उपवास-व्रतवैकल्ये करणाऱ्या महिलांच्या आरोग्याची उपवासामुळे हेळसांड होऊ लागली आहे. वेगवेगळ्या पाहण्यांमधून हे वास्तव समोर येत आहे.

थोडक्यात नोकरी, करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा पाहत असताना वरील एकूण बाबींवरून असे स्पष्ट झाले की, नोकरी करणाऱ्या स्त्रीची कुटुंब आणि नोकरी हे दोन्ही सांभाळताना होणारी दैनंदिन धावपळ लक्षात घेऊन आज स्त्रीला कौटुंबिक कामामध्ये मदत करणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण जास्त आहे. तसेच अर्थार्जनामध्ये स्त्रीचा सहभाग विचारात घेऊन कौटुंबिक निर्णय घेताना, पैसा खर्च करताना स्त्रीचे मत, तिच्या आवडीला प्राधान्य दिले जात आहे. त्याचबरोबर वर्तमानकाळातील पैशातून भविष्यकाळासाठी बचत करण्याचे स्वातंत्र्यही स्त्रीला असल्याचे दिसून आले आणि स्त्रीच्या कार्यालयीन कामकाजातही कुटुंबीयांचा हस्तक्षेप दिसून आला नाही. यावरून असे स्पष्ट झाले की, स्त्रीबाबत संकुचित दृष्टिकोन लोप पावत असून स्त्रीच्या कार्य आणि श्रमाचा कुटुंबामध्ये आदर केला जात आहे. एवढेच नव्हे तर स्त्रीला चांगले कार्य करण्यासाठी प्रेरणा देऊन सहकार्य केले जात आहे. त्यामुळे संशोधनाअंती असे समोर आले आहे की, नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक दर्जा उंचावलेला आहे.

**नोकरी करणाऱ्या महिलांचा सामाजिक दर्जा :**

आज महिला शिक्षणाच्या माध्यमातून पुरुषांच्या बरोबरीने प्रत्येक क्षेत्रात अतुलनीय कार्य करीत आहेत. काही वेळा पुरुषांनाही लाजवेल अशी कामगिरी महिला करीत आहेत. त्यामुळे आज स्त्रियांची स्वतंत्र अशी ओळख समाजाने मान्य केली आहे. परिणामी स्त्रियांचा सामाजिक दर्जा उंचावत चालला असल्याचे दिसते. याचाच आढावा घेण्यासाठी नोकरी करणाऱ्या महिलांचा सामाजिक दर्जा कसा आहे हे संशोधन करण्यात आले आहे.

स्त्री-पुरुष समानतेच्या तत्त्वाने आज स्त्रिया अनेक क्षेत्रांत प्रवेश करून आपली बुद्धिमत्ता व कार्याच्या आधारे आपली योग्यता सिद्ध करू लागली आहे. नोकरी करणाऱ्या स्त्रीने जर चांगले काम केले तर तिच्या कार्याच्या स्तुती करणाऱ्या वरिष्ठांचे प्रमाण ९४% तर स्तुती न करणाऱ्या अधिकाऱ्यांचे प्रमाण ६% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, स्त्रीने जर चांगले काम केले तर तिच्या कामाची कार्यालयामध्ये दखल घेतली जाते, आणि तिच्या कार्याची स्तुती करून तिला प्रोत्साहन दिले जाते. स्त्रीने केलेल्या चांगल्या कार्याची दखल घेऊन स्त्रीवर महत्त्वाची कामाची जबाबदारी सोपविणाऱ्या वरिष्ठांचे प्रमाण ९४% तर जबाबदारी न सोपविणाऱ्या वरिष्ठांचे प्रमाण ६% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, आज महिला पुरुषांच्या बरोबरीने कार्य करून आपले वर्चस्व सिद्ध करीत आहेत. यासाठी महिला त्यांच्यावर सोपविलेले काम नियोजित वेळेत व त्रुटी न राहू देता पूर्ण करणाऱ्या महिलांचे प्रमाण अधिक दिसून आले. तत्परता आणि कणखरपणा, हाती घेतलेल्या कार्यावरील निष्ठा

आणि त्यासाठी लागणारी कष्टवृत्ती, त्यागवृत्ती आणि समर्पणशीलता या सर्वांना जोडणारी समावेशकता या संदर्भात स्त्रियांचे स्थान अद्वितीय आहे.

कार्यालयामध्ये महिलांना समान वागणूक मिळते का याचा आढावा घेतला असता समान वागणूक मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण १००% दिसून आले. कारण महिलादेखील त्यांच्यावर सोपविलेले कोणतेही काम काळजीपूर्वक व अचूक आणि वेळेत करीत असल्यामुळे त्यांना समान वागणूक द्यावीच लागते. तसेच कार्यालयीन कामकाजाबाबत अन्याय होणाऱ्या महिलांचे प्रमाण ०% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, आधुनिक कालखंडात यांत्रिकीकरण, नागरीकरण, नोकरशाही आदींमुळे श्रमापेक्षा बुद्धी कौशल्यावर आधारित नोकरी व्यवसाय येऊ लागल्या कारणाने व त्याचबरोबर बुद्धीच्या बाबतीत स्त्री-पुरुष भेद करता येत नसल्याने स्त्रिया हवे ते काम करण्यास सिद्ध झाल्यामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झालेली दिसते. बदलत्या परिस्थितीने व कायद्याने स्त्रीला अनेक प्रकारचे स्वातंत्र्य प्राप्त झाले आहे.

मानवी विकासासाठी नैतिक मूल्ये आवश्यक असतात. व्यक्तीच्या जीवनात नैतिक मूल्यांना अत्यंत महत्त्व असते. व्यक्तीचा स्वभाव-व्यक्तिमत्त्व हे नैतिक मूल्यांवर ठरत असते. व्यक्तीच्या जीवनाला दिशा देण्याचे कार्य नैतिक मूल्ये करत असतात. नैतिक मूल्यांमुळे समाजाच्या दैनंदिन व्यवहारात विश्वासाची भावना निर्माण होऊन सामाजिक संघर्ष कमी होऊन सामाजिक विकासाला हातभार लागतो. याची जाणीव अधिकारी-कर्मचारी वर्गाला झाली असल्यामुळेच आज नोकरीच्या ठिकाणी स्त्री-पुरुष भेद करून स्त्रियांवर अन्याय केला जात नाही.

शिक्षण व्यक्तीच्या चारित्र्याची जडण-घडण करीत असते. शिक्षणामुळे व्यक्तिमत्त्वात बदल घडून येत असतो. व्यक्तीचा सर्वांगीण विकास शिक्षणामुळे होत असतो. म्हणून नोकरी करत-करतच वरिष्ठ पदासाठी आवश्यक शिक्षण घेण्यासाठी कुटुंबाकडून प्रोत्साहन व सहकार्य मिळणाऱ्या महिलांचे प्रमाण ८४% दिसून आले. तर प्रोत्साहन न मिळणाऱ्या कुटुंबाचे प्रमाण १६% दिसून आले. यावरून असे स्पष्ट होते की, नोकरीबरोबरच स्त्रियांना वरिष्ठ पदावर जाण्यासाठी कुटुंबाकडून प्रोत्साहन व सहकार्य मिळाल्यामुळे आज महिला आपला सामाजिक दर्जा उंचावण्यात यश प्राप्त करत आहेत. आज स्त्री स्वावलंबी व स्वयंनिर्णयक्षम असलेली दिसून येते. एवढेच नाही तर स्त्री शिक्षणामुळे कौटुंबिक जबाबदारीबरोबरच इतरही जबाबदाऱ्या पार पाडणारी एक कर्तव्यदक्ष महिला म्हणून पुढे येत आहे.

सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिलांचे प्रमाण ३०% दिसून आले तर सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न न करणाऱ्या महिलांचे प्रमाण ७०% दिसून आले. सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या महिलांचे मत जाणून घेतले असता समाजातील गरीब विद्यार्थिनींची फीस भरणे, समाजामध्ये जाऊन स्त्री शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे, अंधश्रद्धा निर्मूलनासाठी प्रयत्न करणे, गरजू व्यक्तींना मदत करणे, धार्मिक बाबींचे पालन करून संस्कृतीचे जतन करण्यासाठी सामाजिक व राष्ट्रीय कार्यात सहभागी होणे इ. बाबींचा अंतर्भाव दिसून आला. आधुनिक काळात अर्पित दर्जापेक्षा स्वयंसंपादित दर्जाला जास्त महत्त्व दिले जाते. मुक्त अर्थव्यवस्थेमुळे व्यक्तीला कोणतेही आणि कोठेही काम करण्याची संधी उपलब्ध झाल्याने आपोआप पारंपरिक समाजनियम कालबाह्य होऊ लागले आहेत. स्वबळावर व्यक्ती कोणतेही काम करून लागल्याने तिच्या सामाजिक दर्जात बदल घडून आला आहे.

**सारांश :**

विकास प्रक्रियेत महिलांना पुरुषांच्या बरोबरीनं सन्मानाचं स्थान मिळण्यालाही खूप महत्त्व आहे. महिलांना उपजीविकेचे साधन मिळाल्यास समाजाच्या आर्थिक उलाढालीत त्या भर घालू शकतात. स्त्री कुटुंबात आणि कुटुंबाबाहेर क्रियाशील असणं, तिच्या मताला किंमत असणं यासाठी आर्थिक, कौटुंबिक आणि सामाजिक पाठबळ तिच्या मागे असणं महत्त्वाचं असतं, हे कुटुंबाने स्वीकारले आहे. म्हणूनच आज कुटुंबामध्ये महिलांचा दर्जा उंचावलेला दिसून येतो. जागतिकीकरणाच्या पार्श्वभूमीवर अन्न, आरोग्य, निवारा, विविध सुखसुविधा, शिक्षण, स्त्री-पुरुष समानता, सामाजिक व व्यक्तिगत सुविधा या आधारावर भारतीय स्त्रीची स्थिती नक्कीच सुधारलेली आहे; परंतु असे असले तरीही पुरुषांच्या तुलनेत व अन्य देशांच्या तुलनेने भारतीय स्त्री मागे आहे हे वास्तव नाकारून चालत नाही.

जग प्रचंड झपाट्याने बदलत आहे. नवे संशोधन, नवे विचार, नव्या गोष्टी, आजुबाजूला स्थिरावत आहेत. सर्वत्र स्पर्धा सुरू आहेत. या सर्व बाबींमध्ये महिलांचा सहभाग निश्चितच

चांगला आहे. चूल आणि मुल ही संकल्पना मागे पडली आहे. महिला आता सर्वच क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने पुढे-पुढेच जात आहेत. या सर्व प्रगतीच्या मागे कुटुंब, समाज आणि शासनाची भूमिका अतिशय महत्त्वाची आहे. कारण शासनाने महिला अधिक सक्षम व्हावी म्हणून अनेक कायदे केले. अनेक क्षेत्रात सोयी-सवलती देऊन तिला स्वत:च्या पायावर उभं केले. एकूणच महिलांची होत असलेली प्रगती आणि तिचा उंचावत असलेला कौटुंबिक व सामाजिक दर्जा खरोखरच कौतुकास्पद आहे.

**निष्कर्ष :**

१) नोकरी करणाऱ्या महिलांचा कौटुंबिक आणि सामाजिक दर्जा उंचावलेला आहे.

२) महिलांच्या आवडी-निवडीला कुटुंबामध्ये प्राधान्य दिले जाते.

३) महिलांना पैसा खर्च करण्याचे आर्थिक स्वातंत्र्य दिसून आले.

४) महिलांच्या कार्यालयीन कामकाजामध्ये कुटुंबीयांचा हस्तक्षेप दिसून आला नाही.

५) नोकरीमुळे नातेवाईकांना वेळ देऊ शकत नसल्याने जेव्हा नातेवाईक नाराज होतात तेव्हा कौटुंबिक कलह निर्माण होणाऱ्या कुटुंबांचे प्रमाण अत्यल्प दिसून आले.

६) महिलांना पदोन्नतीसाठी आवश्यक शिक्षण घेण्यास कुटुंबाकडून प्रोत्साहन व सहकार्य मिळत आहे.

७) महिलांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य असल्याचे समोर आले.

८) उपवास-व्रतवैकल्ये करणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त दिसून आले.

९) नोकरी करणाऱ्या महिलांची कुटुंब आणि नोकरी या दोन्ही ठिकाणी काम करत असताना धावपळ होते.

१०) आजारी पडल्यानंतर तात्काळ वैद्यकीय उपचार करून घेऊन वेळेवर औषधी घेणाऱ्या आणि विश्रांती घेणाऱ्या महिलांचे प्रमाण जास्त दिसून आले.

११) कार्यालयामध्ये महत्त्वाच्या कामाची जबाबदारी स्त्रियांवर सोपवण्याचे प्रमाणही जास्त दिसून आले.

१२) महिला त्यांच्यावर सोपविलेले काम व्यवस्थितपणे आणि वेळेमध्ये पूर्ण करतात.

१३) नोकरी करणाऱ्या महिलांना कार्यालयामध्ये समान वागणूक दिली जाते.

१४) आपला सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी विशेष प्रयत्न करणाऱ्या महिलांचे प्रमाण मात्र तुलनेने कमी दिसून आले.

**उपाययोजना :**

१) महिलांची नोकरी आणि कुटुंब या दोन्ही ठिकाणी काम करताना होणारी दैनंदिन धावपळ कमी करण्यासाठी काही कौटुंबिक कामांमध्ये पुरुषांनीही स्वत:हून स्त्रियांना मदत करणे आवश्यक आहे.

२) महिलांना त्यांचा सामाजिक दर्जा उंचावण्यासाठी कार्य करण्यास प्रोत्साहन देऊन सहकार्य करणे आवश्यक आहे.

३) नोकरीमुळे नातेवाईकांना वेळ देऊ न शकल्याने प्रसंगी नातेवाईक नाराज झाल्यानंतर कौटुंबिक कलह निर्माण होण्याचे प्रमाण संशोधनामध्ये अत्यल्प दिसून आले, असले तरी ज्या कुटुंबामध्ये नातेवाईकांच्या नाराजीमुळे कौटुंबिक कलह होतात. अशा कुटुंबातील पुरुषांनी कौटुंबिक कलह निर्माण करण्याऐवजी नातेवाईकांना सर्व बाबी समजावून सांगून त्यांच्या मनामध्ये प्रसंगानुरूप निर्माण झालेले गैरसमज दूर करणे आवश्यक आहे.

**संदर्भ सूची :**


१) वाघ नलिनी - शैक्षणिक संशोधनाच्या पद्धती - धनंजय प्रकाशन, सांगली.

२) देशकर दत्ता - संशोधन पद्धतीची मूलतत्त्वे - अजय प्रकाशन, औरंगाबाद -२००६.

३) भद्रशेटे सुनंदा, प्रा.शेख बी.बी., प्रा.भालेराव बाबासाहेब - भारतातील सामाजिक आंदोलने - अरुणा प्रकाशन, लातूर-२०१०.

४) महाजन संजीव - सामजिक अनुसंधान, सर्वेक्षण एवं सांख्यिकी - अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली - २००४.

५) जागतिकीकरणाचा महिलांच्या दर्जावर झालेला परिणाम - चर्चासत्र स्मरणिका, २२-२३ फेब्रुवारी २०१०.

६) मानवविकासासाठी नैतिक मूल्यांची गरज-चर्चासत्र स्मरणिका, १-२ सप्टेंबर २००७.

७) लोकराज्य मासिक- मार्च २०१०

८) दै. सकाळ - ८ मार्च २०१०

९) महाराष्ट्र टाइम्स - ८ मार्च २०१०

# संघटित क्षेत्रातील कामगार स्त्रियांच्या दर्जाचे समाजशास्त्रीय विश्लेषण

**डॉ. सुशीला फुले**

**प्रस्तावना :**

स्त्रीच्या ठिकाणी स्त्रीत्व आणि पुरुषाच्या ठिकाणी पुरुषत्व हे दोन्ही नैसर्गिक गुणधर्म आपापल्या परीने स्त्री आणि पुरुष यांच्या संदर्भात परस्परांना अनुकूल असतात. निसर्गत: दोहोंपैकी कोणालाच श्रेष्ठ व कनिष्ठ मानायचे नसते. समाज जीवनाच्या पातळीवर हेच तत्त्व मान्य करणे आवश्यक असते.

परंतु मानवी जीवनाचा एकंदरीत मागोवा घेतला तर असे जाणवते की, सर्वकाळ स्त्रियांचा सामाजिक दर्जा सारखा असणे संभवत नाही. विभिन्न कालखंडांमध्ये स्त्री दर्जात चढ-उतार झालेले दिसून येतात. काळानुरूप भारतीय समाजाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय आणि मूल्यात्मक व्यवस्थेत बदल होत गेले आहेत. हे वेळोवेळी झालेले बदल आणि त्या अनुषंगाने स्त्रियांच्या दर्जात झालेले चढ-उतार समजून घेण्यासाठी भारतीय समाजव्यवस्थेच्या सांस्कृतिक, सामाजिक नि आर्थिक पार्श्वभूमीचा ऐतिहासिक मागोवा घेणे आवश्यक आहे.

किमान ५००० वर्षांपर्यंतचा इतिहास भारताच्या पाठीशी उभा आहे. या कालखंडात लोक सुखी आणि समाधानी होते. शिवाय या आरंभीच्या काळात स्त्रीला काही मुख्य प्रवाहात समाविष्ट करून घेण्याचा प्रयत्न केला जात असावा. किमान तिच्या अस्तित्वाची नोंद घेतली जात असावी असे अनुमान काढता येते.

वैदिक कालखंडापासून ते ब्रिटिश कालखंडापर्यंत स्त्रियांच्या स्थानात कस-कसे बदल झाले यासंबंधीची वेगवेगळ्या स्वरूपाची मतमतांतरेसुद्धा आढळून येतात. त्या विचारांचा येथे संघटित क्षेत्रातील कामगार स्त्रियांच्या दर्जाचे समाजशास्त्रीय विश्लेषण या विषयाच्या अनुषंगाने ऐतिहासिक मागोवा घेतला आहे.

डॉ. नॅन्सी रिले या समाजशास्त्रज्ञ म्हणतात की, नावीन्यपूर्ण मार्गाने लघु, मध्यम ग्राम अभ्यास, लोकसंख्या बदल व लिंगभाव अभ्यास, सामाजिक प्रक्रियांचे अभ्यास अशा नव्या पैलूंनी स्त्रियांची अध्ययने व्हायला हवीत. या नव्या आंतरराष्ट्रीय दृष्टिकोनाचा अवलंब आपण संशोधन करताना येथे करायला हवा. या संज्ञेच्या अनुषंगाने स्त्रियांच्या जीवनाची विविध अध्ययन क्षेत्रे आहेत. त्यापैकीच ''संघटित क्षेत्रातील कामगार स्त्रियांच्या दर्जाचे समाजशास्त्रीय विश्लेषण'' करण्याचा प्रयत्न केला आहे.

प्रामुख्याने भारतामध्ये १८ व्या शतकात औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेला प्रारंभ झाल्यानंतर उत्पादनाच्या प्रक्रियेत उत्पादन करणारा घटक म्हणून यंत्राला अतिशय महत्त्व प्राप्त झाले व जस-जसा औद्योगिकीकरणाचा विकास होत गेला तसतसे कामगारांनाही नवनवीन उद्योगांमध्ये महत्त्वाचे स्थान मिळू लागले. त्यांच्याबरोबर कारखान्यातील गरजेनुसार स्त्रियांनादेखील महत्त्व प्राप्त झाले. म्हणजेच औद्योगिकीकरणात स्त्रियांनीसुद्धा गरज म्हणून का होईना मोठ्या प्रमाणात प्रवेश केला.

सारे उद्योग ज्या वेळेस जीव धरत होते तेव्हा 'स्त्री'च्या दु:स्थितीची जाणीव पांढरपेशा समाजाला मुख्यत्वे महाराष्ट्र, बंगाल, पंजाब या प्रदेशात होत होती. तथापि, या जाणिवेत मजूर स्त्रीच्या दु:स्थितीचा अंतर्भाव नव्हता.

सुरुवातीच्या काळात साहित्यात स्त्रीबद्दल लिहिले गेले; परंतु आगरकर, आपटे या समाजसुधारकांनीही या मजूर स्त्रीबद्दल लिखाण केले नाही. दयानंद सरस्वतींचा शिष्यवर्ग पांढरपेशा स्त्रीवर नजर केंद्रित करतो. माध्यम वर्गाबाहेर पाऊल टाकणाऱ्या शरदचंद्र चट्टोपाध्यांच्या कादंबऱ्यांमधून वैष्णवी, भैरवी, त्यक्ता अशा चाकोरीबाहेरच्या अनेक स्त्रिया आहेत; पण ही परंपरा मोडणाऱ्यांचेही लक्ष मजूर स्त्रियांकडे गेलेले नाही. पुढे इंग्लिश उदारमतवादालाही मजूर बायका, मुले यांची दुर्दशा जाणवली नव्हती. मेरी वालस्टनक्राफ्ट व एका शतकानंतरच्या जॉन स्टुअर्ट मिल हे स्त्रियांच्या समतेचे उद्गाते वरच्या कार्यापलीकडे नजर टाकत नाहीत. एकंदरीत कामगार

**समाजशास्त्र विभाग, आय.बी.पी. महिला महाविद्यालय, औरंगाबाद येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत.**

स्त्रियांबद्दल साहित्यात लिखाण झालेले दिसत नाही.

अशा परिस्थितीत 'स्त्री विमोचनाची चळवळ' भारतीय स्त्रियांनी पहिल्या महायुद्धानंतर स्वतःच्या हातात घेतली. समान अधिकारासाठी झगडणाऱ्या या स्त्रियांना मजूर प्रश्नांची अंधुक जाणीव होती; पण त्यांच्या या अर्ध्या कच्च्या प्रयत्नात जीव नव्हता. कारण जागृत स्त्रीच्या अनुभव विश्वाशी मजूर स्त्रीच्या अडचणींचा कोठेही ताळमेळ नव्हता.

कामगार स्त्रीला समान अधिकाराचा उपयोग नव्हता. तिला पाहिजे होती प्रसूतीची रजा, रोज कामाचे तास व दिवसाची वेळ नियमित होणे हे तिला जरूरीचे होते. कारण तिला दिवसात १२ ते १४ तास काम करावे लागे. कामगार स्त्रीला पशुतूल्य वागणूक मिळत असल्याने तिचे स्त्रीत्व मान्य झाल्यास तिच्या जीवनात ती एक क्रांतीच ठरणार होती. औद्योगिक क्रांतीपूर्वीही शेतीशी संबंधित जोडलेल्या सर्व जुन्या व्यवसायात स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने काम करीत होत्या. जसे लोहार, सुतार, कुंभार, बुरूड एवढेच नाही तर गूळ पाडणे इत्यादी कामांत त्या पुरुषांच्या बरोबरीने सहभागी होत्या.

स्त्रिया या पूर्वीपासूनच काम करत होत्या; परंतु त्यांच्या कामाला दर्जा प्राप्त झालेला नव्हता म्हणून प्रत्येक विकासाच्या वा अविकसित क्षेत्रात स्त्रिया कोठे आहेत, त्यांना कोणते स्थान दिले जात होते हे तपासण्याकरिता व त्याचबरोबर आज ज्या स्त्रिया कारखान्यांत काम करत आहेत त्यांच्या स्थानात काही बदल झाला आहे काय? औद्योगिकीकरणातील स्त्रियांची पूर्वीची स्थिती कशी होती आणि सद्य:स्थिती कशी आहे या सर्वांचा सविस्तर अभ्यास या लेखाद्वारे केली आहे.

प्रामुख्याने कामगार वर्गाचे दोन गट पडतात. संघटित संरक्षित कामगार आणि असंघटित असंरक्षित कामगार पहिल्या गटात शासन व्यवस्था निमसरकारी आणि स्वायत्त अर्थसंस्था, सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, खाजगी क्षेत्रातील मोठे उद्योग अशा ठिकाणी मासिक पगारावर नेमलेल्या सेवकवर्गाचा समावेश होतो, त्यात स्त्रियांचाही समावेश होतो.

संघटित क्षेत्रावरील माहितीनुसार असे दिसते की, जिथे कामावर ठेवणे वा काढून टाकणे खूप सोपे असते अशा संघटित क्षेत्रात स्त्रियांची खूप मोठी संख्या आहे. १९९५ च्या जनगणना अहवालानुसार फक्त १५.३६% अशा स्त्रिया संघटित क्षेत्रात काम करतात. संघटित क्षेत्रात सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग त्याचप्रमाणे १० किंवा त्याहून अधिक कामगार काम करीत असलेले खाजगी क्षेत्रातील बिगर शेतीचे उद्यखोग यांचा समावेश होतो. हे क्षेत्र विविध प्रकारचे कायदे व नियम यांनी नियंत्रित झालेले असते. खाजगी क्षेत्रात स्त्रियांची संख्या २६.९ इतकी मर्यादित राहिली तर सार्वजनिक क्षेत्रात पुरुषांच्या तुलनेने स्त्रियांचे प्रमाण कमी आहे.

शेतीच्या क्षेत्रात काम करणाऱ्या स्त्रियांच्या खालोखाल स्त्रिया संघटित उद्योगधंद्यांत व कारखान्यांत काम करतात. औद्योगिक कामगार स्त्रियांची संख्या २३ टक्के इतकी आहे. औद्योगिक क्षेत्रात मजुराला एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून कामावर घेण्यात येते व कामाच्या क्षेत्रात कामगारविषयक कायद्यांमुळे प्रत्येकाला काही संरक्षण उपलब्ध असते.

आंतरराष्ट्रीय श्रम संघटनेने आणि इतर राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांनी अनौपचारिक क्षेत्राच्या पैलूंसंबंधी अनेक अभ्यास केले आहेत. १९६८ मधील ''इनफॉर्मल इन्कम अपॉरच्युनिटीज ॲन अर्बन एम्प्लॉईमेन्ट इन घाना'' या अभ्यासातही संकल्पना प्रथमच किथ हार्ट यांनी वापरली व ते या संकल्पनेचे जनक मानले जातात. ही संकल्पना नागरी भागातील रोजगारात आणि नागरी भागातील लोकांच्या सामाजिक, आर्थिक सर्वेक्षणात मोठ्या प्रमाणात वापरली जाते.

भारतातील श्रमिक किंवा काम करणारा वर्ग नऊ शाखांत विभागलेला असून या सर्वच शाखांत स्त्रिया कमी-अधिक प्रमाणात राबत आहेत. या नऊ शाखांतील स्त्रियांचे ठोकळ मानाने तीन गट करता येतात.

अ) शेती व तत्सम कामांत राबणाऱ्या मुख्यत्वे ग्रामीण स्त्रिया
ब) उद्योगधंद्यामधल्या मजूर स्त्रिया.
क) नोकरी-पेशा, सेवावृत्ती करणाऱ्या स्त्रिया इत्यादी गट पडतात.

शेतीच्या खालोखाल स्त्रिया संघटित उद्योगधंद्यांत व कारखान्यांत काम करतात. १९७७ मध्ये २.०७ कोटी औद्योगिक कामगारांमध्ये स्त्रियांची संख्या .२५ कोटी एवढी होती असे आढळते.

औद्योगिक क्षेत्रात काही अपवाद वगळता एक स्वतंत्र व्यक्ती म्हणून तिला कामावर घेण्यात येते व प्रत्येकाला कामगारविषयक कायद्यांचे संरक्षण दिले जाते.

कामगार स्त्रियांबाबतच्या साहित्याचा मागोवा घेताना एकंदरीतच स्त्रियांच्या दर्जाबाबत विविध विचारवंतांनी आपली मत-मतांतरे मांडलेली आहेत. त्या सर्वांचा मागोवा घेण्यात येत आहे.

**विविध कालखंडांतील स्त्री जीवन :**

१) **वैदिक :** वैदिक व उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा दर्जा बराच वरचा होता; परंतु कालांतराने तिचे सर्व अधिकार हिरावून घेतले. साळुंखे आ.ह. यांच्या 'महाभारतातील स्त्रिया' या ग्रंथात याचे विवेचन आले आहे.

२) **महाकाव्य :** प्रारंभिक स्मृतिकाळ इ.स. पूर्व ६०० ते इ.स. ६०० हा कालखंड स्त्रीबद्दलच्या संक्रमणाचा कालखंड समजला जातो. या काळात तिच्या दर्जाला पुरुषी दृष्ट लागली.

३) **उत्तरकालीन स्मृतिकाळ :** इ.स. ६०० ते १००० हा कालखंड स्त्रियांच्या दृष्टीने धार्मिक आणि सामाजिक संकीर्णतेचा काळ. या काळात तिचा दर्जा फारच खालावत गेलेला दिसून येतो, असे मत आ.ह. साळुंखे यांच्या 'हिंदू संस्कृती आणि स्त्री' या ग्रंथात नमूद केलेले आढळून येते.

४) **मध्ययुगीत कालखंड :** ११०० ते १७०० हा मुस्लिम राजवटीचा कालखंड. याच कालखंडात भारतीय हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मीय स्थिर समाजजीवनाचे उद्ध्वस्तीकरण झाले. स्त्रीला निर्जीव स्थान प्राप्त झालेले आढळते.

५) **ब्रिटिश कालखंड :** इ.स. १७०० नंतर ब्रिटिशांचा अंमल सुरू झाल्यानंतर स्त्री आणि कनिष्ठ जातींना पूर्वी नव्हे ते इतके स्वातंत्र्य मिळाले.

६) **स्वातंत्र्योत्तर कालखंड :** इंग्रजांची राजवट संपुष्टात आली आणि स्त्री स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावल्या, स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास पोषक वातावरण निर्माण झाले.

**धर्मनिहाय स्थान :**

यामध्ये विविध धर्मनिहाय स्थानांचे अवलोकन प्रस्तुत अभ्यासात करण्यात आले. ज्यात हिंदू धर्म, जैन धर्म, बौद्ध धर्म, ख्रिश्चन धर्म, इस्लाम धर्म, यहुदी धर्म, पारशी धर्म इत्यादींचा आढावा घेतला. ज्यात जैन धर्मात व बौद्ध धर्मात काही प्रमाणात स्त्रियांचा दर्जा उंचावलेला आढळून येतो. इतर धर्मांत स्त्रीला दुय्यम दर्जाचे स्थान दिल्या गेल्याचे आढळून आले. असे प्रतिपादन वसंत गजानन राहुरकर यांच्या अभिजात संपुष्टात संस्कृत वाङ्मयात स्त्री या ग्रंथात नमूद केले आहे.

शेतीशी संबंधित सर्वच व्यवसायात स्त्रियांचा दर्जा शोधण्याचा प्रयत्न केला असता. देशपांडे कृ.भा. औद्योगिक सहकार दर्शन या पुस्तकाच्या आधारे.

**घरगुती उद्योग :**

हातमाग, कापड रंगविणे छपाई, कुंभारकाम, कातड्याचा धंदा, मधुमक्षिका पालन, तेल गाळण्याचा धंदा, ताडगूळ उत्पादक, वाखकाम, दोराचा धंदा या प्रत्येक प्रगत उद्योगधंद्यात स्त्रिया सर्व कनिष्ठ जातीतील असल्याचे दिसून येते.

**भारतीय स्त्री कामगारांचा मागोवा :**

उमा कल्पगम म्हणतात की, सर्वच समाजात स्त्री व पुरुष दोघेही काम करतात; पण कामाचे स्वरूप व तीव्रता सर्वत्र सारखी नसते. तसेच काम कशाला म्हणावयाचे हेसुद्धा काळानुरूप व समाजानुरूप बदलते.

आतापर्यंतच्या चर्चेवरून दिसून येते की, स्त्रियांच्या दर्जात कस-कसे चाढ-उतार झालेले आहेत हे दिसून येतात. त्याचप्रमाणे स्त्रिया प्राचीन काळापासून सर्वच क्षेत्रांत काम करत आलेल्या आढळून येतात.

अगदी सुरुवातीच्या काळात म्हणजेच वैदिक काळात त्या शिक्षिका होत्या. तत्त्वज्ञान हा विषय त्या शिकवीत होत्या. नृत्य, गायन कलेचे त्यांना ज्ञान होते. स्त्रिया वैद्यकही होत्या. असे प्रतिपादन आळतेकर ए.एस. यांनी 'द पोझिशन ऑफ वुमेन इन हिंदू सिव्हिलायझेशन' या पुस्तकात केले आहे.

प्राचीन संस्कृतीमधली युद्धाची साधने पुरुषाची व औद्योगिक अवजारे स्त्रीची होती. एस्किमो लोक ज्याला स्त्रीची सुरी किंवा उलू म्हणतात. हे स्त्रीचे हरकामी अवजार असे. शिकार आणून टाकणे पुरुषाचे काम व पुढील सर्व व्यवस्था स्त्रियांकडे असे. शिकार फोडणे, स्वच्छ करणे, वाळवणे इत्यादी. स्त्रीची दृष्टी नंतर साक्षणाकडे वळली. त्यामुळे स्त्री हीच पहिली कुंभार व बुरूड होती. मातीची भांडी भाजून पक्की केल्यावर त्यांचा उपयोग कंदमुळे व धान्य शिजविण्यासाठी झाला. हे मानवाचे पहिले पक्वान्न. असे मत मॅन ॲण्ड वुमन हॅवेलॉक एलास यांच्या पुस्तकातून गीता साने यांनी मांडले आहे.

सूत कातणे व कापड विणणे या कला प्रथम स्त्रियांनी शोधल्या. ''वेदों मे जहाँ जहाँ बुनाई का उल्लेख आया है। वहाँ वयन्ती – बुननेवाली का नाम आया है।'' या शब्दाला पुल्लिंगी रूप नाही. 'स्त्री शक्ती' आचार्य विनोबा भावे यांच्या ग्रंथाच्या आधारावरून गीता साने यांना हा संदर्भ घेतलेला आहे.

विकासाच्या सर्व मागास टोळ्यांत पशुपालन, शेती व अनेक क्षेत्रांमध्ये नवीन गोष्टींची सुरुवात स्त्रीने केली असावी असे अनुमान काढता येते.

''आरंभीच्या वास्तुशास्त्रज्ञही त्याच होत्या'' जगाच्या दरवर पसरलेल्या काफीर, फ्यूजिशयन, पोलिनेशियन, कामाश्वाट्डेल इत्यादी टोळ्यांत 'झोपडी' स्त्री उभारते.

''स्त्री हीच पहिली कृषिवल, जंगल तोडण्याचे कठीण व कष्टाचे काम पुरुष करतात. कुंभारकामाचा आरंभ स्त्रीनेच केला. अत्यंत मागास जातीतून पहार व कुदळ ही शेतीची अवजारे स्त्रियांकडे व पारध पुरुषांकडे असते.'' ''कुंभार कामात शेवत्याचा चाकाचा उपयोग फक्त स्त्रियाच करतात आणि वेगवान चाक मात्र पुरुषाचे दिसते.''

एकंदरीत कामकरी स्त्रिया पुरुषांबरोबर कष्ट उपशीत होत्या. भारतीय जीवनाचा साचाही येथे उद्योग व व्यापार मोठ्या प्रमाणात सुरू झाल्यावर बदलत गेला. पूर्वीच्या काळी प्रतिष्ठा, जात, लिंग, वय या उपाधीवर अवलंबून होती. मात्र यंत्रयुगात गुणांना महत्त्व प्राप्त होऊ लागले व या प्रक्रियेत स्त्रियाही मोठ्या प्रमाणात सहभागी होऊ लागल्या.

पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या उगमापासून स्त्रियांवर नियंत्रण ठेवण्यासाठी या श्रम विभागणीचा वापर केला गेला. उदरनिर्वाहासाठी श्रम करणे हळूहळू मागे पडले आणि असमान सत्तासंबंध निर्माण झाले. लिंगभावावर आधारित श्रमविभागणीला एक नवे आर्थिक व सामाजिक परिमाण लाभले. गेल्या काही शतकांपासून 'काम' या संज्ञेचा अर्थ, स्वरूप व व्याप्ती जरी बदलली असली तरी लिंगभेदावर आधारित श्रमविभागणीत फार फरक पडलेला नाही. या विभागणीचा विचार करताना विविविध कालखंडांत हीच स्थिती होती व आजही तीच प्रचलित आहे असे दिसून येते.

१९ व्या शतकापासून विज्ञान, उद्योगधंदे आणि मानवतावाद इत्यादी बाबींना प्रतिष्ठा मिळाली. स्त्रियांच्या पारंपरिक जीवनपद्धतीला कलाटणी मिळून तिची नवीन औद्योगिक समाजव्यवस्थेत गतिमान वाटचाल सुरू झाली. औद्योगिकीकरणाच्या विकासामुळे स्त्रियांनाही रोजगार उपलब्ध होऊन स्त्रीचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली. या ठिकाणी अर्थोत्पादन स्वतंत्रपणे स्त्रियांना करता आले व त्या आर्थिक क्रियेत सहभागी झाल्या.

**भारताच्या औद्योगिकीकरणाची प्रक्रिया :**

**भारतातील स्त्रियांच्या कामाचो ऐतिहासिक विश्लेषण –** भारत हा तिसऱ्या जगातील देश मानला जातो. या दृष्टीने स्त्रियांच्या कामाचा इतिहास लक्षात घेताना डॉ. किरण मोघे म्हणतात, ''वसाहतवाद – पूर्व भारतातील अर्थव्यवस्थेत जमिनीवर सामुदायिक हक्क होता आणि विशिष्ट जातीच्या कारागिरांकडून गरजेच्या वस्तू आणि सेवांचा पुरवठा केला जात होता. त्या काळात स्त्रिया व पुरुषांना मिळणाऱ्या रोजगारात फारसा फरक नव्हता आणि स्त्रिया देखरेखीचे कामसुद्धा करत होत्या. इंग्लंडमधील औद्योगिक क्रांतीच्या गरजा भागविण्याच्या दृष्टीने भारतातील कच्च्या मालाची अनियंत्रित निर्यात या सर्वांचा स्त्रियांच्या कामावर मोठा परिणाम झाला.''

यासंदर्भात केरळमध्ये एक अभ्यास झाला. त्यात पारंपरिक उद्योगांतील नव्या यांत्रिक बदलांमुळे मोठ्या प्रमाणात स्त्रिया बाहेर फेकल्या गेल्या.

नव्या रोजगार संधी विशिष्ट विभागापुरत्याच मर्यादित होत्या आणि तेथेही नवीन तांत्रिक बदलांमुळे स्त्रियांचे प्रमाण घटले. नवीन उद्योगांत स्त्रियांना फारसे स्थान नव्हते. पुरुष हा कर्ता असतो व स्त्रियांचे काम म्हणजे फक्त उत्पादनात थोडी भर टाकली जाईल असे मानले गेले.

आपल्या देशातून मलमल व तलम या कापडाचे वर्णन करताना स्त्रिया इतके हलके कोळ्याच्या जाळ्याइतके बारीक असे वर्णन इंग्लंडमध्ये केले जाई.

जलद औद्योगिकीकरणासाठी पंचवार्षिक योजना राबविण्यात आल्या. १९५१ ते १९५६ या काळात पंचवार्षिक योजना राबविण्यात आली. त्यात काही प्रमाणात स्त्री कामगारांनाही फायदा मिळाला.

गाडगीळ पां.वा. 'भारताचे आर्थिक नियोजन' भारताच्या या नियोजनाचे महत्त्वाचे उद्दिष्ट देशाचे औद्योगिकीकरणाचे प्रमाण वाढावे हेच होते.

१९९१ च्या जनगणनेप्रमाणे भारताची लोकसंख्या ८४.६३ कोटी होती. त्यापैकी ४३.९४ कोटी पुरुष व ४०.७१

कोटी स्त्रिया होत्या. महाराष्ट्राची एकूण लोकसंख्या १९९१ प्रमाणे ७,८९,३७,१८७ झाली असून त्यात ४,०८२५,६१७ पुरुष आणि ३,८१,११५,६९ स्त्रिया होत्या. महाराष्ट्रातील काम करणाऱ्या एकूण व्यक्ती ३,१०,०६,१०९ असून त्यात पुरुष २,०९,१८,५४१ इतके तर १,००८७,५६८ स्त्रिया होत्या.

मराठवाड्यातील एकूण स्त्री आणि पुरुषांची लोकसंख्या १,२८,०१,६४३ इतकी आहे. पुरुष ६५,९०,६६६ असून स्त्रिया १९,६९,०६७ होत्या. औरंगाबादेतील मुख्यत: काम करणाऱ्या व्यक्ती ८,८६,४८० इतक्या असून पुरुष ५,६२,२१७ इतके होते आणि स्त्रिया ३,२४,२६३ इतक्या होत्या.

औरंगाबादमध्ये एकूण कारखाने ७१६ असून त्यातील कामगार ३३,२५० इतके आहेत. सर्व मिळून २२३३० पुरुष आणि स्त्रिया १०९२० अंदाजे आहेत.

**समारोप :**

एकंदरीत लिखित साहित्याच्या आधारावरून असे म्हणता येईल की, शेती व तत्सम कामातील मुख्यत: ग्रामीण स्त्रिया, उद्योगात काम करणाऱ्या श्रमिक स्त्रिया आणि नोकरी पेशा स्त्रिया या तिन्ही विभागांत स्त्रियांची सर्वच बाबतीत कुचंबणा होताना दिसते. म्हणजेच क्षेत्र कोणतेही असो स्त्रियांना दुय्यम स्थान देऊन वागविले जाते. तसेच समान कामांना समान वेतनाचा कायदा असूनही समाजव्यवस्था अशी आहे की, स्त्री-पुरुषांच्या समानतेला लवकर मान्य करीत नाही. अशा वेळी स्त्रियांची मोठी पिळवणूक होते.

डॉ. मंगला पाटील यांनी त्यांच्या अभ्यासातून पुराव्यासह मांडणी करताना म्हटले आहे की, संघटित क्षेत्रातील स्त्रियांना काम तसे वेतन दिले जात नाही. शिवाय स्त्रियांनी नोकरी केल्याने त्यांचे चारित्र्य बिघडते, त्या चैनीसाठी नोकरी करतात, त्यांना नोकरी दिल्याने बेकारी वाढते हा निराधार व दूषित दृष्टिकोन दिसून येतो.

त्याचप्रमाणे कायद्याचे फायदे व तोटे आहेत. कायदा न झाल्यास स्त्रियांची पिळवणूक होते; पण कायदा झाला व त्यांची अंमलबजावणी समाधानकारक झाली नाही, तर स्त्रियांच्या पोटापाण्याचे साधन नष्ट होते.

कायद्याप्रमाणे स्त्रीला रात्रपाळी देता येत नाही. प्रसूतीचा लाभ द्यावा लागतो. मुलांसाठी पाळणाघरे उघडावी लागतात. या सवलतींचा खर्च उद्योगावर पडू लागतो. त्यामुळे मजूर स्त्री कमी करण्याकडे मालकाचा कल होऊ लागतो. अशा तऱ्हेने स्त्रियांच्या हितासाठी अमलात येणारा कायदा तिच्यावर उलटतो व तिला रोजगार संधीस मुकावे लागते.

एकंदरीतच स्त्रीच्या जीवनात कितीही आर्थिक सुबत्ता आली, स्त्रियांनी कितीही कर्तबगारी दाखविली, राहणीमान सुधारले तरीही तिचा दर्जा दुय्यमच असेल असे म्हणावे लागेल.

आजच्या दृष्टीने ही बाब फार गंभीर चिंतनीय आहे. यावर साधक-बाधक चर्चा होऊन काही उपाय शोधले पाहिजे.

**संदर्भ ग्रंथसूची :**

१) साळुंखे आ.ह. : 'महाभारतातील स्त्रिया' प्रकाशन राकेश आ. साळुंखे, 'लोकमत', १३, यशवंतनगर, सातारा, १९९३, पृष्ठ ११३.

२) खंडागळे चंद्रकांत : भारतीय समाज, प्रकाशन सौ. मायादेवी खंडागळे, गणेशनगर, सांगली, जुलै १९९८, पृष्ठ १२०, १२१, १२९

३) कुलकर्णी एम.जी. : भारतीय समाजव्यवस्था, श्री. बा. दाशरथे, परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १० नोव्हेंबर १९८७, पृष्ठ २, १०.

४) कोलाटकर श.गो. : भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, २९ मार्च १९८५, पृष्ठ २, ३.

५) काचोळे, दा.धों. : भारतीय सामाजिक विचारवंत, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद. १९९९, पृष्ठ ९, २२, २३, २४, ४०, ४४.

६) कोलाटकर श.गो. : भारताचा इतिहास, मंगेश प्रकाशन, नागपूर, २९ मार्च १९८४, पृष्ठ ५५.

७) बोबडे प्रकाश : भारतीय समाजरचना, पारंपरिक आणि आधुनिक, नागपूर, प्रकाशन १९८८, पृष्ठ १७.

८) साळुंखे आ.ह. : हिंदू संस्कृती आणि स्त्री, प्रकाशन राकेश आ. साळुंखे, लोकमत १३, सातारा, डिसेंबर १९८९, पृष्ठ ४

९) अळतेकर ए.एस. : पोझिशन ऑफ वुमेन इन इंडिया सिव्हिलायझेशन, प्रकाशक सुंदरलाल जैन, जवाहरनगर, दिल्ली-६, १९६२, पृष्ठ ४७.

१०) पांडे रेखा : 'वुमन इन इंडिया पास्ट ॲण्ड प्रेझेन्ट', पब्लिकेशन अलाहाबाद इंडिया, १९९०, पृष्ठ १७, १८, १११.

११) अनंतराम शरयू वंडसे उमा : 'भारतीय समाजातील स्त्रियांचे स्थान', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९७, पृष्ठ १६, १११, ११६.
१२) साळुंखे आ.ह. : 'हिंदू संस्कृती आणि स्त्री', प्रकाशन मुंबई, १९८९, पृष्ठ १०७, १०८, १५७.
१३) साने गीता : 'भारतीय स्त्री जीवन', मौज प्रकाशन, मुंबई, ऑगस्ट १९८०, पृष्ठ ११, १२, १०५, १०७, १२९.
१४) हाटे चंद्रकला : 'स्वातंत्र्योत्तर काळातील भारतीय स्त्रियांचा दर्जा', महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८५, पृष्ठ २, ११, १२, १८.
१५) देशमुख प्रभाकर : 'श्रमाचे अर्थशास्त्र', विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७, पृष्ठ १२, १३.
१६) बाबर सरोजिनी : 'भारतीय स्त्री, स्त्री शिक्षण', हिंगणे माणिक, महोत्सव प्रकाशन, कर्वेनगर, पुणे १९६७.
१७) मून वसंत : 'बुद्धकालीन स्त्री जीवन', १६, सदाशिव पेठ, पुणे, १९८९, पृष्ठ ३५.
१८) वाघ उषा : 'बुद्धकालीन स्त्री जीवन', वसंत भवन, सुगावा प्रकाशन, पुणे, १९८९, पृष्ठ २४, ३४.
१९) गाडगीळ ध. रा. : 'द इंडस्ट्रियल रिव्होल्यूशन ऑफ इंडिया' इन रिसेंट टाइम्स, एशिया हाऊस, मुंबई, पृष्ठ २०७.
२०) माने मीनाक्षी : 'स्त्री कामगार आणि इतर महिला', प्रकाशक के.रा. पालकर, चिटणीस हिंगणे, पुणे, १९६७, पृष्ठ ३०७, ३०६.
२१) देवल मीना : 'वार्षिक अंक स्त्री उवाच', फाळके मार्ग, नीरा आडारकर, मुंबई, १९९१, पृष्ठ ९६, ९७, ९९, १००.
२२) घोष पी.जी. : घोरपडे एम.एस., 'इंडस्ट्रियल सायकॉलॉजी' हिमालय पब्लिकेशन, नवी दिल्ली, १९८१, पृष्ठ २, ३.
२३) गाडगीळ पां.वा. : 'भारताचे आर्थिक नियोजन', सु.के. जोशी प्रकाशन, टिळक मार्ग, पुणे, १९७०, पृष्ठ १, २, ११.
२४) देशपांडे कृ.भा. : 'औद्योगिक सहकार दर्शन', ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मुख्य सदस्य, प्रकाशन पुणे, १९६३, पृष्ठ १, २, ३, ४, ८, ११, १२, १३.
२५) आंबर्डेकर ना.श., पाटील ज.फा. : 'भारतीय कामगार समस्या व कामगार विधान', प्रकाशन महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती, विजयानगर, पुणे, १९७९, पृष्ठ २.
२६) कुचेल एस.सी. 'द इंडस्ट्रियल इकॉनॉमी ऑफ इंडिया', १९८६, पृष्ठ ३०.
२७) रायखेलकर, डांगे : 'औद्योगिक अर्थशास्त्र', नाथ प्रकाशन, औरंगाबाद, १९९८, पृष्ठ ८३.
२८) रिपोर्ट ऑफ इ इंडियन इंडस्ट्रियल कमिशन, १९१६, पृष्ठ १८.
२९) नाडगोडे गुरुनाथ : 'औद्योगिक समाजशास्त्र', प्रकाशन नागपूर, पृष्ठ ८२, ८३, ८४.
काळदाते सुधाताई : 'औद्योगिक समाजशास्त्र', नाथ प्रकाशन, औरंगाबाद. पृष्ठ २, २९.
३०) शर्मा जी.के., गिरी व्ही.व्ही. : 'द इंडस्ट्रियल पर्थर्स', पब्लिकेशन मुंबई, पृष्ठ ८३
३१) देसाई के.जी. : 'ह्यूमन प्रॉब्लेम इन इंडियन इंडस्ट्रीज', सिंधू प्रकाशन, मुंबई, १९६९, पृष्ठ १६७.
३२) महेनत कश महिलाओं पर आयोग के लिए आलेख, श्रीकृष्ण स्मारक भवन, पटना, १५ मार्च १९९४, पृष्ठ, २, ३, ४, ९३, ९४, २२५.
३३) महाराष्ट्रातील उद्योग धंदे : 'महाराष्ट्र', दास्ताने रामचंद्र आणि कं. पुणे, १९८९, पृ. ९० किंता पृष्ठ ५, २१०, २११.
३४) मुळे/महाजन धनश्री : 'इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट ऑफ मराठवाडा रिजन', दास्ताने प्रकाशन, पुणे, १९९६, पृष्ठ ८९, ९०, ९१.
३५. महाराष्ट्राची आर्थिक पाहणी, १९९८-९९.
३६. अर्थ व सांख्यिकी संचालनालय, पृष्ठ ९९, २२५. मराठवाडा उद्योजकता विकास खंड २००८, पृष्ठ २१, २९, ६९, ७२.

# सांगली जिल्ह्यातील वैवाहिक संबंधातील अन्यायग्रस्त पुरुष आणि त्यांच्या जोडीदारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी*

**डॉ. तुकाराम थोरात**

**प्रस्तावना :**

देशभर नव्हे तर जगभर महिलांच्या अत्याचारांत सातत्याने वाढ होत असल्याचे कटूसत्य असले तरी बहुतांश विवाहित पुरुषही महिलांच्या अरेरावीने हतबल बनलेले आहेत. याचे उत्तम उदाहरण म्हणजे पोलिस विभागाशी संलग्न व महिलांच्या मदतीसाठी कार्यरत असणाऱ्या महिला सहायक कक्षाकडे सुमारे साठ टक्के तक्रारी या पुरुषांकडून येत आहेत. बायको नांदण्यास नकार देते, घालून-पाडून बोलून त्रास देते आदीसह सून छळ करते असा सासरेबुवांचाही सूर या तक्रारींमध्ये वाढत आहे. महिलांवरील वाढते अत्याचार एकीकडे असताना याउलट काही ठिकाणी पुरुषांवर अरेरावीच्या तक्रारीही गंभीर स्वरूपाच्या बनल्या असल्याने कुटुंबव्यवस्थेचा ढाचा डळमळत असल्याचे हे चिन्ह आहे. ''स्थानिक गुन्हा अन्वेषणशी संलग्न कक्ष असणाऱ्या महिला सहायता कक्षाकडे २००६ मध्ये एकूण २७२ कौटुंबिक कलहाच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. २००८ मध्ये हे प्रमाण २९१ इतके होते. महिलांच्या मदतीसाठी सामोपचाराने तोडगा काढून कुटुंबव्यवस्था बळकट करण्यासाठी हा कक्ष काम करतो. तक्रारींचे मूल्यमापन करून प्रतिष्ठित लोकांच्या मदतीने संसाराची दोर तुटण्यापेक्षा बळकट करण्याकडे सहायता कक्षाचा कल असतो. त्यामुळे विवाहितांच्या छळाबाबत मोठ्या प्रमाणावर तक्रारी या कक्षाकडे येत असतात. परंतु अलीकडे महिलांपेक्षा पुरुष मंडळी पत्नीच्या अरेरावीबद्दल तक्रारी करू लागले आहेत. याचे प्रमाण एकूण तक्रारींच्या साठ टक्के इतके आहे'' (पाटील विजय, २००९: ३).

आजच्या मानवाला दारिद्र्य; निरक्षरता; बेरोजगार; राहत्या घराची टंचाई; एकाकीपणा; अपेक्षाभंग; जीर्ण स्वरूपाचे आजार; वैवाहिक संबंधातील समस्या इत्यादी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. परित्यक्तांची समस्या, पत्नीला होणारी मारहाण यासारख्या वैवाहिक संबंधातील स्त्रियांशी संबंधित समस्यांप्रमाणेच अलीकडच्या काळात वैवाहिक संबंधातील अन्यायग्रस्त पुरुषांची समस्या हीदेखील एक सामाजिक समस्या म्हणून उद्भवली असल्याचे निदर्शनास येते.

एकविसाव्या शतकात यंत्रयुगाच्या प्रभावामुळे, औद्योगिकीकरण व नागरीकरणामुळे सामाजिक व आर्थिक परिस्थिती बदलली आणि संयुक्त कुटुंबे विस्कळीत होऊन विभक्त बनली. साहजिकच कुटुंबाच्या कार्यातही मोठ्या प्रमाणात बदल झाला. कुटुंबातील सदस्य संख्या मर्यादित झाली. व्यक्तीच्या वर्तणुकीवर कोणा मोठ्याचा धाक राहिला नाही. विभक्त कुटुंबामध्ये देखील व्यक्ती पूर्णपणे समाधानी नसते, मूळ गाव सोडून शहरात स्थिर झालेल्या लोकांना अनेक शहरी समस्यांना तोंड द्यावे लागते. बेकारी, आर्थिक चणचण, यासारख्या समस्यांमधून व्यक्तींना अनेक ताण-तणावांना तोंड द्यावे लागते. संघटित सामाजिक जीवन विस्कळीत झाले. त्यामुळेच गुन्हेगारी, व्यसनाधीनता, मानसिक विकृती यासारख्या समस्या व्यक्ती विघटनामुळे निर्माण झाल्या. समाजात जुनी सामाजिक नियमने कमकुवत झाली. म्हणून पूर्वीच्या सामाजिक नियमनांचा प्रभाव कमी झाला. यातून पुढे सामाजिक विघटन होऊन, समाजामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या. अशाच सामाजिक विघटनाच्या परिस्थितीतून वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त पुरुषांची समस्या' निर्माण झाली आहे असे म्हणता येईल.

''भारतातील विवाहित पुरुषांच्या आत्महत्या, विवाहित महिलांच्या आत्महत्यांपेक्षा दुप्पट झाल्या असल्याची नोंद 'नॅशनल क्राईम रेकॉर्डस् ब्युरोने' केली आहे. २००७ मध्ये ५७,५९३ विवाहित पुरुषांनी, तर ३०,०६४ विवाहित महिलांनी आत्महत्या केल्या. यातील ३० टक्के म्हणजे १६,५०० विवाहित पुरुषांनी कौटुंबिक अत्याचारास कंटाळून आत्महत्या केलेल्या आहेत. पुरुषांच्या आत्महत्येत मागील वर्षापेक्षा ३.८७ टक्के वाढ झाली असून, मागील दहा वर्षांत २८ टक्के वाढ झाली आहे. १९९६ मध्ये कौटुंबिक अत्याचाराच्या आत्महत्या ११,५००

**समाजशास्त्र विभाग, कमला महाविद्यालय कोल्हापूर येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत.**

होत्या. म्हणजे सरासरी वर्षाकाठी १४,८०० विवाहित पुरुष कौटुंबिक अत्याचारांमुळे आत्महत्या करीत आहेत. गेल्या ११ वर्षांत १,५६,५०० पुरुषांनी अत्याचारांमुळे आत्महत्या केल्या. कमकुवत, बेजबाबदार, आर्थिकदृष्ट्या त्रस्त या कारणांनी पुरुषाने आत्महत्या केल्याचे सांगितले जाते, पण नॅशनल क्राईम रेकॉर्डस्च्या नोंदीप्रमाणे केवळ पाच टक्के आत्महत्या आर्थिक बाबीपायी झाल्या. मागील वर्षीच्या तुलनेत विवाहित महिलांच्या आत्महत्येत ०.६५ टक्के वाढ, तर पुरुषांच्या आत्महत्येत ३.८७ टक्के म्हणजे सहापट वाढ झाली आहे. ८३ टक्के पुरुषांच्या आत्महत्या ३० ते ५९ वयोगटातील आहेत. बनावट हुंडा प्रकरणे, भा.दं.वि. ४९८ (अ) चा गैरवापर, पुरुषांविरुद्ध असलेले कौटुंबिक कायदे यामुळे विवाहित पुरुषांच्या आत्महत्या वाढल्या आहेत'' (प्रतिनिधी, दैनिक लोकमत, २००८: २).

भारतात पत्नीच्या छळापायी दररोज २१६ पती आत्महत्या करीत आहेत. त्यामुळे पुरुषमुक्तीची खऱ्या अर्थाने गरज असल्याचे दिसते. 'नॅशनल क्राइम ब्यूरो ऑफ रेकॉर्ड' ने जारी केलेल्या अहवालानुसार **भारतात दर नऊ सेकंदाला पत्नीच्या छळापायी एका पुरुषाला आत्महत्या करावी लागते.** म्हणजेच दिवसाला २१६ पती आत्महत्या करतात. दररोज हजारो पुरुषांविरुद्ध महिलांकडून 'भादंवि कलम ४९८- अ' प्रमाणे खोट्या फिर्यादी पोलिस ठाण्यात दाखल होत आहेत. याविषयी भारतात सर्वप्रथम पुरुष हक्क संरक्षण समितीने १९९६ मध्ये आवाज उठविला. अन्यायकारक कायद्यात बदलांची मागणी केली. समितीच्या कार्याला सुरुवातीला हिणवल्यावर आज मात्र त्याची गरज असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. सरकार याबाबत उदासीन आहे. महिलांच्याच बाजूने कायदे करण्याच्या सरकारी धोरणामुळे, काही महिला ४९८-अ या कलमाचा दुरुपयोग करतात. त्यामुळे कुटुंबव्यवस्था उद्ध्वस्त होत आहे.

भारतीय दंडविधान संहितेतील कलम ४९८-अ या कलमाचा महिलांकडून मोठ्या प्रमाणात दुरुपयोग होत असून, पती व सासरच्या लोकांविरुद्ध सर्रास खोटे खटले दाखल करून ब्लॅकमेल करण्याचे प्रकार सुरू आहेत. बलात्काराच्या कलम ३७६, तसेच विनयभंगाचा कलम ३५४ व छेडछाडीचा कलम ५०९ या कलमांचाही महिला दुरुपयोग करून आपण स्त्री आहोत याचा गैरफायदा घेत आहेत. त्यामुळे समाज व्यवस्था बिघडत चालली आहे. महिलांना कायद्याने पतीकडून पोटगीचा अधिकार दिल्याने सरकारी नोकरीत असणाऱ्या महिलाही न्यायालयाची दिशाभूल करून पोटगीचा खोटा अर्ज सर्रास दाखल करताना दिसतात.

स्त्रियांच्या सबलीकरणाच्या प्रश्नाची जटिलता कायम असताना या सबलीकरणाच्या प्रयत्नांचा एक 'आफ्टर इफेक्ट' मात्र गेल्या काही वर्षांत समोर येऊ लागला आहे. कौटुंबिक छळापासून विवाहित स्त्रीच्या संरक्षणासाठी निर्माण केल्या गेलेल्या '४९८- अ' या विशेष कायदेशीर कलमाची तरतूद अनेक पुरुषांच्या मानसिक छळाला कारणीभूत ठरत असल्याच्या तक्रारी वाढू लागल्या आहेत. व्यक्तिगत आकसापोटी अत्यंत क्षुल्लक कारणांचा बाऊ करून नवऱ्याला, सासरच्या कुटुंबाला थेट गजाआड करण्यासाठी स्त्रिया '४९८ अ' या कलमाचा बिनदिक्कत गैरवापर करतात. शारीरिक-मानसिक छळाची तक्रार करणाऱ्या स्त्रीचा नवरा आणि त्यांचे कुटुंबीय दोषी आहेतच, असे गृहीत धरणाऱ्या या कलमातील (पुरुषांवर) अन्यायकारक तरतुदी बदलाव्यात अशी मागणी जोर धरू लागली आहे.

''कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायद्याचा (४९८ अ) गैरवापर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे सरकारच्या गृहविभागाच्या लक्षात आले असून हा गैरवापर टाळण्यासाठी या विभागाने एक परिपत्रक काढून पोलीस खात्यास सूचना दिल्या असून यापुढे तक्रारित तथ्य असेल तरच सासरच्या मंडळींवर कारवाई होईल'' (दैनिक सकाळ, २०१०:२).

''पुरुष हक्क संरक्षण समितीच्या स्थापनेनंतर पुरुषांना आपल्या हक्कांची व अन्यायाची जाणीव झाली आहे. सेव्ह इंडिया फॅमिली फाऊंडेशन, कुटुंब बचाव अभियान, पुरुषमुक्ती संघटना अशा अनेक संघटना स्थापन झाल्या असून, भारतात दिल्ली, मुंबई, बेंगलोर, चेन्नई, कोलकाता, अहमदाबाद, पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांत या संघटनांचे जाळे वाढत आहे. पुरुष हक्क संरक्षण समितीत तर महिला कार्यकर्त्यांचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. पुरुषांना आपल्या हक्कांची माहिती देताना अन्यायकारक कायद्यात बदलांची मागणी आता केंद्र सरकारपर्यंत पोचली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती बालकृष्णन यांनीही महिलांकडून कायद्याचा दुरुपयोग होत असल्याचे मान्य केले आहे. उच्च व सर्वोच्च न्यायालयातील अनेक निकालांत ही बाब उघड झाली आहे. तरीही सरकार 'कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा' अशा गोंडस नावाने महिलांना अधिक संरक्षण देत आहे. 'युनो' ने तर '१९ नोव्हेंबर हा जागतिक पुरुष हक्क दिन' म्हणून जाहीर केला असून, भारतात आता हा दिवस मोठ्या प्रमाणात साजरा होत आहे'' (चव्हाण धर्मेंद्र, २०१०: १, ८).

''पुरुषांनाही संरक्षण हवे : अनेकदा महिलांकडून पुरुषांवर सूड उगविण्यासाठी कायद्याचा वापर केला जातो. ४९८ (अ) या कायद्याचा वापर सध्या सूडबुद्धीने केला जात असल्याचे उच्च न्यायालयानेही मान्य केले आहे. भारतीय राज्यघटना व कायद्यासमोर सर्व समान आहेत. अत्याचारित महिला असेल, तर ती अबला. तिला कायद्याने संरक्षण मिळते; पण पतीचा विचार कायद्यात होत नाही. पुरुषांना संरक्षण मिळत नाही. 'राईट टु जस्टिस'चा नियम पूर्ण पाळला जात नाही, अशी प्रतिक्रिया मानवी हक्क प्रखर शोधमोहिमेचे जिल्हाध्यक्ष ॲड. शिवाजी सांगळे यांनी व्यक्ती केली'' (पेंढार प्रदीप,२०१०: ८).

''खोटे आरोप करून कलम '४९८-अ'नुसार बोगस तक्रार दाखल करणाऱ्या पत्नीने पतीचा व त्याच्या नातेवाईकांचा मानसिक छळ केल्याचे निरीक्षण मुंबई उच्च न्यायालयाने नोंदविले असून, पतीला घटस्फोट घेण्याची परवानगी दिली आहे. कलम '४९८-अ' खालील तक्रारींबाबत हा निर्णय महत्त्वाचा व दूरगामी परिणाम करणारा ठरू शकतो'' (महामुणकर सुनीता, २०१०: २).

**संशोधन समस्या**

एक सामाजिक समस्या या दृष्टिकोनातून, सांगली जिल्ह्यातील पुरुष हक्क संरक्षण समितीचे सदस्य असलेल्या पुरुष सदस्यांच्या निवडलेल्या नमुन्याच्या संदर्भात, वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुष आणि त्यांचे वैवाहिक जोडीदार यांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी समजून घेणे ही प्रस्तुत शोधनिबंधाची समस्या आहे.

अध्ययनाचे उद्दिष्ट : वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुष आणि त्यांच्या वैवाहिक जोडीदारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

**अध्ययनाचे क्षेत्र :**

प्रस्तुत संशोधन महाराष्ट्र राज्यातील सांगली जिल्ह्यातील पुरुष हक्क संरक्षण समितीचे सभासद असलेल्या 'अन्यायग्रस्त' पुरुषांपुरते मर्यादित आहे.

**संशोधन आराखडा :**

प्रस्तुत संशोधनासाठी अन्वेषनात्मक-वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा (Exploratory-Descriptive Research Design) अवलंब करण्यात आला आहे.

**अभ्यास समग्र आणि नमुना निवडीचा आराखडा :**

सांगली जिल्हा अध्ययनासाठी हेतुनिष्ठ नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling) निवडण्यात आला. शहरी तसेच ग्रामीण भागातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांचा नमुना प्रस्तुत अध्ययनासाठी निवडण्यात आला.

सांगली येथील पुरुष हक्क संरक्षण समितीच्या कार्यालयातून प्राप्त केलेल्या माहितीनुसार सांगली जिल्ह्यातील एकूण १५१२ व्यक्तींनी वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' सदस्य (Victims of Violence In Marital Life) म्हणून नाव नोंदणी केली होती. यापैकी १५०० इतके पुरुष होते तर १२ स्त्री सभासद होत्या. पुरुष हक्क संरक्षण समितीचे सभासद असणारे १५०० पुरुष (शहरी भागातील ६०० व ग्रामीण भागातील ९००) हा प्रस्तुत अभ्यासाठीचा अभ्यास समग्र (Universe) आहे.

वरील अभ्यास समग्रातील १५० (१०%) सदस्यांची निवड हेतुपूर्वक नमुना-निवड तंत्राच्या साहाय्याने (Purposive Sampling Technique) करण्यात आली.

नमुन्याअंतर्गत ९० पुरुष ग्रामीण भागातील असून उर्वरित ६० पुरुष शहरी भागातील आहेत. ग्रामीण व शहरी भागातील समग्रामध्ये जे प्रमाण आहे तेच प्रमाण नमुना निवडीत ठेवले आहे.

अशा रीतीने शहरी भागातून ६० आणि ग्रामीण भागातून ९० अशा एकूण १५० पुरुषांची निवड प्रस्तुत अभ्यासाठीचा नमुना (Sample) म्हणून करण्यात आली.

**तथ्य संकलनासाठी वापरण्यात आलेली तंत्रे :**

प्रस्तुत संशोधनासाठी प्राथमिक आणि दुय्यम अशा दोन्ही माहिती स्त्रोतातून तथ्यांचे संकलन करण्यात आले आहे.

**अ) प्राथमिक स्त्रोत -**

मुलाखत अनुसूचीच्या साहाय्याने १५० पुरुषांच्या आणि ९ पुरुष हक्क संरक्षण समितीचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्यांच्या मुलाखती घेऊन तथ्ये संकलित केलेली आहेत.

**ब) दुय्यम स्त्रोत -**

पुरुष हक्क संरक्षण समितीचे कार्यालयातील कागदपत्रे, पुस्तके, अहवाल, संशोधन, नियतकालिके, वर्तमानपत्रे, इंटरनेट, पुरुष संघटना संबंधी संकेतस्थळ इत्यादी हे तथ्यांचे दुय्यम स्त्रोत आहेत.

**तथ्य संकलन :**

संशोधकाने प्रत्यक्ष पुरुषांना विश्वासात घेऊन, त्यांच्याशी चर्चा करून तसेच पुरुष हक्क संरक्षण समितीचे पदाधिकारी, कार्यकारिणी सदस्य यांच्या मुलाखती घेऊन मे २००८ ते जानेवारी २००९ दरम्यान तथ्ये संकलित केलेली आहेत.

मुलाखत अनुसूची भरतांना पुरुषांचे हावभाव आणि दिलेल्या प्रतिक्रियांचे निरीक्षण केले.

**अन्यायग्रस्त पुरुष आणि त्यांच्या जोडीदारांची सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी :**

पुरुष आणि त्यांच्या वैवाहिक जोडीदारांना पुढील मुद्यांच्या आधारे प्रश्न विचारले आणि त्यामधून दिसून आलेली ठळक निरीक्षणे पुढील प्रमाणे आहेत.

१. **वय :** बहुतांश (५२.७%) पुरुषांचा वयोगट ३१ ते ४० आहे. निम्म्या (५०%) जोडीदारांचे वय २१ ते ३० आहे. बहुतांश पुरुष आणि त्यांच्या वैवाहिक जोडीदाराच्या वयात १० वर्षापेक्षा अधिक अंतर आहे.

२. **पार्श्वभूमी :** बहुतांश पुरुषांचा राहण्याचा विभाग आणि त्यांच्या जोडीदारांचा माहेरचा विभाग समान आहे. विभाग (ग्रामीण/शहरी) भिन्नतेचा परिणाम पुरुष 'अन्यायग्रस्त' होण्यावर प्रभावी झाला नसल्याचे दिसून आले आहे.

३. **धर्म:** बहुतांश (८६%) पुरुष हिंदू धर्माचे आहेत.

४. **शिक्षण :** बहुतांश (९८%) पुरुष शिक्षित आहेत. १५० पुरुषांपैकी बहुतांश (१४४) पुरुषांचा जोडीदार, त्यांच्यापेक्षा कमी शिकलेल्यांची संख्या ९२ आणि जास्त शिकलेल्यांची संख्या २२ आहे. पुरुष आणि त्यांच्या जोडीदारातील ही शिक्षणाची असमान परिस्थिती शैक्षणिक दर्जाची भिन्नता आणि वैचारिक भिन्नता दोघांमध्ये निर्माण होऊन पुरुष 'अन्यायग्रस्त' होण्यामागील हे एक कारण असू शकते.

५. **व्यवसाय :** (४६%) पुरुष नोकरी करणारे आहेत. (४८%) जोडीदार फक्त घरकामच करतात तर (५२%) नोकरी/व्यवसाय करणारे आहेत.

६. **व्यवसाय विवाहपूर्व/विवाहानंतर :** बहुतांश (९४%) पुरुष विवाहापूर्वीपासूनच आपला व्यवसाय/नोकरी करतात. विवाहानंतर व्यवसाय/नोकरी करणाऱ्या जोडीदारांची संख्या (३०%) तर विवाहपूर्वीपासून (२२%) जोडीदार व्यवसाय/नोकरी करीत असल्याचे दिसून येते.

७. **जोडीदाराला व्यवसायासाठी/नोकरीसाठी पुरुषांची संमती :** पुरुषांचे (४८%) जोडीदार फक्त घरकामच करीत असल्याने संमतीचा प्रश्नच येत नाही. त्या खालोखाल पुरुषांच्या संमतीशिवाय (४६%) जोडीदार व्यवसाय / नोकरी करीत असून पुररुषांच्या संमतीने व्यवसाय / नोकरी करणाऱ्या जोडीदारांची संख्या अगदीच नगण्य असल्याचे दिसून येते. त्यामुळे पुरुषांच्या संमतीशिवाय (४६%) जोडीदार व्यवसाय / नोकरी करीत असल्याने पुरुष 'अन्यायग्रस्त' होण्याचे हे एक कारण असू शकते.

८. **मासिक उत्पन्न :** बहुतांश (५४%) पुरुष रु. ५०००/- पर्यंत मासिक उत्पन्न असलेले आहेत. ४८% जोडीदार घरकामच करीत असल्याने मासिक उत्पन्नाचा प्रश्नच येत नाही. ५२% जोडीदार आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी असल्याने ते पुरुषांवर अवलंबून नाहीत व पतीचा आदर ठेवत नाहीत.

९. **कुटुंबाचा प्रकार :** बहुतांश (७६%) पुरुष संयुक्त कुटुंबातील आहेत. तर (७८%) जोडीदार विभक्त कुटुंबातील आहेत.

१०. **कुटुंबातील सदस्य संख्या :** बहुतांश (६८%) पुरुषांच्या कुटुंबातील सदस्यांची संख्या ६ आणि ८ तर (६६%) सासरच्या कुटुंबातील सदस्य संख्या ४ आणि ५ असल्याचे दिसून येते.

११. **कुटुंबातील कमावणाऱ्यांची संख्या :** बहुतांश (५४%) पुरुषांच्या कुटुंबातील अर्थोत्पादन करणाऱ्या सभासदांची संख्या २ असून जवळ जवळ निम्म्या (४८%) पुरुषांच्या सासरच्या कुटुंबातील कमावणाऱ्यांची संख्या १ आहे.

१२. **कुटुंबातील सदस्यांची शैक्षणिक स्थिती :** काही साक्षर आणि काही निरक्षर ही शिक्षणाची स्थिती बहुतांश (७४%) पुरुषांच्या आणि त्यांच्या सासरच्या कुटुंबातील सदस्यांची आहे.

१३. **कुटुंबाचे मासिक उत्पन्न :** पुरुषांच्या कुटुंबाचे मासिक उत्पन्न तुलनात्मकदृष्ट्या सासरच्या कुटुंबाच्या मासिक उत्पन्नापेक्षा जास्त असल्याचे दिसून येते.

१४. **आवडी-निवडी व स्वभाव :** बहुतांश (९०%) पुरुष व त्यांचे जोडीदार यांच्या आवडी-निवडी आणि स्वभाव परस्परविरोधी असल्याचे दिसून येते.

**'अन्यायग्रस्त' पुरुषांची सामाजिक - आर्थिक पार्श्वभूमी कशी असते याबाबत आणि इतर बाबींसंदर्भात पुरुष हक्क संरक्षण समितीच्या ९ पदाधिकाऱ्यांनी** आपली मते खालीलीप्रमाणे मांडली आहेत.

१. स्त्रीधार्जिण्या कायद्यातील तरतुदींचा दुरूपयोग करून ज्याच्यावर स्वत:च्या पत्नीकडून किंवा अन्य स्त्रीकडून त्रास, छळ अन्याय झाला आहे अशा पुरुषास ‘अन्यायग्रस्त’ पुरुष म्हणावे असे मत सर्व (नऊ) पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केलेले आहे.

२. ‘अन्यायग्रस्त’ पुरुष विभक्त व अविभक्त अशा दोन्ही कुटुंब पद्धतीमध्ये असतो. अविभक्त कुटुंब पद्धतीमध्ये कुटुंबातील इतर व्यक्तींच्या हस्तक्षेपामुळे पती - पत्नीमधील संबध जास्त दुरावतात असे दिसते तर विभक्त कुटुंब पद्धतीमध्ये पती - पत्नीमध्ये समेट घडवणारे कुटुंबीय नसतात म्हणून त्यांचे संबंध दुरावतात.

३. शिक्षण कितीही असो जर पती-पत्नीमध्ये सामंजस्य असेल तर त्यांच्यात भांडणे कमी होतात. १० वीपर्यंत शिक्षण असलेल्यामध्ये वैचारिक बैठक हवी तेवढी प्रगल्भ नसते; त्यामुळे त्यांच्यात भांडणे जास्त होतात व पुरुष ‘अन्यायग्रस्त’ होतो.

४. ज्या अन्यायग्रस्त पुरुषाची आर्थिक परिस्थिती मध्यम आहे, तो दैनंदिन मूलभूत गरजा पूर्ण करताना मेटाकुटीला येत असतो, त्यामुळे तो आर्थिक, मानसिकरीत्या खचलेला असतो. साहजिकच एकमेकांशी तडजोड करण्यात अशी जोडपी कमी पडतात, ज्यांची आर्थिक स्थिती अगदी बेताची आहे त्यांनाही आर्थिक अडचणीमुळे पत्नीची भुणभुण सहन करावी लागते, तर आर्थिक स्थिती चांगली असणाऱ्यांमध्येही पुरुष ‘अन्यायग्रस्त’ होण्याचे प्रमाण दिसून येत आहे.

५. भारतात हिंदू धर्मीय जास्त संख्येने असल्याने ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांची संख्या हिंदूंमध्ये जास्त आहे. पण स्त्रियांची पतीशी जमवून न घेण्याची प्रवृत्ती हल्ली सर्व धर्मीयांमध्ये वाढलेली दिसून येते.

६. शहरी भागात स्त्रियांच्या शिक्षणाचा प्रसार, माहेरील कुटुंबातून त्यांना मिळणारा पाठिंबा, नोकरी - शिक्षण यामुळे आलेले स्वावलंबन आणि आत्मभान, स्त्रियांना असणारे कायद्याचे संरक्षण आणि ज्ञान, व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक यामुळे पतीच्या घरी गेल्यानंतर कराव्या लागणाऱ्या तडजोडीचा अभाव आढळतो, त्यामुळे पुरुष ‘अन्यायग्रस्त’ होण्याचे प्रमाण वाढलेले आहे.

७. जात कोणतीही असो जिथे शिक्षणाचा, संस्काराचा अभाव आहे, उत्पन्न तुटपुंजे आहे, तिथे कौटुंबिक कलह वाढतो व पुरुष ‘अन्यायग्रस्त’ होतात.

८. नियोजित विवाहामध्ये जोडीदाराच्या आवडी-निवडीची, स्वभावाची कल्पना येत नाही, त्यामुळे एकमेकांकडून अपेक्षांची पूर्तता न झाल्याने त्यांच्यातील असामंजस्य वाढीस लागून पुरुष ‘अन्यायग्रस्त’ होतो.

९. ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांच्या वैवाहिक अनुभवांचा विचार करता सर्वच पदाधिकाऱ्यांना वाटते की, त्यांचा वैवाहिक संबंध व अनुभव असमाधानी असतो.

१०. सर्वसाधारण ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांच्या सूचना विचारात घेता बहुतांश पदाधिकाऱ्यांना केस संदर्भात असे वाटते की, त्यांना पत्नीपासून लवकर सुटका हवी असते व न्यायालयीन निर्णय लवकर लागावा अशी इच्छा असते. तर केस संदर्भाशिवाय कोर्टात न जाता, केस न करता वेगळे कसे होता येईल याचे मार्गदर्शन हवे असते. सर्वच पदाधिकाऱ्यांना असे वाटते की विवाहपूर्व समुपदेशन हवे म्हणजे विवाह झाल्यानंतर भांडणे होऊ नयेत व तशी वेळ आलीच तर कसे वागावे याबाबत सल्ला व मार्गदर्शन हवे.

११. ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांसाठी शासनाने काय करावे? याविषयी बहुतांश पदाधिकाऱ्यांना घटना पातळीवर (Equality Before Law) चे तत्त्व तंतोतंत पाळावे असे वाटते, तर सामाजिक पातळीवर ‘पुरुषांसाठी आधार केंद्र’ स्थापन करावे. ‘पुरुष दक्षता समिती’ स्थापन करावी असे वाटते. तर आर्थिक पातळीवर ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांनादेखील कोर्ट केसेसमध्ये स्त्रियांसारखा खर्च मिळावा असे वाटते.

१२. ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांसाठी समाजाने काय करावे याविषयी बहुतांश पदाधिकाऱ्यांना असे वाटते की, अशा पुरुषांकडे समाजाने न्यायदृष्टीने पाहावे, उपहास करू नये, त्याला समजून घ्यावे व त्याला मानसिक आधार देऊन जगण्याची उमेद द्यावी.

१३. ‘अन्यायग्रस्त’ पुरुषांच्या भवितव्याविषयी सर्वच पदाधिकाऱ्यांना असे वाटते की पुरुष ‘अन्यायग्रस्त’ झाला की त्याचा समाजातील सन्मान, प्रतिष्ठा कमी होते, तो निराश होतो. त्याच्या मुलांना आई-वडिलांचे एकत्रित प्रेम मिळत नाही. त्याचे जीवन उद्ध्वस्त होऊन सर्व प्रकारचे नुकसानच होते.

१४. 'अन्यायग्रस्त' पुरुषांविषयी इतर माहिती देताना बहुतांश पदाधिकाऱ्यांच्या मते 'अन्यायग्रस्त' पुरुष कोणत्याही जाती धर्माचा असू शकतो. पहिला विवाह विस्कळीत झाला तर स्त्री (पत्नी) घटस्फोट देत नाहीत, दिला तर मोठी रक्कम मागितली जाते. रक्कम दिली नाही तर घटस्फोटही देत नाहीत. त्यामुळे त्याचे आयुष्य बरबाद होते. तो वाममार्गाला लागण्याची शक्यता निर्माण होते.

१५. पुरुष हक्क संरक्षण समितीविषयी समाजाचा/जनतेचा दृष्टिकोन याबाबत बहुतांश पदाधिकारी म्हणतात, ''सुरुवातीस समितीस विरोध होता पण आता परिस्थिती बदलली आहे. आता महिला मंडळेही काही केसेस या समितीकडे पाठवीत आहेत.''

१६. समाजात पुरुष हक्क संरक्षण समितीची आवश्यकता आहे असे सर्वच पदाधिकाऱ्यांना वाटते. कारण त्यामुळे 'अन्यायग्रस्त' पुरुषांना न्याय मिळेल. कुटुंब व्यवस्था टिकविण्यासाठी व मुलांची फरफट थांबवणयासाठी पुरुष हक्क संरक्षण समितीची आज आणि भविष्यातही आवश्यकता आहे.

१७. बहुतांश पदाधिकाऱ्यांनी या समितीतर्फे पुरुष व्यसन मुक्ती केंद्र, पुरुष आधार केंद्र सुरू केलेली असल्याचे सांगितले.

**ठळक निष्कर्ष :**

प्रस्तुत शोधनिबंधातील ठळक निष्कर्षांमध्ये खालील गोष्टी नमूद करता येतील.

१. बहुतांश (६२%) पुरुषांचा वैवाहिक जीवनाचा कालावधी १ वर्षे ते ५ वर्षापर्यंत असल्याने ऐन तारुण्यातच पुरुषांना वैवाहक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांचे जीवन जगावे लागते.

२. बहुतांश (९८%) सुशिक्षित पुरुषांमध्ये वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांचे प्रमाण जास्त आहे तर अशिक्षित पुरुषांमध्ये अगदी नगण्य आहे.

३. बहुतांश (५४%) 'अन्यायग्रस्त' पुरुषांचे मासिक उत्पन्न रू. ५,०००/- पर्यंत असून जोडीदाराला पोटगी द्यावी लागत असल्यास, 'अन्यायग्रस्त' पुरुषाला आर्थिक अडचणींना मोठ्या प्रमाणात तोंड द्यावे लागते.

४. मुलांच्या जबाबदाऱ्यांमुळे वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषाला (२८%), कौटुंबिक, सामाजिक जीवनातही अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते.

५. जोडीदारांचे अनैतिक वर्तन (९२%), संशयी स्वभाव (१८%) आणि जोडीदाराकडून होणाऱ्या मारहाणीमुळे (१३.३%) तसेच समजूतदारपणाचा आणि चांगल्या संस्काराच्या अभावामुळे पुरुषांना वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांचे जीवन जगावे लागते.

६. वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त'पणामुळे अर्थहीन, निराश आणि बेचव झालेले जीवन जगताना पुरुष सर्व प्रकारच्या सामाजिक कार्यक्रमांत (विवाह समारंभ, वास्तुशांती इ.) आमंत्रण/निमंत्रण असल्यास उत्स्फूर्तपणे सहभागी होतात.

७. वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांचे (२८%) जोडीदार मुलांची कोणतीही जबाबदारी उचलत नाहीत आणि घटस्फोटही देत नाही. कारण वैवाहिक जोडीदार पुरुष मित्राबरोबर पळून गेलेला असतो/पतीचा व मुलांचा त्याग करून पुरुष मित्राबरोबर वेगळा घरोबा करतो.

८. बहुतांश (५६%) पुरुषांना दुसरा विवाह करावासा वाटत नाही.

**आधुनिक समाजातील विवाह आणि कुटुंबसंस्थेचे विघटन - 'अन्यायग्रस्त' पुरुषांच्या समस्येचे सर्वसाधारण कारण:**

पती-पत्नीने एकमेकांशी कसे वागावे या संदर्भातील पारंपरिक समाजातील सामाजिक नियमने विशेषत: नीतितत्त्वे (Ethical Principles) आधुनिक काळात कमकुवत झाली आहेत. उदा. विवाहपूर्व पवित्रता, पती-पत्नींनी एकमेकांशी प्रामाणिक राहून वैवाहिक निष्ठा पाळणे (व्यभिचार निषिध्दता), पत्नीने पतीच्या आज्ञेत राहण्याची अपेक्षा, पती-पत्नीत परस्पर सुसंवाद असावा इ. ही नियमने विविध कारणांमुळे कमकुवत झाली आहेत. त्यामुळे वैवाहिक / कौटुंबिक संघटनात बिघाड निर्माण झाला आहे.

आधुनिक समाजातील पती-पत्नींच्या वैवाहिक जीवनाचे नियमन करणाऱ्या सामाजिक नियमनांचा एक प्रकार म्हणजे विविध कायदे होत. उदा. किती व्यक्तींशी विवाह करावा? विवाह समयी वय किती असावे? विवाहाला समाजाची मान्यता कशी मिळवावी? हुंडा न मागणे व देणे, घटस्फोट कोणत्या परिस्थितीत घेता व देता येतो इत्यादी बाबतीत कायदे आहेत. याशिवाय पत्नीला (स्त्रीला) अतिरिक्त संरक्षण मिळावे या हेतूने भारत सरकारने भारतीय दंड संहिता कलम ३५४ (स्त्रीचा विनयभंग); ५०९ (स्त्रीची छेडछाड); ३७५ सह ३७६ (बलात्काराबद्दल शिक्षा); ४९८ - अ (एखाद्या स्त्रीच्या पतीने किंवा पतीच्या नातेवाईकांनी तिला क्रूर वागणूक देणे); १२५

(पत्नी, अपत्ये आणि आई-बाप यांना पोटगी / उदर निर्वाहाकरिता); १९९४ नुसार कलम २९ - अ (स्त्री वारसा हक्क कायद्याविषयी) आणि ४९७ (अनैतिक शारीरिक संबंध) या विषयासंदर्भात कायदे केलेले आहेत. स्त्री-पुरुष (पती-पत्नी) सामाजिक संबंधात समानता येण्यासाठी करण्यात आलेले वरीलपैकी काही कायदेच विवाह आणि कौटुंबिक विघटनास चालना देणारी स्त्रियांच्या हातातील 'साधने' बनत आहेत. अशा प्रकारे विवाह आणि कुटुंब संस्थेतील विघटन (Disorganization of Marriage and Family) हे वैवाहिक संबंधातील 'अन्यायग्रस्त' पुरुषांच्या समस्यांचे कारण आहे.

**सर्वसाधारण सूचना :**

प्रस्तुत शोधनिबंधातून 'अन्यायग्रस्त' पुरुषांची समस्या खूपच गंभीर असल्याचे दिसून येते. या आधारावर संशोधकाने काही सूचना केल्या आहेत. त्या खालीलप्रमाणे:

१. शहरी भागाप्रमाणे ग्रामीण भागांतसुद्धा कौटुंबिक सल्ला आणि मार्गदर्शन केंद्रे स्थापन करावीत.
२. पुरुष आधारकेंद्रे असावीत.
३. पोलीस ठाण्यांच्या परिसरात महिला दक्षता समित्यांप्रमाणे पुरुष दक्षता समित्या असाव्यात.
४. राष्ट्रीय महिला आयोगाप्रमाणे राष्ट्रीय पुरुष आयोग असावा.
५. 'अन्यायग्रस्त' व्यसनी पुरुषांसाठी व्यसन मुक्ती केंद्रे असावीत.
६. ग्रामपंचायती, नगरपालिका आणि महानगरपालिका या ठिकाणी 'अन्यायग्रस्त' पुरुषांची रीतसर नोंदणी करण्याची व्यवस्था शासनाने करावी.
७. अनैतिक संबंधाबाबत स्त्री-पुरुषांना समान कायदा असावा.
८. न्यायालयीन प्रक्रियेचा 'दुरुपयोग' करणारी व्यक्ती स्त्री असो वा पुरुष, दोघांनाही सारख्याच शिक्षेची तरतूद हवी.
९. 'अन्यायग्रस्त' पिता व मुले सुरक्षा योजना सुरू कराव्यात.
१०. विवाहोत्सुक युवक-युवतींनी विवाहपूर्व समुपदेशन घ्यावे.

**ऋणनिर्देश :**

१. पुरुष हक्क संरक्षण समिती, सांगली आणि इतर शाखेतील पदाधिकाऱ्यांनी व राष्ट्रीय कार्यकारिणीच्या सदस्यांनी उपलब्ध करून दिलेली माहिती व त्यांच्याबरोबर केलेली चर्चा याबद्दल त्यांचे आभार.
२. सदर शोधनिबंधातील सर्व माहिती संशोधकाने स्वत: पुरुष हक्क संरक्षण समिती, सांगली यांच्या मदतीने 'अन्यायग्रस्त' पुरुषांकडून संकलित केली आहे.

**संदर्भ :**

१) पाटील विजय (२६ एप्रिल, २००९) : 'बायकोच्या अरेरावीने पुरुषांची धाव महिला सहायता कक्षाकडे : कक्ष महिलांसाठी परंतु बहुतांश तक्रारी पुरुषांच्या', दैनिक पुढारी, पृ.क्र.३.
२) प्रतिनिधी, (२५ डिसेंबर, २००८): 'विवाहित महिलांपेक्षा पुरुषांच्या आत्महत्या दुप्पट: नॅशनल क्राईम ब्युरोची आकडेवारी', दैनिक लोकमत, पृ.क्र.२.
३) अभिषेक खुळे (२४ जुलै, २०१०): 'सासरकडून छळ प्रकरणात थेट अटक नाही: '४९८-अ' कायद्याचा गैरवापर गृहखात्याने केला मान्य, समुपदेशनाचा पर्याय वापरणार' दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, पृ.क्र. २.
४) चव्हाण धर्मेंद्र (२८ फेब्रुवारी, २०१०): 'महिलांनो, पुरुषमुक्तीही हवीच!', दैनिक सकाळ, सप्तरंग, पुणे आवृत्ती, पृ.क्र. १, ८.
५) पेंढार प्रदीप (२३ जुलै, २०१०): 'शिक्षा होण्याऐवजी आर्थिक तडजोड', दैनिक सकाळ, कोल्हापूर आवृत्ती, पृ.क्र. ८.
६) महामुणकर सुनीता (१८ एप्रिल, २०१०): ''४९८-अ'च्या बोगस तक्रारीमुळे पतीचा छळ: उच्च न्यायालयाचे निरीक्षण; पतीला घटस्फोटाची परवानगी', दैनिक सकाळ, पुणे आवृत्ती, पृ.क्र. २.

# राजर्षी शाहूंची समाजाभिमुख प्रशासकीय धोरणे

**डॉ. नारायण कांबळे**

**राजर्षी** शाहूंनी आपल्या राज्याभिषेकानंतर पहिल्या पर्वात यश प्राप्त करून प्रशासनावरील आपली पकड मजबूत करून लोकांच्या मनात आपल्यासंबंधी विश्वास निर्माण केला. आपले प्रशासन समाजाभिमुख असावे यासाठी राजर्षी शाहू सातत्याने परिश्रम करीत होतेच. त्याचबरोबर संस्थानचा आणि कोल्हापूर शहराचा कायापालट घडवून आणून त्यांना आधुनिक रंगरूप यावे यासाठी त्यांना आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रयत्न केलेला होता. हे सर्व निर्णय घेताना त्याची अंमलबजावणी व्यवस्थितरीत्या झाली पाहिजे यावरही त्यांचा कटाक्ष होता. विशेष करून आपल्या संस्थानात स्त्रिया, दलित यांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कायदे व घेतलेले निर्णय त्यांची अंमलबजावणी आपल्या प्रशासनाकडून तत्परतेने केली. आपल्या संस्थानाच्या प्रशासनाचा फायदा हा सर्वसामान्य माणसाला झाला पाहिजे. ही त्यांची सर्वोच्च भूमिका राहिलेली होती. तशा स्वरूपाचे कार्यही त्यांनी केले.

आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत ज्यांचे कार्य व कर्तृत्व महत्त्वपूर्ण ठरले ते राजर्षी शाहू महाराज होत. १८९४ ते १९२२ अशी २८ वर्षांची कारकीर्द सर्वसामान्यांच्या दृष्टीने अतिशय क्रांतिकारी व हितकारी ठरली. कारण ती पुरोगामी ध्येयांनी प्रेरित झालेली आणि ती ध्येये प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कर्तव्याची पराकाष्ठा करणारी होती. राजर्षी शाहूंना त्यांचे गुरू सर फ्रेझर यांच्याकडून कांही प्रेरणा मिळाल्या होत्या. त्यांच्या प्रेरणेतून त्यांनी आपल्या कारकीर्दीला सुरुवात केली होती. त्यांनी आपल्या राज्यकारभाराची सूत्रे हाती घेताना काढलेल्या जाहीरनाम्यात असे म्हटले होते की, “आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावेत. त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृध्दी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे. हा उद्देश सफल होण्याच्या कामी आमचे जहागीरदार आप्तजन, सरदार, मानकरी, इनामदार, कामदार सर्व दर्जाचे शेट सावकार व इतर प्रजाजन यांच्या उज्ज्वल राजनिष्ठेची व सहकार्यांची आम्हास आवश्यकता आहे. आज आमच्या आमदानीस सुरुवात होणाऱ्या दिवशी आमचा राज्यकारभार दीर्घकालपर्यंत टिकून तो सुखद व्हावा म्हणून आम्ही त्या परात्पर जगत् चालकाच्या अनुग्रहासाठी प्रार्थना करतो.”[१] आपल्या जनतेच्या प्रती असलेली आदरपूर्वक भावना त्यांचा विकास लक्षात घेऊन राज्यकारभाराचा उद्देश अशा प्रकारे स्पष्ट केल्यानंतर त्यानुसार कार्य करण्यास मोठ्या निष्ठेने व आत्मविश्वासाने सुरुवात केली. आपल्या प्रशासन कार्याचा केंद्रबिंदू त्यांनी वंचित व सर्वसामान्य माणूस हा ठरविलेला होता ते म्हणतात, “समाजातील सबल घटकांपेक्षा दुर्बल घटकांची विशेष काळजी घेणे हे माझे तत्त्व असून त्यांच्यामध्ये जास्तीत जास्त सुधारणा घडवून आणणे हे माझ्या प्रशासनाचे एक उद्दिष्ट आहे आणि त्यानुसार गेली २५ वर्ष मी खूप परिश्रम करीत आहे.” यापुढे जाऊन राजर्षी शाहू असे म्हणतात, “ब्रिटिश सरकारपेक्षा कोल्हापूर संस्थानचे प्रशासन जास्ती कार्यक्षम झाले पाहिजे अशी माझी महत्त्वाकांक्षा आहे आणि त्यानुसार प्रशासनामध्ये विविध नियम मी घालून दिले आहेत.”[२] एकूणच स्वत:चे प्रशासन ब्रिटिशांपेक्षा कसे वेगळे आहे वा समाजाभिमुख कसे राहील याची काळजी घेतली होतीच; परंतु एवढ्यावरच ते न थांबता आपल्या प्रशासनाची काही उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेवून प्रशासन करीत होते; परंतु त्यांची एक महत्त्वाची इच्छा अशी होती की, दलित समाजातील व्यक्तीची ब्रिटिश प्रशासन सेवेत वरच्या श्रेणीत नेमणूक झालेला पाहण्यास मी उत्सुक आहे. तसे झाल्यास ती घटना मला फार अभिमानाची बाब ठरेल. अशी त्यांची प्रामाणिक भावना होती.

महापुरुष ते ज्या काळात जन्मले आणि वाढले त्या काळाचे अपत्य असतात. अवतीभोवतीच्या परिस्थितीमुळे पडणाऱ्या स्वाभाविक मर्यादांवर मात करून ते समाजाला किती पुढे नेतात आणि कोणती दिशा दाखवतात यावर त्यांच्या मोठेपणाचे मूल्यमापन करावयाचे असते.[३]

भारतात अनेक संस्थाने सुमारे ६०० वर होती. इतर संस्थानिकाप्रमाणे राजर्षी शाहूही मांडलिक संस्थानिक होते.

**समाजशास्त्र विभाग, स्वामी विवेकानंद महाविद्यालय शिरूर ताजबंद येथे सहयोगी प्राध्यापक म्हणून कार्यरत.**

कोल्हापूर संस्थानची लोकसंख्या सर्वसाधारणपणे ९ लाख इतकी होती. ९ लाख लोकसंख्येमध्ये ब्राह्मण २६ हजार असले तरी ७९ टक्के ब्राह्मण साक्षर असल्यामुळे अधिकारपदांचा मोठा वाटा ब्राह्मणांना मिळालेला होता. परिणामी संस्थानातील उच्च पदांवर बहुसंख्य हे ब्राह्मणच होते. मराठा, कुणबी हे इतर जातीच्या तुलनेने जास्त असले तरी त्यांच्यात साक्षरतेचे प्रमाण अल्प होते. १८९४ मध्ये दरबारच्या अधिकाऱ्यामध्ये ६० जण ब्राह्मण होते तर ११ ब्राह्मणेतर होते. खाजगीकडे नेमलेल्या अधिकाऱ्यांमध्येही ४६ ब्राह्मण तर ७ ब्राह्मणेतर होते. परिणामी एकूणच संस्थानच्या दरबारात व प्रशासनात एका विशिष्ट जातीचेच प्राबल्य वाढले होते. त्यामुळे कळत नकळतपणे इतर जातीच्या लोकांना प्रशासनात प्राधान्य मिळू शकत नव्हते वा संधी मिळू शकत नव्हती. त्यामुळे त्यांचा आणि विकासाचा कुठेही संबंध येऊ शकत नव्हता. संस्थानातील प्रजा ही सुखी-समाधानी असली पाहिजे. त्यावरच राज्याचे मोठेपण असते. कोणतेही राज्य हे एका विशिष्ट जातीच्या आधारावर फार काळ टिकू शकत नाही. विशेषत: राज्यातील लोकांनाही त्याबद्दल आत्मीयता वाटत नसेल तर ते ही टिकू शकत नाही. तर त्यासाठी सामान्य माणसालाही ते राज्य आपले वाटले पाहिजे. हे ओळखून राजर्षी शाहूनी आपल्या प्रशासनातील विशिष्ट जातींचे प्राबल्य कमी करण्यासाठी वा उच्चवर्णीयांची मिरासदारी मोडून काढण्यासाठी सर्वप्रथम शिक्षणाला अग्रक्रम दिला. बहुजन समाजाला उच्चपदावर काम करण्याची संधी द्यायची असेल तर त्यांना साक्षर करणे गरजेचे आहे. हे लक्षात घेऊन त्यांनी संस्थानात सर्वप्रथम लोककल्याणकारी निर्णय घेताना शिक्षणाला महत्त्वपूर्ण स्थान दिले. विशेषत: आपल्या संस्थानातील लोकांना स्वराज्य स्थापन करून सुराज्य निर्माण करणे ही त्याची कल्पना होती; परंतु या दोन्ही संकल्पनांना साकार करावयाचे असेल तर ज्ञान आणि सत्ता यांच्यापासून वंचित राहिलेल्या बहुजन समाजाला या दोन्हीचा वाटा दिल्याखेरीज त्याला राज्य आपले वाटणार नाही. हे ओळखून त्यांनी बहुजन समाजात तसा विश्वास निर्माण करण्याच्या कार्याला अग्रक्रम दिला. आपल्या राज्यात शिक्षणाची भरभराट करणे हे उत्तम राज्यकर्त्यांचे लक्षण ठरते. तसेच राज्याचा कारभार नीट, दक्षतेने, निष्ठेने, समाजदृष्टीने चालविणे हेच राजाचे खरे कर्तव्य ठरते. या दृष्टिकोनातून पाहता राजर्षी शाहू हे उत्तम राज्यकर्ते व प्रशासक होते. ते गुणग्राहक होते. त्यांनी जातिपातींचा विचार न करता योग्य व्यक्तींच्या हाती राज्यसूत्रे ठेवण्याचे न्याय्य धोरण राजांनी स्वीकारले होते. राज्याच्या राजकारणात, राज्यकारभारात वा प्रशासनात सर्वांना समानता असावी असे त्याचे ठाम मत होते. हा त्यांचा विशाल मानवतावाद त्यांच्या विचारातून व कार्यातून लक्षात येण्यास मदत होते. यासदर्भात भाऊसाहेब खांडेकर म्हणतात, "मानवावर केवळ मानव म्हणून उत्कट प्रेम करणारे हे मन लोकोत्तर होते. अन्यायाविरुध्द झगडताना ते वज्रकठोर बने. पण वंचित व दु:खिताच्या दर्शनाने ते कुसुमकोमल होई. पृथ्वीच्या पाठीवर अनेक सम्राट झाले असतील. अनेक राजाधिराज गाजून गेले असतील, पण समाजाच्या तळाच्या मानवतेवर माणूस म्हणून मायेची पाखर घालणारे राजे फार थोडे झाले असतील. राजर्षी शाहू हे त्यापैकी एक होत. सामाजिक क्रांतीचे त्यांचे स्वप्न एखाद्या दीपस्तंभाप्रमाणे आजच्या वादळी जीवनात आपल्याला वाट दाखवायला पूर्णपणे समर्थ आहे."[४] तत्कालीन व्यवस्थेत जे काही कार्य केले ते आजच्या समाजाला दिशादर्शक ठरणारे आहे. राजर्षी शाहूंच्या कार्यातील महत्त्वाचे कार्य म्हणजे त्याचे समाजाभिमुख प्रशासन व प्रशासनाचा प्रमुख या नात्याने त्यांनी काढलेले जाहीरनामे व वेळोवेळी केलेला कायदे यांची चिकित्सा केली असता हे लक्षात येते की, त्यांनी तत्कालीन व्यवस्थेत अशा स्वरूपाचे कायदे करून त्याची अंमलबजावणी तितक्याच जोरकसपणे केलेली दिसते. यावरून हे स्पष्ट होते की, त्यांच्या प्रशासनात उक्ती व कृतीमध्ये फरक दिसत नाही. म्हणून त्यांचे प्रशासन समाजाभिमुख बनले होते.

राजर्षी शाहूंनी अधिकार सूत्रे हाती घेण्यापूर्वीची कोल्हापूर संस्थानची प्रशासन व्यवस्था विशिष्ट लोकांच्या हातात होती. त्यामुळे म्हणावा तेवढासा विकास झालेला नव्हता; परंतु राजर्षी शाहूंनी ज्यावेळेस अधिकाराची सूत्रे आपल्या हाती घेतली. त्यावेळेस जनतेला काय आवश्यक आहे या गोष्टीचा विचार करून आणि यापुढे जाऊन लोकांचे जीवनमान कसे सुधारता येईल या गोष्टीकडे विशेष लक्ष दिले. यापूर्वीच शाळा, टपाल कचेऱ्या, दवाखाने, महाविद्यालय, आगगाडी वगैरे साधने संस्थानातील प्रजाजनांना उपलब्ध झाली होती. तरी पण या सोयीसुविधा वाढवणे आणि नव्या सुखसुविधा उपलब्ध करून देऊन लोकांचे जीवनमान वाढविण्यासाठी त्यांनी विशेष असे प्रयत्न केले. यासाठी नवीन नवीन सुखसुविधा जनतेला

पुरविण्यासाठी काही योजनाही आखल्या. या योजना त्यांनी आपल्या कार्याचा केंद्रबिंदू मानून कार्य करीत राहिले. आपले प्रशासन जास्तीत जास्त लोकांना कशी सेवा देता येईल याकडे लक्ष देऊन आपले प्रशासन समाजाभिमुख व्हावे यासाठी त्यांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली किंवा नुसते विचार मांडले नाही तर हातात असलेल्या सत्तेचा वापर जाणीवपूर्वक व निर्धाराने सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी केला. विशेष करून आपल्या सत्तेचा उपयोग ध्येयवादी दृष्टीने करून समाजामध्ये मौलिक बदल करण्याचा प्रयत्न विसाव्या शतकाच्या प्रारंभी करणारा राजर्षी शाहू छत्रपती एक राजा होता. आज स्वातंत्र्य प्राप्तीनंतर, सत्ता ही तर आता जनतेची झाली आहे. या काळात राजर्षी शाहूंचे हे उदाहरण सत्तेच्या क्षेत्रातच उभ्या असलेल्या प्रत्येक माणसाला मार्गदर्शक ठरणारे आहे. समाजातील गुणी, कर्तृत्ववान माणसे हेरून त्यांना आपल्या संस्थानच्या सेवेत सामावून घेण्याचा राजर्षी शाहूंनी प्रयत्न केला. राज्याची सूत्रे हाती घेतल्यानंतर पहिल्या दोन वर्षांतच शाहू छत्रपतीनी कर्तृत्ववान नव्या प्रशासकांचा संघ तयार करण्यास सुरुवात केली होती. विशेष म्हणजे अव्वल दर्जाच्या प्रशासकाच्या अंगी माणसांची पारख करण्याचा गुण असावा लागतो, तो राजर्षी शाहूंकडे होता. पात्रतेनुसार नोकऱ्या देताना केवळ मराठा-कुणबी जातीलाच नव्हे तर सर्वच मागासलेल्या जातीना व वर्गांना विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता राजर्षी शाहूंना जाणवली व त्यांनी अमलातही आणली. राजर्षी शाहूंनी सर्वप्रथम जुने प्रशासन मंडळ बरखास्त करून नवे 'हुजूर कार्यालय' सुरू केले. या कार्यालयाच्या प्रमुखपदी हुजूर चिटणीस म्हणून रघुनाथ व्यंकोजी सबनीसांची नेमणूक केली. भास्करराव जाधव यांची 'असिस्टंट सरसुभे' म्हणून निवड केली.[५] पण याला ब्रिटिश व ब्राह्मण अधिकाऱ्यांनी विरोध केला. या विरोधाला न जुमानता त्यांनी त्या नेमणुका तशाच चालू ठेवल्या. राजसत्तेतील गावातील शेवटचा प्रतिनिधी पाटील हा कर्तव्यदक्ष असावा म्हणून त्याचे प्रबोधन करण्याकरिता, दिल्ली दरबार मेमोरियल स्कूल सुरू केले. लोकशाहीचे विकेंद्रीकरण करून ग्रामपंचायती सुरू करण्याचा निर्णय राजर्षी शाहूंनी घेतला. प्रशासकीय नोकराकडून जनतेस त्रास होऊ नये म्हणून गावच्या पाटील कुलकर्ण्यांना आपल्या गावात आर्थिक देवघेवीच्या व्यवहारावर बंदी घालणारा हुकूम काढला. आंतरजातीय विवाहास मान्यता देऊन खऱ्या अर्थाने जातीयता नष्ट करण्यासाठीचा कायदा केला.

राजर्षी शाहूंनी प्रत्यक्ष स्वत: राज्यकारभार करायला सुरुवात केली. तेव्हा त्यांना आपल्या प्रशासन यंत्रणेतील गुणदोषांची पूर्वकल्पना आली. ब्रिटिश अधिकाऱ्यांचे राजर्षी शाहूंशी होणारे वर्तन आणि प्रजेशी त्यांचे होणारे आडमुठे वर्तन आणि ब्राह्मण अधिकाऱ्यांकडून बहुजनाची होणारी पिळवणूक या सर्व गोष्टी राजर्षी शाहूंच्या नजरेतून सुटू शकल्या नाहीत. या सर्व गोष्टीवर उपाय म्हणून त्यांनी आपल्या राज्यकारभारात वा प्रशासनात गुणी लोकांना सामावून घेऊन त्यांना मोक्याच्या जागा दिल्या. त्यांची कदर केली. तर परिणामी दुसरीकडे प्रशासनातील आपली पकड घट्ट करण्यास सुरुवात केली. विशेषत: राजर्षी शाहूंच्या प्रशासनातील एक महत्त्वाचा पैलू लक्षात येतो तो म्हणजे त्यांना राजवाड्यात ऐषारामात राहून 'राज्यसकट' चालविणे कधीच मान्य नव्हते. त्यामुळे नोकरशाहीच्या अगदी अहवालावर विसंबून न राहता सतत लोकांशी मिसळून ते अडीअडचणी व सुखदु:खे समजून घेऊन त्यांच्या तोंडून ऐकून घेत असे. ही त्यांच्या प्रशासनातील एक महत्त्वाची पध्दत होती.

सारांश रूपाने राजर्षी शाहूंनी कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार आपल्या हाती येताच आपली प्रशासन यंत्रणा कार्यक्षम आणि गतिमान करून लोकांना लवकरात लवकर कसा न्याय देता येईल वा लोकांचे लवकर प्रश्न कसे सोडवता येतील व त्यांचा विकास घडवून आणता येईल या गोष्टीकडे त्यांनी गांभीर्याने लक्ष दिले. कामाचा व्याप लक्षात घेऊन त्यांनी १८९४ मध्ये उन्हाळ्यात आपला मुक्काम जाणीवपूर्वक पन्हाळ्यावर ठेवून १९ एप्रिल ते ६ जून पर्यंतच्या कालावधीत अधिकाऱ्यांना मदतीला घेऊन दररोज सहा याप्रमाणे जुन्या ३०० प्रकरणाचे निकाल देऊन टाकले.[६] त्यामुळे लोकांना आता आपली दाद फिर्याद घेणारा राजा कोल्हापूरच्या गादीला मिळाला आहे. याचा आनंदही तेथील जनतेला झालेला होता. यावरून हे स्पष्ट होते की, राजर्षी शाहूंनी आपल्या प्रशासनाच्या हातोटीने जनतेला आपलेसे करून घेतले होते. एवढेच नाहीतर लोकांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्नही राजर्षी शाहूंनी केला. त्यांनी आपल्या कारकिर्दीत काही महत्त्वाचे निर्णयही घेतले; परंतु काही मोजक्याच निर्णयाचा येथे उल्लेख करणे आवश्यक वाटते की, ज्या निर्णयामुळे एकूण सामाजिक न्यायाची कल्पना साकार

झालेली आहे. विशेषत: त्यांनी घेतलेले निर्णय व त्याची प्रत्यक्ष स्वरूपात केलेली अंमलबजावणी पुढीलप्रमाणे सांगता येईल. १) वेठबिगारीची जुलमी पध्दत बंद केली, तर दुसरीकडे राज्याच्या सेवेत काही भटक्या जमातींना सामावून घेतले. २) बाजारपेठेतील व्यापाऱ्यांचा भ्रष्टाचार थांबविला. ३) दुष्काळप्रसंगी राज्याच्या मालकीच्या कुरणात गोरगरिबांच्या जनावरांना चारण्यासाठी जशी मुभा दिली तशीच जनावरांच्या औषधपाण्याचीही व्यवस्था केली. ४) चहा, कॉफी या नगदी पिकांची प्रायोगिक तत्त्वावर जशी लागवड केली तशी गुळाची बाजारपेठ सुरू करून शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढेल हे पाहिले. ५) राज्यातील सर्व प्रकारच्या उद्योगांचे पूर्ण सर्वेक्षण केले. ६) शाहूपुरीत नवीन वसाहतीच्या निर्मितीस आरंभ केला. ७) शैक्षणिक सुधारणांना वेग आणण्यासाठी खास समिती नेमली. ८) राजाराम कॉलेजमध्ये पूर्ण शिक्षण मिळण्याची व्यवस्था केली.[६] इ. अशा प्रकारे राजर्षी शाहूंनी आपल्या राज्याभिषेकानंतर पहिल्या पर्वात एवढे यश प्राप्त केले. प्रशासनावरील आपली पकड मजबूत करून लोकांच्या मनात आपल्यासंबंधी विश्वास निर्माण केला. आपले प्रशासन समाजाभिमुख असावे यासाठी राजर्षी शाहू सातत्याने परिश्रम करीत होतेच. त्याचबरोबर संस्थानचा आणि कोल्हापूर शहराचा कायापालट घडवून आणून त्यांना आधुनिक रंगरूप यावे यासाठी त्यांना आयुष्याच्या अखेरपर्यंत प्रयत्न केलेला होता. हे सर्व निर्णय घेताना त्याची अंमलबजावणी व्यवस्थितरीत्या झाली पाहिजे. यावरही त्यांचा कटाक्ष होता. विशेष करून आपल्या संस्थानात स्त्रिया, दलित यांच्या विकासासाठी त्यांनी केलेले कायदे व घेतलेले निर्णय त्यांची अंमलबजावणी आपल्या प्रशासनाकडून तत्परतेने केली. आपल्या संस्थानाच्या प्रशासनाचा फायदा हा सर्वसामान्य माणसाला झाला पाहिजे. ही त्यांची सर्वोच्च भूमिका राहिलेली होती. तशा स्वरूपाचे कार्यही केले. म्हणून तेथील सर्वसामान्य माणसाला कोल्हापूर संस्थान व राजा हा आमचा आहे असे वाटू लागले व त्यांच्याबद्दल आत्मीयता वाढली व त्याचे परिणाम आजही कोल्हापूर जिल्ह्यामध्ये याची प्रचिती पाहावयास मिळते. विशेष करून दलितांच्या मनामध्ये तर राजर्षी शाहू एक दैवत असल्यासारखे वाटते. त्यांचे कारण त्यांनी दलितांना तत्कालीन व्यवस्थेत आपुलकीनं व मानवतावादी दृष्टीने सामाजिक न्याय दिला हे त्याचे प्रमुख कारण आहे. म्हणून त्यांचे प्रशासन हे समाजाभिमुख व स्त्री, दलित व वंचितांसाठीचे लोककल्याणकारी होते. आजच्या प्रशासन करणाऱ्या व्यक्तींनी व राज्यकर्त्यांना प्रेरणा देणारे आहेत. याचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून प्रशासन केले तर आपला देश आपला विभाग किती विकसित होईल याचा विचार करणे गरजेचे आहे.

**संदर्भ :**


१) संगवे, विलास. २००१. राजर्षी छत्रपती शाहू महाराज : कार्य व प्रभाव. कोल्हापूर एक्सप्रेस पब्लिशिंग हाऊस, पृष्ठ ५४.

२) कित्ता, पृष्ठ ५५

३) फडके, य.दि. २००१. राजर्षी शाहू छत्रपतीचे लोकाभिमुख प्रशासन. पवार, जयसिंगराव (संपा.) राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ. पृष्ठ ५८३.

४) खांडेकर, भाऊसाहेब. १९८१. राजर्षी शाहू गौरव ग्रंथ. प्रस्तावना

५) संगवे, विलास व खणे, बी.डी. १९९३. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स भाग-२. कोल्हापूर शिवाजी विद्यापीठ, पृष्ठ २,८७.

६. राजर्षी शाहू छत्रपती पेपर्स भाग-२, प्रस्तावना पृष्ठ ५

७. कित्ता, प्रस्तावना. पृष्ठ १०.



## आवाहन

**मराठी समाजशास्त्र परिषदेच्या आजीव सभासदत्वासाठी रुपये एक हजार (१०००/-) सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट अथवा चेक द्वारा डॉ. दिलीप खैरनार, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, समाजशास्त्र विभाग, पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद यांच्या नावे पाठवावा.**

**नोंदणी अर्ज परिषदेच्या** www.msp-maha.com **या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

# वंचिततेचा नवा पैलू : वाढत जाणारी वृद्धांची लोकसंख्या

**प्रा. प्रशांत सोनवणे**

**प्रस्तावना :**

वृध्दत्व ही मानवी जीवनातील अंतिम, अटळ आणि सार्वत्रिक स्वरूपाची घटना आहे. 'सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या' हे जागतिक लोकसंख्येचे वैशिष्ट्य आहे. म्हणजेच जसजशी लोकसंख्या वाढत जात आहे तसतशी वृध्दांच्या लोकसंख्येतही वाढ होत आहे. घटता जन्मदर आणि घटता मृत्युदर यामुळे वृध्दांचे प्रमाण वाढत आहे. ''विकसनशील राष्ट्रांपेक्षा विकसित राष्ट्रांमध्ये वृध्दांची लोकसंख्या जास्त आहे.'' (E. Palmore-1975) या वाढत्या वृध्दांच्या लोकसंख्येमुळे वृध्द ही समस्या निर्माण झाली आहे. ''विकसित राष्ट्रांतील अनेक वृध्द हे स्वावलंबी असले तरी पूर्णपणे कुटुंबापासून अलिप्त नाहीत आणि कुटुंबात वृध्द असल्यामुळे ते घरी थांबून घराकडे आणि आपल्या नातवंडांकडे लक्ष देतात त्यामुळेच वृध्दांना कुटुंबाची आणि कुटुंबाला वृध्दांची गरज आहे.'' (E. Palmore-1975)

आज संपूर्ण जगाची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्याचप्रमाणे वृध्दांचीही लोकसंख्या वाढत जात असलेली दिसून येते आज जागतिकीकरणामुळे, व्यापाराच्या उदारीकरण धोरणामुळे विकसित आणि विकसनशील राष्ट्रांमध्ये घडून आलेले विविध क्रांतिकारक बदल, वेगवेगळ्या वैद्यकीय सेवा-सुविधा पुरविल्या गेल्या जात असल्यामुळे व्यक्तींच्या जननदरात घट होऊन मृत्युदरात अपूर्व अशी घट होत आहे. त्यातून व्यक्तींचे आयुर्मान वाढले आहे. एकीकडे ही जरी चांगली बाब असली तरी त्यातून नव्याने नवीन समस्या निर्माण होत आहेत. माणसाचे आयुर्मान वाढले, माणसाची कार्यक्षमता वाढली असली तरी आज नव्याने 'वृध्दत्व' ही समस्या निर्माण झाली आहे. कारण वृध्दापकाळी या वृध्दांची सुश्रूषा कोण करणार? त्यांची काळजी कोण घेणार? हा मोठा प्रश्न आज सर्वांसमोर निर्माण झाला आहे. त्याचबरोबर वृध्दत्वातूनच वृध्दांच्या समस्याही निर्माण झाल्या आहेत. यातूनच वृध्दांच्या बाबतीत वंचितता निर्माण होऊन ते एकटे पडतात किंवा घरदार, सुना, मुले, नातवंडे असतानाही त्यांना वृध्दाश्रमात राहावे लागते आहे.

प्रस्तुत संशोधन कार्यासाठी पुढील उद्देश समोर ठेवले होते.

**उद्देश :**

१. वृध्दांची वाढत जाणारी लोकसंख्या जाणून घेणे.
२. वृध्दांची वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण होणारे त्यांचे प्रश्न समजून घेणे.
३. वृध्दांच्या वाढत्या वंचिततेवर शासनाने केलेल्या उपाययोजना यांचा अभ्यास करणे. या उद्देशांच्या आधारावरून पुढील गृहीतकांची मांडणी केली आहे.

**गृहीतके :**

१. वाढत्या लोकसंख्येमुळे वृध्दांचीही लोकसंख्या वाढत जाणार आहे.
२. वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येमुळे वृध्दांच्या अनेक समस्या निर्माण होत आहेत.
३. वृध्दांची वंचितता थांबविण्यासाठी शासनाने अनेक उपाययोजना केल्या आहेत.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधन हे पूर्णतः द्वितीयक तथ्य संकलनावर आधारित असून यासाठी विविध ग्रंथ, मासिके, दैनिके, वेबसाईटवरील विविध लेख, विविध अहवाल आदींचा आधार घेण्यात आलेला आहे.

वृध्दांची वाढत जाणारी लोकसंख्या आणि यातून त्यांची निर्माण होणारी वंचितता हे जाणून घेत असताना सर्वप्रथम आपणास वृध्दांची लोकसंख्या जाणून घ्यावी लागेल.

१९९५ मध्ये असलेली लोकसंख्या आणि प्रस्तावित जागतिक लोकसंख्या यांची तुलना आपण केल्यास ती वाढतच आहे हे दिसून येईल आणि त्यातच वृध्दांचे वाढत जाणारे प्रमाणही आपणास ठळकपणे दिसून येईल. घटता जननदर, घटता मृत्युदर आणि यातून वाढत जाणारे व्यक्तींचे आयुर्मान यामुळेच लोकसंख्येबरोबर वृध्दांच्या लोकसंख्येत वाढ होत आहे.

१९९५ मध्ये, जगातील वृध्दांची लोकसंख्या ५.६८७ बिलियन होती आणि ती २१५० पर्यंत १०.८०६ बिलियनपर्यंत वाढेल असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. म्हणजेच

**समाजशास्त्र विभाग, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत.**

१९५० ते २१५० याकाळात वृध्दांची लोकसंख्या ही चौपटीने वाढेल.

जागतिक स्तरावर वृध्दांच्या (६०+) लोकसंख्येचे प्रमाण १९९५ मध्ये जे ९.५ टक्के होते ते वाढून २०५० मध्ये २०.७ टक्के तर २१५० मध्ये ३०.५ इतके होईल. संख्येमध्येच हा बदल नोंदवायचा झाल्यास १९९५ मध्ये ५४२ मिलियन ते २०५० मध्ये १.९ बिलियन आणि २१५० मध्ये ३.३ बिलियन असा मोजता येईल.

जागतिक स्तरावरील वृध्दांच्या वाढत्या लोकसंख्येबरोबरच भारताच्या संदर्भातही हाच कल दिसून येतो. राजन यांनी २०१० मध्ये भारतीय वृध्दांच्या लोकसंख्येच्या वाढत्या कलाबद्दल २१०१ पर्यंतचा वर्तवलेला अंदाज पुढील तक्त्यात दर्शविण्यात आला आहे.

खालील तक्त्यावरून हे स्पष्ट होते की, ६०+ वृध्दांची लोकसंख्या १९६१ मध्ये ५.६ • होती. ती २००१ मध्ये ७.५• इतकी वाढली. तर ती २१०१ पर्यंत वाढतच जाऊन ३०.१• इतकी होईल असा अंदाज नोंदविलेला दिसून येतो. ७०+ या वयोगटातील वृध्दांची लोकसंख्या १९६१ मध्ये २.०• होती ती २००१ मध्ये २.९• इतकी वाढली असून २१०१ मध्ये ती १७.२• इतकी होईल. १९६१ मध्ये वृध्दांची लोकसंख्या (८०+) ०.६ होती ती २००१ मध्ये ०.८ इतकी वाढली. परंतु २१०१ मध्ये ही संख्या ७.१ इतकी वाढेल असे दिसते. म्हणजेच १९६१ पासून

**''भारतातील वृध्दांची दशकानुसार लोकसंख्या (१९६१ ते २१०१)''**

| इ.स. | ६० वर्षे | | ७० वर्षे | | ८० वर्षे | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मिलियन मध्ये | टककेवारी | मिलियन मध्ये | टककेवारी | मिलियन मध्ये | टककेवारी |
| १९६१ | २५.० | ५.६ | ९.० | २.० | २.० | ०.६ |
| १९७१ | ३३.० | ६.० | ११.० | २.१ | ३.० | ०.६ |
| १९८१ | ४३.० | ६.५ | १५.० | २.३ | ४.० | ०.६ |
| १९९१ | ५७.० | ६.८ | २१.० | २.५ | ६.० | ०.८ |
| २००१ | ७६.८ | ७.५ | २९.४ | २.९ | ८.१ | ०.८ |
| २०११ | ९६.५ | ८.१ | ४२.४ | ३.५ | १०.९ | ०.९ |
| २०२१ | १३३.० | ९.९ | ५२.४ | ३.९ | १५.८ | १.२ |
| २०३१ | १८४.१ | १२.७ | ७४.८ | ५.१ | १९.७ | १.३ |
| २०४१ | २३३.३ | १५.३ | १०४.४ | ६.८ | २८.८ | १.८ |
| २०५१ | २९८.२ | १९.१ | १३१.३ | ८.३ | ४०.५ | २.५ |
| २०६१ | ३४६.५ | २२.४ | १७१.६ | ११.० | ५१.६ | ३.२ |
| २०७१ | ३७७.२ | २४.५ | १९५.५ | १२.९ | ६९.८ | ४.५ |
| २०८१ | ४२२.३ | २६.९ | २१२.७ | १४.१ | ७७.६ | ५.३ |
| २०९१ | ४६३.६ | २८.७ | २४७.८ | १६.१ | ८८.८ | ६.१ |
| २१०१ | ५०४.७ | ३०.१ | २७३.० | १७.२ | १०५.५ | ७.१ |

Source : Irudaya Rajan, S. (March 2010)

२१०१ पर्यंत सर्व वयोगटातील वृध्दांची लोकसंख्या ही वाढतच जाईल असे स्पष्टपणे म्हणता येईल.

आज वेगवेगळ्या देशांत खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण (खाऊजा) यामुळे अनेक क्रांतिकारक बदल घडून येत आहेत. परंतु याचा काही देशांना जरी फायदा होत असला तरी अनेक देशांवर या खाऊजा आकृतिबंधाचा विपरीत परिणाम होत असलेला दिसून येतो. कारण या आकृतिबंधाचा स्वीकार आपणहून न करता इतर देशांच्या प्रभावामुळे स्वीकारावे लागते. भारतातही १९९१ मध्ये अशीच परिस्थिती निर्माण झाल्यामुळे तत्कालीन पंतप्रधानांनी हे खाउजा धोरण स्वीकारले कारण 'जागतिक व्यापार संघटना' आणि 'आंतरराष्ट्रीय नाणेनिधी' यांच्या दबावामुळेच भारतात विविध कंपन्यांना व्यापारासाठी ही भारतीय बाजारपेठ उपलब्ध झाली. माणसापेक्षा यंत्राला जास्तीचे महत्त्व प्राप्त झाले व यातूनच विविध समस्या निर्माण झाल्या आहेत.

भारतीय संस्कृतीला अनेक वर्षांचा इतिहास आहे. त्यातूनच या संस्कृतीचा काळाच्या ओघात हळुवारपणे विकास होत गेला. भारतीय समाजाचे मुख्य वैशिष्ट्य म्हणून 'संयुक्त कुटुंब' पध्दतीचा उल्लेख केला जातो. या संयुक्त कुटुंब पध्दतीमध्ये वयाला आणि अनुभवाला जास्त महत्त्व होते. ज्यांचे वय आणि अनुभव जास्त त्यांनाच 'कुटुंब प्रमुख' म्हणून संबोधले जात असत. त्यामुळे वृध्दाला जास्त महत्त्व होते. कुटुंबाबरोबरच समाजाच्या विविध सामाजिक संस्थात वृध्दांना प्रमुख कार्य करावे लागत असल्यामुळे त्यांना समाजातही मानाचे स्थान होते. वृध्दमंडळी शारीरिकदृष्ट्या जरी क्षीण होत असले तरी मानसिकदृष्ट्या ते सक्षम असलेले दिसून येतात. त्यामुळेच ते कौटुंबिक तसेच समाजातही गुंतलेले दिसून येतात. ''मनुने (हिंदू कायदेतज्ज्ञ) आपल्या 'धर्मशास्त्र' या ग्रंथामध्ये वृध्दांनी काय करावे आणि काय करू नये? याविषयी सविस्तर मांडणी केलेली दिसून येते. वृध्दांनी आपल्या उतरत्या वयामध्ये ऐहिक सुखाचा त्याग करून सरळ, सोपे जीवन जगावे, आपल्या गरजा कमीत कमी असाव्यात'' असे म्हटले आहे. (Edi.Liebig & Rajan-2005) यावरून वृध्दांवस्थेत माणसांना आपल्या ऐहिक गरजा कमी करण्यावर भर द्यावा आणि एकूणच जीवन साधेपणाने जगावे असे म्हणता येईल. मनुच्या मते, (मनुस्मृती-१९३२) ''जीवन हे विविध भागांत विभागलेले आहे. साधारणतः ते ब्रह्मचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम आणि संन्यास यामध्ये विभागलेले असते. समजा जर वृध्दांचे वय हे ६० वर्षे आहे असे मानले तर ते आपली 'षष्टीपूर्ती' साजरे करतात. हा कालखंड वानप्रस्थाचा मानला जातो. यामध्ये वृध्द हे व्यक्तिशः एकटे राहतात कारण कौटुंबीय जीवनातून बाहेर पडल्यानंतर ते रानावनात राहण्यासाठी जातात. यानंतरची पायरी म्हणजे संन्यास होय. यामध्ये व्यक्ती शरीराने आणि मनानेही संपूर्णपणे कुटुंबापासून अलिप्त होते आणि नामस्मरणामध्ये विलीन होते कारण नामस्मरणातून मानवाला 'मोक्ष' (चौथा पुरुषार्थ) प्राप्त होतो अशी मनुची कल्पना होती. (Edi. Liebig & Rajan-2005)

ब्रिटिशांच्या आगमनानंतर त्यांनी भारतीयांना आपल्या सेवेत कनिष्ठपदी रूजू करवून घेण्यासाठी इंग्रजीचे शिक्षण दिले जाऊ लागले. त्यामुळेच 'शिक्षणाचा प्रचार आणि प्रसार' हा याच काळात सुरू झाला या वेगवेगळ्या सुविधा भारतीयांना मिळू लागल्यामुळे त्यांचे जीवन जगण्यासाठी लागणाऱ्या गोष्टींची आणि हक्काची जाणीव त्यांना होऊ लागली. भारत स्वतंत्र झाल्यानंतरही सरकारने आपल्या पहिल्या पंचवार्षिक योजनेतूनच कल्याणकारी योजनेची सुरुवात केली. या सर्वांचा परिणाम म्हणून व्यक्तीचे आयुर्मान कमालीचे वाढले त्यामुळेच वृध्दांची संख्या वाढते आहे.

नवनवीन शोध, परदेशगमन, पाश्चिमात्य संस्कृतीचा झालेला परिणाम, आणि बदलत चाललेली नैतिक मूल्ये यातून वृध्द ही समस्या निर्माण होत आहे.'' (Palmore E. - 1975) या बदलत्या चित्रामुळेच 'वृध्दांची वंचितता' हा नवा पैलू आपल्यासमोर येत आहे. त्यामुळे विकसित राष्ट्रांबरोबरच विकसनशील राष्ट्रांतही ही समस्या निर्माण झालेली आहे.

भारतीय समाजावर झालेल्या पाश्चिमात्य विचारसरणीच्या प्रभावामुळे, नवनवीन तंत्रज्ञानाच्या शोधांमुळे, नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंब पध्दतीचा आणि वृध्द व्यवस्थेला धोका निर्माण झाला आहे. कुटुंबात वृध्दांची भूमिका ही नावापुरतीच (Empty Role) उरली आहे. त्यामुळे त्यांना जगण्यासाठी लागणाऱ्या आवश्यक बाबींचा अभाव होत आहे आणि यातून त्यांची वंचितता निर्माण झाली आहे. या सर्वांमधून मार्ग काढण्यासाठी, काही प्रमाणात का होईना वृध्दांची ही वंचितता कमी करण्यासाठी आज भारत सरकारने आणि राज्य सरकारने मिळून काही योजना

तयार केल्या आहेत. त्यामुळे या सर्व योजनांचा नक्कीच वृध्दांना फायदा होईल. कुटुंबात आणि समाजात एक प्रकारचे आदराचे स्थान वृध्दांना नव्याने निर्माण करून देता येईल यासाठी केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्याकडून अनेक राष्ट्रीय ध्येयधोरणे, कार्यक्रम आखले जात आहेत. या विविध योजनापैकी काही ठळक योजना पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१ एप्रिल २००८ च्या सुधारित योजनेनुसार वृध्दांसाठी केलेल्या विविध कल्याणात्मक उपाययोजनांचा एकत्रितपणे परामर्श पुढीलप्रमाणे घेता येईल -

**१. वृध्दांसाठी कायदेशीर तरतुदी (Legal Provisions)**

- ❖ नियम १२५ नुसार सक्षम व्यक्तीने तिच्या पालकांची काळजी घेणे आवश्यक आहे, अन्यथा फौजदारी नियम १९७३ नुसार दखलपात्र गुन्हा ठरतो.
- ❖ हिंदू दत्तक विधान कायद्यानुसार १९५६-वयोवृद्ध व्यक्तीची काळजी घेणे मुलांचे कर्तव्य आहे.
- ❖ भारतीय राज्यघटनेच्या कलम ४१ नुसार (मार्गदर्शक तत्त्वे) शासनाने वयोवृद्धांच्या कल्याणासाठी आवश्यक ते प्रयत्न करावेत.

**२. आर्थिक - (Financial)**

- ❖ महाराष्ट्र शासनाने वरिष्ठ नागरिकांना व्यवसाय करातून सूट दिली आहे.
- ❖ सार्वजनिक क्षेत्रातील व सहकारी बँका वरिष्ठ नागरिकांना जास्त दराने त्यांच्या ठेवीवर व्याज देतात.
- ❖ नुकत्याच सादर करण्यात आलेल्या केंद्र शासनाच्या अर्थसंकल्पात पोस्टातील ठेवीवर ९ टक्के व्याजाची तरतूद करण्यात आलेली आहे.
- ❖ वरिष्ठ नागरिकांच्या टेलिफोनच्या किरायात महानगरपालिका टेलिफोन निगम लिमिटेडने २५ टक्के परतावा देण्याची परवानगी दिली आहे.

**३. वैद्यकीय (Medical)**

- ❖ केंद्राप्रमाणे राज्य सरकार आणि सहकारी संस्था निवृत्त ज्येष्ठ नागरिकाला वैद्यकीय सुविधा पुरवितात.
- ❖ जनरल इन्शुरन्स कंपनी ७० वर्षे वयाच्या वरिष्ठ नागरिकांना ५ लाखांपर्यंत वैद्यकीय विमा संरक्षण पुरविते.
- ❖ शासकीय रुग्णालय, मोफत वैद्यकीय तपासणी व फीमध्ये सवलत या प्रकारच्या सुविधा पुरविते.
- ❖ ठराविक काळानंतर अनेक सामाजिक संस्था वरिश्ठ नागरिकांसाठी मोफत वैद्यकीय कॅम्प आखतात.
- ❖ तसेच काही सामाजिक संस्था मोफत शस्त्रक्रिया करतात, औषधे पुरवितात.
- ❖ वृध्दांसाठी Hot Line - १२९

**४. सामाजिक (Social)**

- ❖ संपूर्ण देशात ज्येष्ठ नागरिकांच्या संस्था स्थापन करण्यात आल्या आहेत ज्या संस्था ज्येष्ठ नागरिकांच्या सामाजिक कल्याणासाठी, वैद्यकीय सुविधांसाठीच्या अडचणी सोडविण्यासाठी काम करतात.
- ❖ ज्येष्ठ नागरिक सेवा यामध्ये ६० वर्षांवरील नागरिकांना पोस्टामध्ये १५ लाखांपर्यंतच्या किमान ठेवीवर ९ टक्के व्याज दिले जाते. ही योजना ५ वर्षांसाठी असून ५ वर्षांनंतर ३ वर्षांपर्यंत वाढवता येते. मात्र या योजनेमध्ये आयकरात सूट मिळत नाही.

**५. निवासव्यवस्था (Accommdoation)**

- ❖ अनेक सामाजिक संस्था वरिष्ठ नागरिकांसाठी मोफत किंवा किफायतशीर किमतीत निवासव्यवस्था पुरवितात त्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा, करमणुकीचे साधने, वाचनालये, सामाजिक व आध्यात्मिक वातावरण पुरविले जाते. या संस्था आजारी असणाऱ्या रुग्णांसाठी निवासव्यवस्था मोफत किंवा किफायतशीर दरात पुरवितात.

**६. ज्येष्ठ नागरिक वसाहत**

- ❖ पुण्यातील अयश्री प्रकल्प
- ❖ डिग्निटी लाईफ - माथेरानजवळील प्रकल्प. हे प्रकल्प आता महाराष्ट्रभर राबविले जात आहेत. त्या प्रकल्पानुसार वृध्दांना २० रुपयांत देण्यात येते, डिग्निटी लाईफ स्टाईल वृध्दांना ५० टक्के रक्कम कर्जाऊ स्वरूपात देते. वृध्दांना सुरक्षा, मनोरंजन, तसेच १०० खाटांचे हॉस्पिटल, साक्षरता प्रसार या बाबी पुरविण्यात येतात. भारतामध्ये ही योजना आयुर्विमा महामंडळामार्फत बंगळूर येथे सुरू करण्यात येत असून यासाठी ६ हजार कोटी रुपयांपर्यंत

रक्कम गोळा करण्यात आली आहे. वृध्दांच्या गरजा लक्षात घेऊन विमा महामंडळाने ही योजना आखली आहे. १८४० मध्ये बंगळूर येथे सुरू झालेली The Friend In Needs Society ही संस्था आज देशातील विविध प्रमुख महानगरांमध्ये काम पाहत आहे.

**७. संरक्षण**

- ❖ केवळ ज्येष्ठ व्यक्तीच घरात राहत असेल आणि त्यांना कामासाठी नोकर ठेवायचा असेल तेव्हा अनेक चोरी, दरोडा, खून अशा प्रकारचे गुन्हे सहसा घरातील नोकरांकडून केले जात असतात. तेव्हा खबरदारी म्हणून त्या नोकराचे नाव, पत्ता, फोटो, बोटाचे ठसे इ. ज्येष्ठ नागरिकांनी घेऊन त्याची माहिती जवळच्या पोलिस ठाण्यात द्यावी. जेणेकरून त्या नोकरापासून कोणताही धोका होऊ नये.
- ❖ भाडेकरू ठेवताना सुध्दा वरीलप्रमाणे काळजी घ्यावी.
- ❖ हाऊसिंग सोसायटीमध्ये भेटायला आलेल्या व्यक्तींची Visitor's Register मध्ये नोंद ठेवावी. तसेच वॉचमन, लिफ्टमन यांची माहिती ठेवणे, त्याची जाणीव पोलिसांना करून देणे.

**८. पालक देखरेख विधेयक**

आपल्या जन्मदात्या आई-वडिलांची सर्व प्रकारची काळजी आपल्या मुलां-मुलींने घ्यावी अन्यथा त्यांच्यावर फौजदारी दखलपात्र गुन्हा होऊ शकतो अशा स्वरूपाचे 'पालक देखरेख विधेयक' मीराकुमार यांनी डिसेंबर-२००७ (कायदा लागू दि. २० जानेवारी २००९) मध्ये पारीत करवून घेतले. जेणेकरून आपल्या आई-वडिलांचा सांभाळ आपल्या मुलांनी करावा.

भारतामध्ये डिसेंबर २००७ मध्ये 'दि मेंटेनन्स ॲण्ड वेलफेअर ऑफ् पॅरेंट्स ॲण्ड सीनिअर सिटिझन्स बिल' लोकसभेने पारित केले. सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयाने राष्ट्रीय वृध्दजन नीती जाहीर केली.

असे विविध प्रकारचे कार्यक्रम भारतात केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्या मदतीने राबविले जातात; परंतु अनेक विकासात्मक आणि घटनात्मक उपाययोजना केलेल्या असल्या तरी त्यांची काटेकोरपणे अंमलबजावणी होणे गरजेचे आहे.

थोडक्यात भारतीय समाजामध्ये वृध्दांना जरी कुटुंबामध्ये, समाजामध्ये स्थान असले तरी आज जागतिकीकरण, नागरीकरण, आधुनिकीकरण या सर्वांमुळे वृध्दांचे ''सामाजिक स्थान'' यामध्ये कमालीचा बदल झालेला दिसून येतो. घटता जन्मदर, घटता मृत्युदर यामुळे व्यक्तींचे आयुर्मान वाढत जात असून यामुळे वृध्दांची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढतच जात असून त्याबरोबरच त्यांच्या समस्याही वाढत जाऊन वंचिततेचा नवा पैलू म्हणून वृध्दांच्या लोकसंख्येकडे आज पाहिजे जात आहे. त्यामुळे 'वाढत जाणारी लोकसंख्या आणि त्यामुळे निर्माण होणाऱ्या त्यांच्या समस्या' या कोणकोणत्या असतील याची दखल घेऊन वेळीच उपाययोजना करणे गरजेचे आहे. केलेल्या उपाययोजना आणि विकासात्मक योजना यांचाही लाभ कोणाला झाला आहे हे पाहणे आज गरजेचे झाले आहे.

**संदर्भसूची :**


;ksTkuk ekfld (Tkkusokjh 06)

Brinks S. (1997) – "The Greying of our Communities, Worldwide", Aging International, 23 (3&4) 13-31

Dandekar K. (1996) – "The Elderly In India" Sage Publications, New Delhi/Thousand Oaks/London.

Government of India, (2008), *"Integrated Programme for Older Persons"*, Ministry of Social Justice & Empowerment. New Delhi. Available at www-socialjustice.nic.in

Irudaya Rajan, S. (March 2010), *"Demographic Aging and Employment in India"*, ILO Regional Office For Asia and the Pacific. – Bangkok ILO, 2010 vi, pp 23. (ILO Asia-Pacific Working Paper Series.

Liebig P.S. & Rajan S.I. (Eds.) (2005) – "An Aging India-Perspectives, Prospects & Policies", Rawat Pubs. New Delhi.

Palmore E. (1975) – "The Honeorable Elders – A Cross Cultural Analysis of Aging in Japan", Duke University Press, Durham, North Carolina.

# ''भारतीय समाजव्यवस्थेत वृद्धाश्रम''

**प्रा. भारत खैरनार**

**प्राचीन** भारतीय समाजाला संस्कृतीचा मोठा आधार होता. कारण कुटुंबामध्ये वृध्दांचे स्थान अत्यंत महत्त्वाचे होते. कुटुंबामध्ये कोणताही निर्णय होत असताना वृध्दांच्या सल्ल्याशिवाय घेतला जात नव्हता. जात पंचायतीत वृध्दांना मानाचे स्थान होते. भारतीय समाजामध्ये संयुक्त कुटुंब पध्दतीचा खूप मोठा प्रभाव होता, मात्र परिवर्तनाच्या धारेत संयुक्त कुटुंबाचे विघटन होऊन केंद्र कुटुंबे निर्माण होत आहेत. त्यांचा कुटुंबावर मोठ्या प्रमाणात प्रभाव पडत आहे. समाजव्यवस्थेवरही त्याचे वाईट परिणाम होत आहेत. आंतरराष्ट्रीय पातळीवर या समस्येचा विचार १९८९ मध्ये झाला. १ ऑक्टोबर संपूर्ण जगामध्ये 'वृध्ददिन' म्हणून पाळला जातो.

औद्योगिकीकरणाचा वेग जसा वाढत गेला तसे अनेक शोध नवनवीन इलेक्ट्रॉनिक्स माध्यमे, दूरचित्रवाहिन्या, पाश्चिमात्य संस्कृतीची मूल्ये जोपासण्याची प्रवृत्ती वाढू लागली. आज वृध्द हा एकटाच राहिलेला आहे. त्याच्यासमोर अनेक दु:खे, आजार, मानसिक अपमान यासारख्या वाईट समस्या आहेत. वृध्दांना मानसिक आधाराची व सहानुभूतीची अत्यंत आवश्यकता असते.

वार्ध्यक्य किंवा वयोवर्धता ही एक नैसर्गिक स्वरूपाची एक अटळ अशी घटना आहे. घटत चाललेला जन्मदर व मृत्युदर आणि वाढते आयुर्मान यामुळे लोकसंख्या सतत वाढत आहे. इ. स. १९९५ मध्ये जगाची एकूण लोकसंख्या ही ५.७ अब्ज होती, ती आज ६ अब्जापेक्षा जास्त असून इ. स. २०५० मध्ये जगाची एकूण लोकसंख्या ही १०.८ अब्ज होईल. इ. स. १९१५ मध्ये जगाच्या एकूण लोकसंख्येत वृध्दांची संख्या ही ५४.२ कोटी होती ती आज ५८ कोटीपेक्षा जास्त असून इ.स. २०५० पर्यंत वृध्दांची जगातील संख्या ही १.९ अब्ज होईल असा अंताज आहे. (United Nations, १९९८) यामुळे वयोवर्धता व वृध्दांचे प्रश्न ही एकविसाव्या शतकातील प्रमुख जागतिक समस्या असेल.

सातत्याने वाढत जाणारी वृध्दांची लोकसंख्या आजच्या जागतिक लोकसंख्येचे प्रमुख वैशिष्ट्य आहे. संपूर्ण जगाच्या लोकसंख्येत दरमहा दहा लाख हे आपल्या वयाची साठ वर्षे पूर्ण करतात (Brinks १९९७) म्हणजे वृद्धांची संख्या दरमहा दहा लाखांनी वाढते. त्यामुळे विसाव्या शतकात सर्व राष्ट्रांनी विशेषत: विकसित राष्ट्रांनी लोकसंख्येतील ६० संख्येतील वाढत्या प्रमाणाचा व त्यामुळे होणाऱ्या परिणाचा अनुभव घेतला आहे. विसाव्या शतकाच्या उत्तराधार्पयंत 'वृध्दांची वाढती संख्या व वृध्दांचे वाढते प्रश्न' हे जगातील विकसित राष्ट्रे वृध्दीच्या वाढलेल्या संख्येमुळे व प्रश्नांमुळे 'Grey Nations' म्हणून ओळखली जात होती.

वृध्दांच्या वाढत्या संख्येचा प्रत्यक्ष परिणाम हा आरोग्यविषयक सेवा, सुविधा, निवृत्तिवेतन व सामाजिक सुरक्षेबाबतच्या खर्चांवर होत आहे आणि भविष्यात तो वाढतच जाईल. वृध्दांच्या वाढत्या संख्येमुळे विविध प्रकारचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष परिणाम समाजजीवनावर होत आहेत. अर्थातच प्रत्येक समाजाची सांस्कृतिक जडणघडण वेगळी असल्यामुळे समाजानुसार वेगवेगळ्या स्वरूपाचे प्रश्न निर्माण झाले आहेत.

**वृध्द कोणास म्हणावे?**

वृध्दत्व ही एक अखंड चालणारी प्रक्रिया आहे. वृध्दत्व ही मानवी जीवनातील अपरिहार्य अवस्था आहे. एक प्रकारे या अवस्थेला आयुष्यातील 'उतरणीचा काळ' (Period of Declining) असे म्हणतात. ती एक जैविक प्रक्रिया आहे. ज्या व्यक्तीस दीर्घायुष्य लाभते तिच्या जीवनक्रमात वृध्दत्व येणारच.

वृध्द कोणास म्हणावे? हा तसा विवादास्पद प्रश्न आहे. याबाबत सर्वसाधारणपणे असे म्हटले जाते की, A man is as old as he thinks अर्थात जेव्हा माणसाला वाटते की आपण वृध्द झालो तेव्हा त्याला वृध्द म्हणावे, परंतु हा अर्थ म्हणावा तेवढा उपयोगी नाही.

- सामाजिक कार्य ज्ञान कोशानुसार = व्यक्तीच्या जीवनातील शेवटच्या कालखंड म्हणजे वृध्दावस्था होय. The Latter part of the cycle of an individual life.
- डिक्शनरी ऑफ सोशिऑलॉजीमध्ये कॉलिन्स हे, 'वृध्दावस्था ही शारीरिक स्थितीबरोबरच सामाजिक पैलूशी निगडित असते.' यावर भर देतात.

वाढत जाणारे एकूणच वृध्दत्व ही एक सतत शेवटी मरणाच्या दारी जाऊन थांबणारी शरीरांतर्गत प्रतिकूल बदलांची

**समाजशास्त्र विभाग, मुक्तानंद महाविद्यालय गंगापूर येथे कनिष्ठ अधिव्याख्याता म्हणून कार्यरत.**

स्थिती होय. वृध्दावस्था सुरू होण्याचा काळ हा अनिश्चित व अस्पष्ट असतो.

भारतात, शासकीय पातळीवर वृध्दांच्या समस्यांबाबतच्या प्रयत्नांना इ.स. १९८२ नंतरच वेग आलेला दिसून येतो. कल्याणकारी राज्यघटनेतील कलम ४१ नुसार वृध्दांना सेवा-सुविधा उपलब्ध करून देणे व साहाय्यता करणे हे सरकारचे कर्तव्य आहे. त्यामुळे पहिल्या पंचवार्षिक योजनेपासूनच सामाजिक सुरक्षेसंबंधीचे उपाय म्हणून प्रयत्न झालेले आहेत. परंतु राष्ट्रीय वृध्दापकाळ निवृत्तिवेतन योजना (National Old Age Pension Scheme १९९५) यासारख्या योजना इ. स. १९९० नंतरच राबविल्या गेल्या आहेत. १५ ऑगस्ट १९९९ पासून भारत सरकारतर्फे वृध्दांच्या कल्याणासाठी राष्ट्रीय धोरण स्वीकारण्यात आले. हे धोरण, The National Policy on Older Persons [NPOP] या नावाने ओळखली जाते. १० व्या पंचवार्षिक योजनेच्या काळात हेच धोरण राबविले जाईल, शासनाचे धोरण हे वृध्दांच्या तुलनेत माता व बालसंगोपनावर अधिक भर देणारे आहे. कारण शासनाचे असे म्हणणे आहे की, वृध्दांची काळजी घेणे ही कुटुंबाची जबाबदारी आहे.

**भारतीय समाज व्यवस्थेत वृध्दांच्या समस्या : स्वरूप व कारण**

**वृध्दांच्या कौटुंबिक समस्या :**

वृध्दांच्या कौटुंबिक समस्यांचा विचार करताना प्रामुख्याने विभक्त कुटुंब पध्दती, महिलांचा वाढता सामाजिक सहभाग, व्यक्तिस्वातंत्र्याचा अतिरेक, पिढीअंतर्गत संघर्ष, दारिद्र्य, कुटुंब विघटन इत्यादी घटकांचा विचार करावा लागतो. वृध्द मातापित्यांविषयी मुलांना वाटणारा आदर व कृतज्ञतेची भावना, प्रेम, जिव्हाळा, आपुलकी ही पारंपरिक कुटुंबपध्दतीची गुणवैशिष्ट्ये दिवसेंदिवस कमकुवत बनत चालली आहेत. (Bose; १९९५, Jammuna; १९८७) या विकासात्मक बदलांचा परिणाम म्हणून. 'कुटुंबाकडून वृध्दांची काळजी घेणे व त्यांचा सांभाळ करणे' ही एक गंभीर समस्या बनली आहे, (Jammuna; १९९८) त्यामुळे अनेक कुटुबांसाठी वृध्द व्यक्ती या भार वाटत आहेत.

२) महिलांचा वाढता सामाजिक सहभाग, वृध्दांची काळजी घेणे हे स्त्रियांचे काम मानले जाते; परंतु व्यवसाय नोकरीमुळे महिलांचा सामाजिक सहभाग वाढल्यामुळे त्या वृध्दांकडे लक्ष देऊ शकत नाहीत. त्यामुळे त्यांचे परावलंबित्व वाढत जाते.

**३) स्वातंत्र्य :** व्यक्तिवाद, चंगळवाद ही मूल्ये वाढत असल्यामुळे कुटुंबामध्ये प्रत्येकाच्या विचारांना महत्त्व प्राप्त झाले आहे. वृध्दांची मते, कालबाह्य वाटू लागल्यामुळे कुटुंबातच ते उपेक्षित बनत चालले आहेत. लालसा, महत्त्वाकांक्षा त्यामुळे संवदेना तीव्र बनतात. परिणामी वृध्दांचा कोंडमारा होतो. त्यांची जीवनाबद्दलची आसक्ती कमी होऊन व्याधी होण्याची शक्यता वाढते.

**वृध्दांची मानसिक समस्या :**

वार्धक्य ही पूर्वनियोजित नैसर्गिक प्रक्रिया असल्यामुळे हा आकृतिबंधच वृध्दांना स्वीकारणे अवघड जाते. खालावत जाणाऱ्या शारीरिक, मानसिक, सामाजिक अस्तित्वाचा स्वीकार करीत नाहीत. त्यांच्यामध्ये भावनिक असंतुलन वाढीस लागते. त्यातूनच अनेक मानसिक समस्या निर्माण होतात.

**१) मानसिक बदल –** इतर कोणत्याही वयोगटापेक्षा वृध्दांमध्ये मनोविकारांचे प्रमाण सर्वाधिक असते. अचानक भावनाविवश होणे, रागावणे, बडबडणे, चिंता, नैराश्य यामधून त्यांची मानसिक अस्वस्थता जाणवते.

**२) असमाधानी वृत्ती –** एकटेपणामुळे आलेले नैराश्य, विस्मरण, आर्थिक परावलंबन, भूतकाळातील कडूगोड आठवणी यामुळे मनावर ताबा राहत नाही. या सर्वांशी तडजोड न करता आल्यामुळे असंतुलित मनाचा शरीरावर परिणाम होऊन अनेक व्याधींना सामोरे जावे लागते.

**३) मनोकायिक रोग –** प्रतिकारशक्तीचा ऱ्हास झाल्याने शारीरिक व मानसिक दौर्बल्य वाढीस लागते. मधुमेह, रक्तदाब इत्यादी विकार वाढीस लागतात. या सर्वामुळे आयुष्यातील रस कमी होऊन औदासीन्य येऊ लागते.

**वृध्दांच्या सामाजिक समस्या :**

जागतिक आरोग्य संघटनेने (WHO) शारीरिक व मानसिक आरोग्याबरोबरच सामाजिक आरोग्यालाही महत्त्व दिलेले आहे. स्वास्थ्यपूर्ण वृध्दत्वामध्ये भौतिक गरजांबरोबरच सामाजिक, सुरक्षितताही महत्त्वाची आहे. यापैकी काही समस्या खालीलप्रमाणे-

**१) असुरक्षितता –** जोपर्यंत समाजात मतैक्य वा संतुलन असते तोपर्यंत वार्धक्य व त्यातील समस्यांकडे दुर्लक्ष होते; परंतु जेव्हा अर्थव्यवस्थेवर ताण पडून व्यवस्था असंतुलित होते तेव्हा मात्र वृध्दांवर अनुत्पादक ठरवून अन्याय केला जातो. समाजातील भेदभाव, विसंवाद, दहशतवाद, दंगली आणि अशांतता यामुळे

सामाजिकदृष्ट्या या दुर्बल वर्गाचे जीवन अधिकच असुरक्षित बनले आहे.

**२) शहरीकरण -** आधुनिक औद्योगिक जगात शहरीकरणास वेग आलेला आहे. स्त्रियांचे वैवाहिक स्थलांतर होऊन वा नोकरी- निमित्ताने शहरात स्थलांतर होते. व्यापक व्यावसायिक संधीसाठी तरुण परदेशांत जात आहेत. तरुणांच्या स्थलांतराच्या वाढत्या प्रमाणामुळे गावात व शहरात वृध्द आई-वडील अपरिहार्यपणे एकाकी राहत आहेत.

**३) समाजातील दुय्यम स्थान -** असमान वागणूक, असुरक्षितता यामुळे समाजाबद्दल वृध्दांना आस्था वाटत नाही. समाजात वाढणारी विकृती, वृध्दांना विकलांग व निरुपयोगी ठरवते. वृध्दांची प्रतिक्रियाही यामुळे निकोप राहू शकत नाही त्यामुळे ते एकटे पडतात.

वृध्दांच्या काही समस्यांचे निराकरण व्हावे यासाठी एक उपाययोजना वारंवार सूचित केली जाते. ती म्हणजे 'वृध्दाश्रमाची'.

**भारतीय समाजातील वृध्दाश्रम :**

वृध्दाश्रम ही वृध्दांच्या समस्येबाबतची एक सर्वसामान्य अशी उपायसूचक प्रतिक्रिया आहे. पाश्चात्य राष्ट्रांत वृध्दांच्या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी विकसित केली गेलेली ही औपचारिक स्वरूपाची संस्थात्मक उपाययोजना आहे. भारतीय वृध्दाश्रमाच्या कल्पनेला एक शतकापेक्षा अधिक कालखंडाचा इतिहास असून वृध्दाश्रमाच्या क्षेत्रातील ऐच्छिक सेवाभावी संस्थाचे कार्यही एका शतकापेक्षा अधिक जुने आहे. सेवाभावी, ऐच्छिक स्वरूपाच्या संघटनामार्फत वृध्दाश्रम चालविण्याचे पहिले प्रयत्न १८४० मध्ये बंगळूर शहरात 'Friends In Need Society' या संघटनेद्वारे केला गेला. १९८७ पासून मात्र पुणे, मुंबई, सुरत, दिल्ली, लखनौ, कोलकाता, चेन्नई आणि सिकंदराबाद या शहरांत वृध्दाश्रम स्थापन करण्यात आले. स्वातंत्र्यानंतर शासनाच्या पुढाकाराने व आर्थिक मदतीमुळे भारतात वृध्दाश्रमांची संख्या वाढत गेली. भारतातील बहुतेक वृध्दाश्रम हे सेवाभावी व ऐच्छिक संघटनांमार्फत चालविले जातात.

संपूर्ण भारतात आज ९९५ वृध्दाश्रम आहेत. त्यापैकी ७३९ वृध्दाश्रमांची सविस्तर माहिती उपलब्ध आहे. एकूण वृध्दाश्रमांपैकी ३७१ वृध्दाश्रम हे गरीब व आजारी वृध्दांसाठी तर ११७ वृध्दाश्रम हे फक्त स्त्रियांसाठी उपलब्ध आहेत. केरळ राज्यात सर्वांत जास्त म्हणजे १८४ वृध्दाश्रम आहेत. (Help Age India, 2002) महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण विभागाच्या वतीने इ.स. १९६३ पासून वृध्दाश्रम योजना राबविली जाते. ही योजना सेवाभावी संस्थांच्या मदतीने चालविली जाते. म्हणजे या सेवाभावी संस्थांच्या वृध्दाश्रम मदतीने चालविली जाते. म्हणजे या सेवाभावी संस्थांच्या वृध्दाश्रमांत राहणाऱ्या ६० वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या पुरुष वृध्दांनाच ५५ वर्षांपेक्षा अधिक वय असणाऱ्या स्त्रिया व अपंग व्यक्तींसाठी अन्न, वस्त्र, निवारा आणि वैद्यकीय खर्चांसाठी ३३५ रुपये दिले जातात. महाराष्ट्रात १९९८ पर्यंत या योजनेअंतर्गत ७३ वृध्दाश्रम कार्यरत होते. मातोश्री वृध्दाश्रम योजना ही महाराष्ट्र शासनातर्फे १९९५ मध्ये सुरू करण्यात आली. या योजनेअंतर्गत वृध्दाश्रम चालविणाऱ्या सेवाभावी संघटनांना ५ एकर जमीन आणि पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी आर्थिक अनुदान देण्यात आले. (Bali A.P.; 2001)

भारतातील वृध्दाश्रमांचे वर्गीकरण दोन वर्गात करता येते. पहिला प्रकार म्हणजे मोफत सुविधा देणारे (Free Homes) आणि दुसरा प्रकार म्हणजे ठराविक शुल्क आकारून सेवा देणारे (Pay and Stay) याशिवाय तिसरा प्रकार दिल्ली, कोलकाता, पुणे, चेन्नई या महानगरांतून उदयास येत असलेला म्हणजे "Home away free home" हा होय या प्रकारात वृध्दांसाठी स्वतंत्र वसाहत असते. जिथे सर्व सेवा सुविधांची तरतूद असते आणि आपल्या जोडीदारासह स्वतंत्र सदनात वृध्द राहतात. वृध्दत्वाच्या अडचणी लक्षात घेऊन या वसाहती विकसित केल्या जातात. प्रामुख्याने गर्भश्रीमंत वर्गातील वृध्दांमध्ये अशा वृध्दाश्रमांत राहण्याची प्रवृत्ती वाढत आहे.

**वृध्दाश्रमांतील वृध्दांची पार्श्वभूमी :**

भारतीय समाजात वृध्दाश्रमाची सुविधा घेणाऱ्या वृध्दांचे प्रमाण (५%) व एकूण वृध्दाश्रमांची संख्या (९९५) ही भारतासारख्या खंडप्राय देशात अत्यंत, अल्प वाटत असली तरी त्यांचे प्रमाण व संख्या दिवसेंदिवस वाढत आहे.

केंद्र शासनाच्या समाज कल्याणखात्याकडून झालेले सर्वेक्षण (Ramaurti & Jamuna, 1997) आणि हेल्प एज इंडिया (Help Age India) या संस्थेकडून झालेल्या अभ्यासातून (Ara, 1955) ज्या वृध्द व्यक्ती वृध्दाश्रमाची सुविधा घेतात, त्यांचे वर्गीकरण तीन प्रकारांत केलेले आहे.

**१) पहिला प्रकार -** जे एकटे राहतात, विधवा किंवा विधुर आहेत. वृध्द पती- पत्नी ज्यांना नियमित उत्पन्नाचे साधन आहे; परंतु ज्यांना अपत्ये नाहीत किंवा मुले आहेत; परंतु त्यांनी

इतरत्र स्थलांतर केलेले आहे आणि ज्यांना एकाकीपणा व उदासीन वाटते, ज्यांना समस्या आहेत आणि ज्यांना इतरांच्या सहवासाची गरज आहे. आरोग्यविषयक प्रश्न आहेत आणि ज्यांना राहत असलेल्या ठिकाणी असुरक्षित वाटते असे वृध्द या प्रकारात येतात.

**२) दुसरा प्रकार -** अपत्य नसलेले वृध्द जोडीदार, जे अपुऱ्या उत्पन्नामुळे स्वतंत्र राहू शकत नाहीत किंवा तशा स्थितीत नसतात असे वृध्द या प्रकारात येतात.

**३) तिसरा प्रकार -** मुलांकडून मिळणाऱ्या तऱ्हेवाईक वागणुकीमुळे व कुटुंबाकडून होणारे अत्याचार टाळण्यासाठी वृध्दाश्रमात आलेले वृध्द या प्रकारात येतात.

वरील अध्ययनातून असे स्पष्ट होते की, भारतीय समाजात वृध्दाश्रमात नकारात्मक दृष्टिकोन असल्यामुळे केवळ गरजू आणि परिस्थितीच्या दबावामुळेच वृध्द व्यक्ती वृध्दाश्रमासारख्या संस्थात्मक आधार व्यवस्थेची सेवा स्वीकारतात. आधुनिक भारतीय समाजातील बदलती सामाजिक परिस्थिती ही वृध्दांना वृध्दाश्रमासारख्या आधार- व्यवस्थांच्या आधारे जगण्यास बाध्य करीत आहे.

वार्धक्य ही मानवी जीवनातील एक अटळ वास्तव आहे. प्रत्येक व्यक्तीस आयुष्याच्या उत्तरार्धात वार्धक्य हे येतेच; परंतु हे वार्धक्य मानवी जीवनात असंख्य प्रश्न घेऊन येत असते. वृध्दांच्या निरनिराळ्या समस्या सोडविण्यासाठी केवळ कुटुंबानीच सहकार्य न करता समाजाचेदेखील यामध्ये योगदान असावे.

१. मानवी मूल्यांचा आदर करीत आपल्या कुटुंबातच वृध्दांना सांभाळून घेण्याचा प्रयत्न करावा.
२. त्यांना आवडतील अशा सेवाभावी कामांत संधी द्यावी.
३. वृध्दांना आपल्या पैशाचा वापर मनाप्रमाणे करू द्यावा.
४. त्यांच्या क्षमतेस वाव द्यावा
५. वृध्दांच्या मानवी अधिकारांची जपणूक करावी.
६. निर्णय प्रक्रियेत त्यांना सहभागी करून घ्यावे.
७. वृध्दांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे.
८. हास्य क्लब, आरोग्य सेवा, वाचनालय, उद्यान यामध्ये वाढ करावी.

वृध्दांच्या निरनिराळ्या समस्या या समाजात ज्या काही विसंगती निर्माण झाल्या आहेत त्यातून त्या समस्यांची निर्मिती झालेली आहे. आपल्या वार्धक्य अवस्थेत आपल्याला काय अडचणी येऊ शकतील याचा ऐन उमेदीच्या काळात वार्धक्यात भेडसावणाऱ्या समस्यांसाठी तरतूद करण्याची सवय लावून घेणे हा वृध्दत्व काळातील समस्यांवर एक प्रभावी उपाय होऊ शकतो. भारतीय माणूस जो कुटुंबप्रेमी आणि समाजप्रेमी आहे त्याच्यासाठी पर्यायी आधार व्यवस्था हाच पुनर्वसनासाठी उत्तम मार्ग आहे, वृध्दाश्रम नव्हे.

**संदर्भ**


1) United Nations, (1998) World Population Projections to 2150 Department of Economic & Social Affairs, Population Division, Newyork : Author.
2) Brinks (1997) "The Greying of Our Communities, Worldwide" Ageing International, 23 (3 & 4 ) 13- 31.
3) Sharam R. M.-Social Problems and social Disorganization.
4) Encyclopaedia of Britanica of Social Science- Vol 20 Page No. 791.
5) गोडबोले अरविंद (१९७४) वृध्द व त्यांचे प्रश्न, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
6) Jammuana D (1987) Self and Care Gives Deception of Needs and Problems of elderly women-A case for guidance and Counselling . Journal of Counseling and community Guidance, & (3), 25-32
7) Jammuna D. (1998) Challenges of changing Socio- economic and Psychological Status of the Aged, R & D Journal 5-13 (1)
8) Help Age India (2002), Senior Citizens Guide Revised Edition 2002, Research and Development Division, Help Age Indial, New Delhi.
9) Bali A. P. [2001] Care of the Elderly In India, Changing Configurations, Indian Institute of Advanced Study, Simla.
10) Help Age India (1955), Directory of Old Age Homes in India, New Delhi- Help Age India. R &D Division.
11) Ramamurti, P. V. & Jamuna. D. (1997) Evaluation of old Age Homes, Day Care Centers and Mobile Medical Units in Andhra Pradesh. Report Submitted to Ministry of Welfare, Govt. of India, New Delhi [Mimes]
12) Ara S. [1995] Old Age Homes: The Last Report, R& D Journal, 2 (1), 3-10
13) गोडबोले अरविंद (१९७४) : वृध्द व त्यांचे प्रश्न पॉप्युलर, प्रकाशन, मुंबई
14) डॉ. खैरनार दिलीप (२००७) : वृध्दांच्या समस्या : चिंता आणि चिंतन, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद.

# पारधी जमातीचे सामाजिक व आर्थिक जीवन

**डॉ. देवीदास भगत**

**'पारधी'** हा शब्द संस्कृत भाषेतील (पारध) या शब्दावरून आला आहे. याचा अर्थ 'शिकार करणे' असा होतो. पंडित महादेवशास्त्री जोशी यांच्या मते पारधी हा शब्द 'पारध' या शब्दापासून बनला आहे. त्याची सुरुवात 'रामायणा' या रचियता वाल्मिकीपासून झाली आहे असे मानतात. कारण वाल्मिकी हा पारधी होता. पारध्यांच्या मूळ उत्पत्तीची कथा हिंदूच्या 'महाभारत' या धर्मग्रंथात आहे. महादेवाने पारध्याचे रूप धारण केलेला 'महादेव व अर्जुन' यांच्यात युध्द होऊन महादेव अर्जुनावर प्रसन्न झाला व आपले खरे रूप प्रगट केले. त्या दिवसापासून पारधी जमातीचे लोक महादेवाला 'दैवत' मानू लागले.

**पारधी जमातीमधील उपजाती -** या काही भटक्या जमाती 'गुन्हेगार जमाती' म्हणून सेटलमेंटमध्ये (तीन तारेच्या कुंपणात) बंदिस्त केलेल्या होत्या. त्यापैकी ही एक जमात आहे. इतर भटक्या समाजाप्रमाणे या जमातीला पारंपरिक असा जातीचा खास व्यवसाय नाही. त्यामुळे गावगाड्याशी त्यांचा संबंध आलेला नाही. गावापासून दूर जंगलाच्या आश्रयाने पिढ्यान्‌पिढ्या हा समाज सतत उपजीविकेसाठी भटकतो आहे. पारधी जमातीत काही उपजाती आहेत. त्यांच्या शिकार करण्याच्या प्रकारावरून आणि राहण्यासाठी निवडलेल्या निवाऱ्यावरून त्यांना वेगवेगळ्या नावांनी ओळखले जाते. उदा: जंगलात हरणाची शिकार करणारा 'हरणपारधी', जंगलातच भटकणारा तो 'जंगलपारधी', पालात राहणारा तो 'पालपारधी', चित्याची शिकार करणारा 'चित्तापारधी', गाई पाळणारा किंवा गाईवर बसून भटकंती करणारा 'गायपारधी', फासे तयार करून पक्षी पकडणारा 'फासे पारधी' आणि स्वातंत्र्योत्तर काळात गावगाड्याच्या आश्रयाने राहणारा 'गावपारधी' अशा त्यांच्या प्रमुख उपजाती आहेत.

**पारधी जमातीची संख्या -** १९०१ च्या जनगणनेनुसार राज्यात पारधी जमातीची लोकसंख्या १२,२१४ होती. त्यामध्ये ६,२०० पुरुष, ५,८१४ स्त्रिया होत्या ही भटकी जमात असून जंगलातील विविध भागांत आहे. गुजरातमधील कच्छ जिल्ह्यामध्ये आणि महाराष्ट्रात पारधी लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे.

कच्छ जिल्ह्यामध्ये 'साप पकडणारी जमात' म्हणून ओळखली जाते. कच्छ जिल्ह्यामध्ये पारधी जमातींना 'अनुसूचित जमातीत' समाविष्ट केले आहे. ह्या जिल्ह्यात १९८१ च्या जनगणनेनुसार ४, ४१६ इतकी जमातीची लोकसंख्या आहे.

महाराष्ट्रातील पारधी जमातीची लोकसंख्या खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | वर्ष | पारधी जमातीची लोकसंख्या |
|---|---|---|
| १. | १९६१ | २१,४२७ |
| २. | १९७१ | २४,९५६ |
| ३. | १९८१ | ९५,११५ |
| ४. | १९९१ | १,१९,७०० |
| ५. | २००१ | १,२३,८१३ |

(Source : Tribal Research & Training Institute, Pune, M.S. September 2003)

**पारधी जमातीचे सामाजिक व आर्थिक जीवन-** आजही भटकी जमात रानावनांत, डोंगरदऱ्यांत वास्तव्य करीत आहे. सुधारणा आणि विकास यांच्याशी त्यांचा संबंध आलेला नाही. कंदमुळे गोळा करणे, शिकार करणे, रानावनांत राहणे हेच त्यांचे जीवन आहे. भीक मागत गावोगांव फिरणे, चोऱ्या-लूटमार करणे, शिकार करणे हेच त्यांच्या उपजीविकेचे साधन आहे. पारधी जमात आज खेड्याशेजारी झोपड्या बांधून वस्ती करून राहू लागली आहे. ही जमात माणसाळू पाहत आहे. रेल्वेस्थानकांवर, बसस्थानकांवर, उघड्या मैदानात आपल्या बाया-बापुड्या कडेवर एक आणि पाठीमागे दोन-तीन लेकरे

**समाजशास्त्र विभाग, यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय मंगरूळ पीर येथे विभागप्रमुख म्हणून कार्यरत.**

घेऊन खेड्या-पाड्यातील आणि शहरातील वस्त्या-वस्त्यांतून ''देत कावो माय कोरभर कुटका लेकराला!'' म्हणून दारोदार भीक मागत फिरतात. अठराविश्व दारिद्र्यामुळे व्यवस्थित आणि चांगले जीवन जगता येत नाही. युगानुयुगांपासून मिष्टान्न त्यांच्या घरी शिजलेले नाही. त्यामुळे पंचपक्वान्न कसे बनवावेत याचे त्यांना ज्ञान नाही. म्हणून पंचपक्वान्नांचे जेवण वाट्याला कधीच आलेले नाही. घरोघरी फिरून साऱ्या जगाचे उष्टे-पाष्टे गोळा करणे. त्याचप्रमाणे शहरी किंवा खेड्या वस्तीत व विवाहप्रसंगी, तेरवीप्रसंगी किंवा इतर वेळी उठलेल्या पंक्तीच्या फेकलेल्या पत्रावळीवरील अन्न जमा करणे असे निकृष्ट दर्जाचे अन्न त्यांना सेवन करावे लागते. त्यालाच ते अमृत मानतात.

कपड्यालत्त्यांच्या बाबतीतही तिच अवस्था, फाटके-तुटके, मळलेले चिरकूट डोक्याला, कंबरेला गुंडाळलेले, मळलेला फाटकाच सदरा तोही भीक मागून मिळविलेला, नसलाच तरीही चालतो. उघडे-बोडखे राहणे तो पसंत करतो. पारध्याची स्त्री असो की, पुरुष इज्जत (अब्रू) झाकण्यापुरते कपडे मिळाले की बस त्यातच समाधान मानणारा आहे.

पारध्यांची एकूण आर्थिक स्थिती त्यांच्या व्यवसायाच्या अनिश्चिततेमुळे बिकट बनली आहे. काही पारध्यांनी थोड्या प्रमाणात शेती घेतली आहे. परंतु एकूण व्यवसायाच्या स्वरूपासंबधी माहिती मिळविताना 'शिकार आणि भिकार' हाच आमचा व्यवसाय आहे. असे उत्तर मिळाले. ही जमात इतर सर्व जमातीपेक्षा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या पूर्णपणे मागासलेली आहे.

शिकारीव्यतिरिक्त पाथरवटाचे कार्य करणे, भिक्षा मागणे, जासुदीचे काम करणे, वनस्पती औषधे विकणे, मोलमजुरी करणे, पहारा करणे असे विविध उद्योग हे लोक करतात. यांच्यात गुन्हेगारी प्रवृत्तीही आढळते. 'फासे पारधी' जमातीचे लोक चोरीचा व्यवसाय करतात. पोलिसाचा जाच होऊ नये म्हणून ते जंगलात राहणे पसंत करतात. ज्या कुटुंबातील पुरुष तुरुंगात गेला त्या कुटुंबातील लोक शिकारीवर उदरनिर्वाह करतात. पक्षी, लांडगा व कोल्हा यांची ते शिकार करतात. पारधी स्त्रिया नारळाच्या झाडापासून, पाम वृक्षापासून चटई, झाडू तयार करतात व काही घरगुती वस्तू तयार करून स्थानिक बाजारपेठेत त्यांची विक्री करतात; परंतु आता पारधी जमातीचे लोक शेती व्यवसाय करताना दिसून येतात. 'बस्तर' जिल्ह्यातील पारधी मोह, टोळी, आवळा, हिरडा, ताडी व मध गोळा करतात. पावसाळ्यात पारधी जमातीची मुले, स्त्रिया व पुरुष मासेमारी करतात.

पारधी जमात आजही मागासलेली, जवळ-जवळ रानटी अवस्थेत आहे. पारधी जे-जे प्राणी पक्षी पकडतात त्या सर्वांचे मांस खातात. अपवाद फक्त कावळा व चिमणी पक्ष्यांचा आहे. धान्याची कच्ची कणसे खाल्ली जातात. बाळंतपणासाठी या जमातीतील स्त्रिया शक्यतो दवाखान्यात जात नाहीत. राहत्या घरीच किंवा उघड्यावर पारधी स्त्री बाळंत होते. बाळंत होते वेळी संबंधित महिलेचा पती उपस्थित असावाच लागतो. एकंदरीतरीत्या पाहता पारधी जमात ही अज्ञानी व सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे मागासलेली आहे.

पारधी जमातीचे सामाजिक अध्ययन करताना त्यांच्या भाषेचासुध्दा आपल्याला अभ्यास करावा लागेल. प्रदेशापरत्वे पारधी समाजाची भाषा बदलते. महाराष्ट्रात मराठी भाषेत ते इतरांशी बोलतात; परंतु आपसांत बोलताना ते त्यांच्या पारधी भाषेत बोलतात. महाराष्ट्राच्या धुळे आणि जळगाव जिल्ह्यांतील त्यांचे दोन गट आहेत. पारधी आणि फासे पारधी यांची मातृभाषा मिश्रित असून इतरांशी ते मराठीतून बोलतात. देवनागरी त्यांची लिपी आहे. टाकणकर-पारधी यांची मारवाडी भाषेसारखी मातृभाषा आहे. गुजरातमधील फासेपारधी गुजराती बोलीभाषा बोलतात. पालपारधी हे राजस्थानी, मराठी, हिंदी, गुजराती भाषेचा वापर करतात. म्हणून त्यांचे उत्तरेकडील मूळचे वास्तव्य लक्षात येते तर दक्षिण मराठी जिल्ह्यात कानडी भाषा बोलतात. त्यांची एक खास सांकेतिक भाषाही आहे. गुन्हेगारीच्या व्यवहारात ते ती भाषा बोलतात. पारधी जमातीची भाषा गुजराती, मराठी व कानडी भाषेचे मिश्रण आहे. ते सहसा मोठ्याने बोलतात. त्यांच्या बोली भाषेतील काही विशेष शब्द खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| राज | : | चीफ कॉन्स्टेबल |
| खपाई | : | कॉन्स्टेबल |
| मूळ | : | पळणे |
| खपाई अवसरमूळ | : | कॉन्स्टेबल आला पळा |
| कळू | : | पोलीस ऑफिसर |
| वसाई | : | चोरी |
| खोनकुस | : | सोने |

यावरून हे लक्षात येते की, पारध्यांची बोलण्याची गुप्त भाषा असते. तिला 'फारसी' असे म्हणतात. या जमातीमध्ये बोलल्या जाणाऱ्या या भाषेची कोणतीही लिपी उपलब्ध नाही. मौखिक स्वरूपातच ही भाषा आजही टिकून आहे.

**निष्कर्ष :**

१) पारधी जमातीमध्ये त्यांच्या व्यवसायावरून पोटजातीची निर्मिती झालेली आहे.

२) पारधी जमातीत आजही भिक्षावृत्ती आढळून येते.

३) पारधी कुटुंबात भौतिक सुखसोईचा अभाव आहे.

४) आजही पारधी जमातीत 'शिकार' हाच पारंपरिक व्यवसाय असल्याचे आढळून आले.

५) या जमातीकडे आजही 'गुन्हेगार जमात' म्हणून पाहिले जाते.

६) या जमातीला आजही पोलीस व वनखात्याचा ससेमिरा सोसावा लागतो.

७) या जमातीमध्ये अंधश्रध्दा व दारिद्र्य अधिक आहे.

८) पारधी जमातीचे लोक शासनाच्या सोई-सवलतीपासून वंचित आहेत. त्यांचा पुरेसा लाभ घेताना आढळून आले नाहीत.

**संदर्भग्रंथसूची**


१) जोशी पं. महादेव शास्त्री, ''भारतीय संस्कृतिकोश'' खंड ५ वा, भारतीय संस्कृतिकोश मंडळ - ४१०, शनिवार पेठ, पुणे - ३०, पृष्ठ क्र. ५२०.

२) Sharma Dr. K.K., " Intellectual's Sandarbh Maharashtra State & Districts At a Glance", Set in 2 Vol., Intellectual Book Bureau, Narayan Nagar, Bhopal, Page No. 240.

३) चव्हाण, रामनाथ, ''भटक्या-विमुक्तांची जात-पंचायत'' देशमुख आणि कंपनी, पब्लिशर्स प्रा.लि.पुणे, प्रथमावृत्ती ५ मार्च २००२, पृ.क्र. २२१-२२३.

४) Enthoven R.E. " The Tribes And Castes of Bombay" Vol.No.III Cosmo Publication, Delhi, 1975, Page No. 169.

५) Singh K.S. " The Scheduled Tribes People of India" National Series Vol. No. III, Oxford University Press, Page No. 979.

६) फुलूके- श्रीराम, '' दलितांचे प्रश्न नि आम्ही'', ज्ञानेश प्रकाशन, ६ नवनिर्माण, प्रतापनगर, नागपूर, प्रथमावृत्ती - १९९०, पृष्ठ क्र.७९.

७) कुळकर्णी, शरद , लेख : ''महाराष्ट्रातील वनवासी'' वनवासी विकास संकल्पना आणि दिशा'' आस्वाद प्रकाशन प्रा.लि. वनवासी कल्याण केंद्र, भाग - १ प्रथमावृत्ती- फेब्रुवारी २००० पृष्ठ क्र. ५४

८) Kennedy M. "The Criminal Classes in India " Mittal Publication, Delhi, Page No. 137

९) Russell & Hiralal, "The Tribes And Castes of the Central Provinces of India", Rajdhani Book Center, Delhi, Vol. No. II. Published by S.K. Jain, 1975, Page No. 359

१०) गारे, डॉ. गोविंद ''महाराष्ट्रातील आदिवासी जमाती'' कॉन्टिनेंटल प्रकाशन, विजयानगर, पुणे- ४११०३०, व्दितीयावृत्ती २००२, पृष्ठ क्र. १४६ .

११) मांडे, डॉ. प्रभाकर ''गावगाड्याबाहेर'' परिमल प्रकाशन, औरंगाबाद, १९८३, पृष्ठ क्र. १५१

# २० व्या मराठी समाजशास्त्र परिषदेच्या अधिवेशनाचा वृत्तांत

सचिव म.स.प.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २० वे अधिवेशन दि. २८ ते २९ जानेवारी, २०१० रोजी शिक्षण प्रसारक मंडळ कोल्हापूर संचलित बॅ. बाळासाहेब खर्डेकर महाविद्यालय, वेंगुर्ला येथे यशस्वीपणे संपन्न झाले. या अधिवेशनात एकूण ३६८ प्रतिनिधी सहभागी झाले होते. सदर अधिवेशनासाठी दहशतवाद आणि समाज हा प्रमुख विषय होता. अधिवेशनात बीजभाषण डॉ. उद्धव कांबळे (तुरूग महानिरीक्षक, मुंबई) यांनी केले. याप्रसंगी डॉ. अनुराधा भोईटे, डॉ. राम वाघ, डॉ. दिलीप खैरनार, डॉ. दादासाहेब मोटे, प्रा. सिद्धार्थ निसर्गंध व प्राचार्य एस.बी. फडतरे हे उपस्थित होते.

अधिवेशनाच्या बीजभाषणप्रसंगी डॉ. उद्धव कांबळे यांनी भारतातील दहशतवाद समस्येसंबंधी सखोल मार्गदर्शन केले. दहशतवादाच्या समस्येची उकल करण्याच्या दृष्टीने त्याची तीव्रता कमी करण्याच्या दृष्टीने समजाशास्त्रज्ञांनी योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले. दहशतवाद आणि समाज या विषयाच्या अनुषंगाने अधिवेशनात सखोल चर्चा व्हावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

अधिवेशनाचे पहिले सत्र सांस्कृतिक, भाषिक व कौटुंबिक दहशतवाद या विषयाशी संबंधित होते. सत्राचे अध्यक्षपद डॉ. स्मृती भोसले यांनी भूषविले होते तर अहवाल लेखनाचे काम डॉ. कल्पना देवकर यांनी केले होते.

अधिवेशनाचे दुसरे सत्र 'कोकण विकास : अपेक्षा आणि वास्तव' याच्याशी संबंधित होते. या सत्राचे अध्यक्षपद प्राचार्य एस.बी. फडतरे तर संचालन डॉ. पाटोळे यांनी केले. या सत्रात श्री. श्रीधर मराठे यांना विचार व्यक्त करण्यासाठी पाचारण करण्यात आले होते. या सत्रात त्यांनी कोकण विभागाच्या विविध समस्यांची मांडणी केली. पर्यटनदृष्ट्या अनुकूल स्थिती असतानाही आणि काजू, आंबा, (हापूस) याचे आगार असतांनाही या भागाचा विकास न होऊ शकल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. नैसर्गिक विविधता, समुद्रकिनारा यादृष्टीने विकासाची अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

दि. २९.०१.२०१० रोजी अधिवेशनाचे चौथे सत्र 'राजकीय दहशतवाद' या विषयावर होते. सत्राचे अध्यक्षपद डॉ. विजय मारूलकर यांनी भूषविले तर प्रा. अरुण पौडमल यांनी अहवाल लेखन केले. सूत्र-संचालन प्रा. होडावडेकर पी. डी. यांनी केले.

अधिवेशनाचे पाचवे सत्र नक्षलवाद, 'जैविक व सायबर दहशतवाद' याच्याशी संबंधित होते. या सत्राचे अध्यक्षपद डॉ. माणिक माने, कराड यांचेकडे होते तर सूत्र-संचालन ए.एम. माने यांनी केले. अहवाल लेखन प्रा. कमलताई तंबाखे यांनी केले.

अधिवेशनाचे शेवटचे सत्र संपन्न झाल्यानंतर त्याच ठिकाणी डॉ. दिलीप खैरनार अध्यक्ष मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या अध्यक्षतेखाली आमसभेचे आयोजन करण्यात आले होते. मराठी समाजशास्त्र परिषदेचे विद्यापीठ पातळीवर काम करणाऱ्या कार्यकारिणी सदस्यांमध्ये डॉ. पंडीत शिंदे, ज्ञानोपासक महाविद्यालय, जिंतूर, जि. परभणी यांनी विक्रमी आजीव सभासद नोंदणी केल्याबद्दल आणि प्रा. महेंद्रकुमार जाधव व प्रा. अरूण पोडमल यांनी अधिवेशन संयोजनासाठी उत्कृष्ट मदत केल्याबद्दल आमसभेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

अधिवेशनाच्या समारोप कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आमदार दिपकभाई केसरकर आणि माजी आमदार शंकरभाई कांबळी हे लाभले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्य एस.बी. फडतरे यांनी भूषविले होते.

मराठी समाजशास्त्र परिषदेचे २० वे अधिवेशन यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी शिक्षण प्रसारक मंडळ, कोल्हापूरच्या अध्यक्षा श्रीमती शिवानी देसाई, चेअरमन श्री. व्ही. एल.

पाटील, सचिव प्रा. जयकुमार देसाई महाविद्यालय पातळीवर प्राचार्य एस.बी. फडतरे, समाजशास्त्र विभागप्रमुख प्रा. आरोलकर डी. आर. आणि त्यांचे सहकारी प्रा. डाके डी. के. यांच्याबरोबरच महाविद्यायातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेवून अधिवेशने यशस्वीपणे पार पाडले. म.स.प. कार्यकारिणीचे अध्यक्ष डॉ. दिलीप खैरनार, सचिव डॉ. दादासाहेब मोटे आणि कोषाध्यक्ष प्रा. सिद्धार्थ निसर्गंध यांनी यावेळी मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे विद्यार्थी आणि वेंगुर्लावासीयांनी उस्फूर्त प्रतिसाद दिला. सर्वांच्या सहकार्यामुळेच म.स.प. चे २० वे अधिवेशन व्यवस्थितपणे पार पाडता आले.

## आवाहन

**मराठी समाजशास्त्र पत्रिकेच्या प्रकाशनासाठी ज्यांना देणगी द्यावयाची असेल, त्यांनी 'सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद' या नावाने डिमांड ड्राफ्ट/चेक/अथवा रोखीने डॉ. दिलीप खैरनार, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा, समाजशास्त्र विभाग पदवी आणि पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथे जमा करावे. देणगीदारांची नावे पुढील अंकात छापण्यात येतील.**

**कार्यकारी संपादक,**
**म. स. प.**

## समाजशास्त्र संशोधन पत्रिका या वार्षिक नियतकालिकाचे स्वामित्व व इतर बाबींविषयी निवेदन
## (नियतकालिकांच्या नोंदणीविषयी नियम ८ प्रमाणे)

| | | | |
|---|---|---|---|
| १) | प्रकाशन स्थळ | : | मराठी समाजशास्त्र परिषद<br>द्वारा - समाजशास्त्र विभाग,<br>पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र<br>देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद |
| २) | नियतकाल | : | वार्षिक<br>ISSN |
| ३) | मुद्रकाचे नाव | : | डॉ. दादासाहेब मोटे |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | मत्स्योदरी कला व वाणिज्य महाविद्यालय, जालना. |
| ४) | मुद्रण स्थळ | : | राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद |
| ५) | प्रकाशकाचे नाव | : | डॉ. दिलीप खैरनार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | देवगिरी महाविद्यालय, पदवी व पदव्युत्तर संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद |
| ६) | संपादकाचे नाव | : | डॉ. दिलीप खैरनार |
| | राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| | पत्ता | : | स्तंभ क्र. ५ प्रमाणे |
| ७) | मालकाचे नाव | : | मराठी समाजशास्त्र परिषद |
| | पत्ता | : | वरीलप्रमाणे |

मी. डॉ. दिलीप खैरनार असे जाहीर करतो की, वर दिलेला तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे खरा आहे.

**डॉ. दिलीप खैरनार**
प्रकाशक व संपादक

## - लेखकांना सूचना -

१) समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचा वार्षिक अंक दरवर्षी डिसेंबर महिन्यात प्रसिद्ध होईल. या अंकासाठी लेखन साहित्य त्या-त्या वर्षीच्या ३० ऑक्टोबरपूर्वी पाठविता येईल. या पुढील आलेल्या लेखांचा विचार करता येणार नाही. लेखनसाहित्य पाठविताना लेखकांनी आपला आजीव सदस्य क्रमांक कळविणे अनिवार्य आहे.

२) संशोधन पत्रिकेत समाजशास्त्र विषयाशी संबंधित मराठी भाषेतीलच लेख प्रसिद्ध करण्यात येतील. पत्रिकेसाठी पाठविलेला लेख इतरत्र कोठेही प्रसिद्ध झालेला किंवा प्रसिद्धीसाठी पाठविलेला नसावा.

३) अन्य भाषांमधील उत्कृष्ट लेखांचे अनुवाद मूळ लेखकांच्या अनुमतीसह संपादक मंडळाकडे पाठवावयास हवे.

४) प्रसिद्धीसाठी पाठवावयाचे लेख शक्यतो संगणकीय अक्षरजुळणी करून ई-मेलद्वारा पाठवावे. तसेच वापरलेला फॉन्ट व सॉफ्टवेअरचा तपशीलही कळवावा. संगणकीय लेखाची मुद्रीत प्रत व सीडी स्वतंत्र टपालाने पाठवावी. लेखासोबत स्वत:विषयी संक्षिप्त माहिती, मोबाईल नंबर, ई-मेल इ. वेगळ्या कागदावर पाठवावे.

५) प्रकाशनासाठी पाठविलेले संशोधनात्मक लेख विशेष करून संकल्पनात्मक व विश्लेषणात्मक असावेत. आढाव्यात्मक नसावे व लेखाची कमाल शब्दमर्यादा ५००० शब्दापर्यंत असावी. लेखाचा थोडक्यात गोषवारा सोबत जोडावा.

६) लेखामध्ये तक्ते व आकृत्या मर्यादित असाव्यात.

७) लेखातील टीपा लेखाच्या अखेरीस द्याव्यात. संदर्भ ग्रंथांची यादी, लेखकाचे आडनाव, प्रकाशन वर्ष, ग्रंथाचे शीर्षक, प्रकाशनाचे नाव व संदर्भाचा पृष्ठ क्रमांक देण्यात यावा. एखाद्या लेखाचा संदर्भ द्यावयाचा असल्यास लेखकाचे आडनाव, प्रकाशनाचे वर्ष, लेखाचे शीर्षक (अवतरण चिन्हात), संपादकाचे नाव, प्रकाशनाचे नाव तसेच नियतकालिकामध्ये प्रकाशित झाला असल्यास लेखाच्या शीर्षकानंतर नियतकालिकाचे नाव, प्रकाशनाचा सप्ताह, महिना, वर्ष, संदर्भ पृष्ठ क्र. या पद्धतीने असावेत.

८) विस्तृत परीक्षणासाठी तज्ज्ञांना संपादकामार्फत प्रत पाठविली जाईल. त्यासाठी संपादकीय पत्त्यावर परिक्षणार्थ ग्रंथाच्या दोन प्रती लेखकाने किंवा प्रकाशकाने पाठविणे आवश्यक आहे.

९) परीक्षणात्मक लेखाची मर्यादा १००० ते १५०० इतकी असावी.

१०) समाजशास्त्र संशोधन पत्रिकेतील लेखाच्या प्रकाशनाबाबत संपादक मंडळाचा निर्णय अखेरचा राहील.

डॉ. दिलीप खैरनार यांनी मराठी समाजशास्त्र परिषद या संस्थेकरिता हे वार्षिक राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद येथे छापून मराठी समाजशास्त्र परिषद, द्वारा : समाजशास्त्र विभाग, पदवी, पदव्युत्तर व संशोधन केंद्र, देवगिरी महाविद्यालय, औरंगाबाद येथून प्रसिद्ध केले.

View publication stats